गाव-पाड्यांत भोंगऱ्या बाजारात जल्लोष!

वाचा पान ६ वर

जळगाव

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा
प्रारंभ:१९९६

आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६ पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६

जळगाव, शनिवार, २८ फेब्रुवारी २०२६। युगाब्द ५१२७ । वर्ष : ३२ । अंक : २०२। मूल्य ४ रुपये। पृष्ठे ८ + ४ = १२ । जळगाव, धुळे, नंदुरबार येथे उपलब्ध

## विचारपुष्प



राष्ट्र म्हणजे अशा लोकांचा समूह जो 'एक लक्ष्य', 'एक आदर्श', 'एक ध्येय' यानुसार जगतो आणि भूमीच्या एका विशिष्ट भागाला आपली मातृभूमी मानतो. जर आदर्श किंवा मातृभूमी या दोन्हीपैकी एकही नसेल तर राष्ट्राचे कोणतेही अस्तित्व राहणार नाही.

**- पं. दीनदयाल उपाध्याय**
पूर्व अध्यक्ष, भारतीय जनसंघ

# केजरीवाल, सिसोदिया निर्दोष

### ● मद्यघोटाळा प्रकरणी दिल्ली न्यायालयाचा निर्णय ● सीबीआयची उच्च न्यायालयात धाव

**◆ नवी दिल्ली, २७ फेब्रुवारी**

मद्यधोरण प्रकरणातील कथित भ्रष्टाचार प्रकरणातून दिल्लीतील न्यायालयाने शुक्रवारी माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्यासह २१ जणांची निर्दोष मुक्तता केली. सीबीआयचे प्रकरण न्यायालयीन सुनावणीत टिकू शकले नाही आणि पूर्णपणे बदनाम झाले, असा संताप न्यायालयाने सीबीआयवर व्यक्त केला. या निर्णयाविरोधात सीबीआयने उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. निकाल जाहीर झाल्यावर केजरीवाल भावुक झाले होते.

या प्रकरणात क्लीन चिट मिळालेल्या २१ जणांमध्ये तेलंगणा जागृतीच्या अध्यक्ष के. कविता यांचा समावेश आहे. अगदी गंभीर संशय दूर, पण रेकॉर्डवर सादर केलेली सामुग्री कोणत्याही आरोपीविरुद्ध प्रथमदर्शनी खटला उघड करती नाही. त्यामुळे न्यायालयाला हा निर्णय देताना कोणताही संकोच नाही. त्यानुसार आरोपी क्रमांक १ ते २३ यांना या प्रकरणात त्यांच्यावर आरोप असलेल्या सर्व गुन्ह्यांमधून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे, असे विशेष न्यायाधीश जितेंद्रसिंह यांनी स्पष्ट केले.

पूर्वीच्या आप सरकारच्या आता रद्द केलेल्या उत्पादन शुल्क धोरणाची निर्मिती आणि अंमलबजावणीत झालेल्या कथित भ्रष्टाचाराची चौकशी सीबीआयने केली. या प्रकरणाचा तपास पूर्वनिर्धारित मार्गावर चालला आहे, असे दिसते. यात धोरण तयार करणे किंवा अंमलबजावणीशी संबंधित जवळजवळ प्रत्येक व्यक्तीला यात गुंतविले आहे, असे न्यायालयाने म्हटले आहे. या नोंदींचे एकत्रित मूल्यांकन केल्यास, एका व्यापक आणि गुंतागुंतीच्या कटाची छाप निर्माण करण्यासाठी, कायदेशीररीत्या स्वीकार्य सामुग्री नसलेले वेगवेगळे तुकडे जोडण्याचा प्रयत्न केल्याने तपासाचा दृष्टिकोन उघडकीस येतो, असे सिंह यांनी निकालात म्हटले.

गोवा विधानसभा निवडणुकीशी हे आरोप जोडण्याचा प्रयत्न, गुन्ह्यातून मिळालेल्या कथित रकमेचा प्रकल्प, अशा प्रकारची बांधणी करणे आणि वापर करणे, कायदेशीरदृष्ट्या शाश्वत सामुग्रीपेक्षा अंदाज आणि गृहीतांवर अधिक अवलंबून आहे, असे न्यायाधीशांनी म्हटले.



न्यायालयाच्या निर्णयानंतर अरविंद केजरीवाल यांनी रॅली काढली

> **"** हा एक सर्वांत मोठा राजकीय कट होता. मी भ्रष्ट नाही. केजरीवाल आणि मनीष सिसोदिया प्रामाणिक असल्याचे न्यायालयाने म्हटले. सर्व आरोपींनी दोषमुक्त केले. सत्याचा विजय होतो, असे आम्ही नेहमीच म्हटले. भारतीय न्याय व्यवस्थेवर आम्हाला पूर्ण विश्वास आहे.
>
> **अरविंद केजरीवाल**
> दिल्लीचे माजी मुख्यमंत्री

> **"** कनिष्ठ न्यायालयाने पुराव्याअभावी त्यांना निर्दोष सोडले. ही एक तांत्रिक समस्या आहे. पण, निराधार होते तर, सुरुवातीला आरोप कसे निश्चित करण्यात आले, याची विचारणा व्हायला पाहिजे. निकालाचा सखोल अभ्यास केल्यानंतर पक्ष सविस्तर प्रतिसाद देईल.
>
> **सुधांशू त्रिवेदी**
> भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते

**अनेक मुद्यांकडे केले दुर्लक्ष : सीबीआय**

» आम्ही अधोरेखित केलेल्या अनेक मुद्यांकडे विशेष न्यायालयाने आरोप निश्चित करताना दुर्लक्ष केले. त्यांचा विचारच केला नाही. आमच्या अनेक पैलूंचा विचारच न केल्याने सीबीआयने कनिष्ठ न्यायालयाच्या निकालाविरुद्ध तत्काळ उच्च न्यायालयात अपील दाखल केले आहे.

# समृद्ध मराठी पुढील पिढीपर्यंत पोहोचवू

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन



**विधानभवनात मराठी भाषा गौरव दिन साजरा**

**◆ मुंबई, २७ फेब्रुवारी**

जगात ज्या भाषा ज्ञानभाषा बनतात त्या पुढे प्रवाहित होतात. ज्या भाषेतून व्यवहार, शिक्षण आणि रोजगाराची संधी निर्माण होते, तीच भाषा समाजात प्रगतीचा भाव जागृत करते. त्यामुळे अभिजात मराठीला ज्ञानभाषेत रूपांतरित करून समृद्ध मराठी पुढील पिढीपर्यंत पोहोचवूया, असा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.



मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित 'जावे विनोदाच्या गावा' या विशेष कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी राम शिंदे, राहुल नार्वेकर, एकनाथ शिंदे, सुनेत्रा अजित पवार, नीलम गोऱ्हे, चंद्रकांत पाटील, आशिष शेलार आदी उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज यांनी प्रशासनात मराठीचा वापर रूजवताना भाषेचे शुद्धीकरण करण्यासाठी शब्दकोश तयार केला. फारशी व अरबी भाषेच्या प्रभावातून मराठीला स्वाभिमानाने उभे करण्याचे कार्य त्यांनी केले. मराठी भाषेचा अभिमान याच परंपरेतून पुढे आला असल्याचे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**मराठीला जागतिक व्यवहाराची भाषा बनवू**



मराठी ही केवळ संस्कृतीची नव्हे तर अर्थकारण, रोजगार आणि जागतिक व्यवहाराचीही भाषा व्हावी, यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले. माझ्या रक्तात मराठी, माझ्या श्वासात मराठी, असे भावनिक उद्गार काढत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी मराठी भाषा गौरव दिनी माय मराठीचा वारसा अधिक जोमाने पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला.

**डिजिटल माध्यमांत मराठीचा वापर वाढवूया**



तंत्रज्ञानाच्या युगात डिजिटल माध्यमांवर मराठीचा अधिकाधिक वापर करण्याची गरज अधोरेखित केली. लंडनमध्ये प्रस्तावित महाराष्ट्र भवनासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आल्याचे सांगत त्यांनी मराठीच्या जागतिक प्रसारासाठी प्रयत्न सुरू असल्याचे नमूद केले. सार्वजनिक ग्रंथालयांना वाढीव अनुदान देण्यात आल्याची माहितीही उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी यावेळी दिली.

## महत्त्वाचे

**तिसऱ्या तिमाहीत जीडीपीचा दर ७.८ टक्के**

**नवी दिल्ली :** भारतीय अर्थव्यवस्थेने पुन्हा एकदा मजबूत प्रदर्शनाच्या माध्यमातून बाजार आणि अर्थतज्ज्ञांनी आश्चर्यचकीत केले आहे. आर्थिक वर्ष २०२६ च्या तिसऱ्या तिमाहीत जीडीपीचा दर ७.८ नोंदवण्यात आला. चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत जीडीपीचा दर ८.४ टक्के होता. नवीन आकडेवारीनुसार, डिसेंबरमध्ये संपलेल्या तिसऱ्या तिमाहीत देशाचा जीडीपी ७.८ टक्क्यांच्या मजबुतीसह वाढत असल्याचे स्पष्ट झाले. हा अहवाल देशाची सकारात्मक आर्थिक परिस्थिती स्पष्ट करीत आहे. डिसेंबरमध्ये अर्थव्यवस्थेचा वेग ७.४ टक्के राहील, असा अंदाज अर्थतज्ज्ञांनी वर्तवला होता. देशाच्या आर्थिक हालचाली बाजाराच्या अपेक्षेपेक्षा कितीतरी जास्त चांगल्या स्थितीत असल्याचे जीडीपीच्या ७.८ टक्क्यांच्या आकडेवारीने सिद्ध झाले आहे. तिसऱ्या तिमाहीच्या कालावधीत सणासुदींचे पर्व असल्याने बाजारात ग्राहकांच्या मागणीत मोठ्या प्रमाणात वाढ दिसून आली.

**श्री क्षुधाशांती सेवा संस्था**
नवीन बसस्टँड व गांधी बगीच्या जवळ जळगाव. फोन २२२८९९६

*शुध्द व सकस आहार अत्यल्प दरात सर्व समाजास पुरविण्यास कटिबध्द संस्था*

सकाळी १० ते ९
(जेवण पार्सल उपलब्ध)

शनिवार, २८ फेब्रुवारी २०२६
लसुण चटणी, शेंगदाणे चटणी, वेफर्स, उपवास चिवडा उपलब्ध

वरण, भात, बट्टी, गंगाफळाची भाजी ५० रु.

वरण, बट्टी ३० रु.
सँडविच भाकरी २० रू. नग
पोळी भाजी १५ रु. प्लेट
मेथी पराठा व चटणी १० रू.
मसाला पुरी २० रु.
पार्सल मिळेल.
सर्व पार्सलमध्ये उपलब्ध आहे
ऑर्डर- एम.एम.पाटील
मो.क्र. ९३७२३२६४६० वर नोंदवावी.
*केशवस्मृती सेवासंस्था समूहाचा उपक्रम*

सर्व प्रकारच्या ऑर्डर्स स्वीकारल्या जातील.

# अफगाण-पाकमध्ये युद्धाचा भडका

### ● दोन्ही देशांचे एकमेकांवर हल्ले ● शेकडो सैनिक ठार; चौक्यांवर ताबा



तोखराम सीमेवर तैनात असलेले तालिबानी सैनिक

**◆ इस्लामाबाद, २७ फेब्रुवारी**

२२ फेब्रुवारीला पाकिस्तानी हवाई दलाने केलेल्या हल्ल्याचा सूड घेताना अफगाणिस्तानी सैन्याने शुक्रवारी पहाटे पाकिस्तानवर जोरदार हल्ले चढविले. या संघर्षाचे रुपांतर खुल्या युद्धात झाले असून दोन्ही बाजूंचे शेकडो सैनिक ठार तर कित्येक जखमी झाले आहेत. सीमेवर दोन्ही बाजूंनी गोळीबार, बॉम्बहल्ले केले जात असून पाकिस्तानी लष्कराचे ५५ पेक्षा अधिक सैनिक मारले गेले, तर १५ तालिबानी लष्कराच्या ताब्यात आहे. दुसरीकडे १३३ पेक्षा तालिबान्यांना मारल्याचा दावा पाकिस्तानने केला आहे.

आमच्या संयमाची सीमा संपली. आता खुले युद्ध सुरू झाल्याची अधिकृत घोषणा पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी केली. अफगाणिस्तानच्या तालिबान सैन्याने शुक्रवारी पहाटे पाकिस्तानच्या सीमा चौक्यांवर हल्ला केला. यात त्यांनी पाकिस्तानच्या १५ हून अधिक सीमा चौक्यांवर ताबा मिळवला, तर ५५ पाकिस्तानी सैनिकांना ठार केले. अफगाणिस्तानच्या हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यासाठी वायुदलाने हवाई हल्ले चढवले आणि लष्कराने सीमेवरील १९ चौक्यांवर ताबा मिळविल्याचा दावा आसिफ यांनी एक्सवरील पोस्टमधून केला. पाकिस्तानी वायुदलाने गजब लिल हक अंतर्गत अफगाणिस्तानमधील दहशतवादी तळांवर हल्ले केले असेही त्यांनी म्हटले आहे. अमेरिकेच्या शस्त्रांचा तालिबानी लष्कराकडून वापर केला जात आहे. दुसरीकडे तालिबान सरकारच्या प्रवक्त्याने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, पाकिस्तानच्या हल्ल्यात आठ सैनिक मारले गेले आणि ११ जखमी आहेत.

**एफ-१६ विमान पाडल्याचा दावा**

» हवाई हल्ल्यासाठी अफगाणिस्तान सीमेत प्रवेश केलेल्या पाकिस्तानच्या एफ-१६ लढाऊ विमानाला पाडल्याचा दावा तालिबानी सरकारचे प्रवक्ते तबीहुल्लाह मुजाहीद यांनी केला. त्यांनी विमान पाडल्याची चित्रफीत जारी केली. मात्र पाकिस्तानने या दाव्यावर कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही.

**पाकिस्तानी नागरिकांकडून टीकेची झोड**

» अफगाणिस्तावर केलेल्या हल्ल्यानंतर पाकिस्तानी नागरिकांनी समाज माध्यमांवर पंतप्रधान शाहबाज आणि लष्करप्रमुख असीम मुनीरवर टीकेची झोड उठवली आहे. त्यांनी म्हटले की, रमजान महिन्यात अफगाणिस्तानवर हल्ला करणे लज्जास्पद आहे.

# शेअर बाजारांत मोठी घसरण

**निर्देशांक ९६१ अंकांनी कोसळला**

**◆ मुंबई, २७ फेब्रुवारी**

आठवड्याच्या शेवटच्या सत्रात म्हणजेच शुक्रवारी शेअर बाजार मोठ्या घसरणीसह बंद झाला. निर्देशांक आणि निफ्टीत एक टक्क्यापेक्षा जास्त घसरण नोंदवण्यात आली. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक ९६१ अंकांनी कोसळून ८१,१५९ या पातळीवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ३१७ अंकांच्या घसरणीसह २५,१७८ या पातळीवर बंद झाला.

बाजारातील घसरणीमुळे मुंबई शेअर बाजारातील कंपन्यांचे बाजार भांडवल ४६८.४९ लाख कोटींवरून घसरून ४६३.५१ लाख कोटी रुपयांवर आले. याचाच अर्थ कंपन्यांच्या भांडवलात पाच लाख कोटी रुपयांची घट झाली. सन फार्मा, भारती एअरटेल, बजाज फिनसर्व्ह, इंटरग्लोब एव्हिएशनची घसरण झाली.




**तुमच्या कुटुंबासाठी हे सर्व मिळवा**

एलआयसीचे
**जीवन लक्ष्य**
Plan No.:733 UIN No: 512N297V03

तुमच्या कुटुंबाच्या निश्चित भविष्यासाठी नियोजन

**मुख्य वैशिष्ट्ये:**
- **किमान विमा रक्कम:** ₹2,00,000
- **कमाल विमा रक्कम:** मर्यादा नाही
- **वयाची पात्रता:** 18 ते 50 वर्षे
- **कमाल मुदतपूर्ती वय:** 65 वर्षे
- **पॉलिसीची मुदत:** 13 ते 25 वर्षे
- **प्रीमियम भरण्याची मुदत:** पॉलिसी मुदती पेक्षा 3 वर्षे कमी
- **मुदतपूर्ती लाभ:** विमा रक्कम + बोनस
- **मृत्यू लाभ:** वार्षिक उत्पन्न लाभ आणि मुदतपूर्ती तारखेला विमा रकमेचा परतावा + लागू होणारा बोनस
- **वैकल्पिक रायडर्स:** 1) एलआयसीचा अपघाती मृत्यू व अपंगत्व हितलाभ रायडर 2) एलआयसीचा अपघाती मृत्यू हितलाभ रायडर 3) एलआयसीचा न्यू टर्म ॲश्युरन्स रायडर

**पार, नॉन-लिंक्ड, जीवन, वैयक्तिक, बचत योजना**

आमचा व्हाट्सअ‍ॅप नं. 8976862090 बोला 'Hi'
अधिक माहितीसाठी तुमच्या एजंटशी/जवळच्या एलआयसीच्या शाखेशी संपर्क साधा/भेट द्या www.licindia.in
एलआयसी मोबाईल ॲप डाऊनलोड करा LIC digital
भेट द्या: licindia.in
कॉल सेंटर सेवा (022) 6827 6827
आम्हाला फॉलो करा: LIC India Forever | IRDAI Regn No.: 512

LIC
भारतीय आयुर्विमा महामंडळ
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA
*प्रत्येक क्षणी तुमच्या सोबत*

LIC/P1/2025 – 2026/33/Mar

भ्रामक फोन कॉल्स आणि बनावट/फसव्या ऑफर्सपासून सावध रहा. आयआरडीएआय किंवा त्यांचे अधिकारी विमा पॉलिसीज्ची विक्री, बोनस जाहीर करणे किंवा प्रिमियम्सची गुंतवणूक, रकमा परत करणे यासारख्या विमा व्यवसायाशी संबंधित कोणत्याही कामकाजात सहभाग घेत नाहीत. अशा प्रकारचे दुरध्वनी येणाऱ्या पॉलिसीधारकांनी अथवा संभाव्य ग्राहकांनी पोलिसांकडे तक्रार नोंदवावी. **कृपया विक्रीचा व्यवहार पूर्ण करण्यापुर्वी अधिक माहितीसाठी तसेच जोखमींचे घटक, नियम व अटी यासंबंधीच्या माहितीसाठी, विक्री माहिती पुस्तिका काळजी पूर्वक वाचा.**

# लोणार सरोवर धोक्यात; ऐतिहासिक मंदिर व दरगाह पाण्यात

**◆ लोणार, २७ फेब्रुवारी**

जगप्रसिद्ध लोणार सरोवरातील पाण्याची पातळी मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे ऐतिहासिक व धार्मिक स्थळांना धोका निर्माण झाला आहे. सरोवर परिसरातील माता कमळजा देवी मंदिर तसेच पीर बाबा गैबनशाह वली दरगाह पाण्याखाली गेल्याची माहिती आहे. यामुळे भाविक तसेच नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

यासंदर्भात एमआयएमचे शेख जावेद शेख चाँद यांनी तहसीलदारांकडे लेखी निवेदन देऊन तातडीने उपाय योजना करण्याची मागणी केली. सरोवरातील पाण्याची वाढती पातळी कायम राहिल्यास इतिहासकालीन मंदिर आणि दरगाहचे नुकसान होण्याची भीती व्यक्त करण्यात आली.



कमळजा देवीचे मंदिर पूर्णपणे पाण्याने वेढले गेले असून, भाविकांना दर्शन घेणे शक्य होत नाही तसेच या ठिकाणी दरवर्षी मोठ्या प्रमाणावर भाविक आणि पर्यटक येत असतात. त्यामुळे या ऐतिहासिक वारशाचे जतन करण्यासाठी तातडीने पाणीपातळी कमी करण्यासाठी प्रशासनाने उपाययोजना कराव्या, अशी मागणी करण्यात आली.

याबाबत अद्याप पुरातत्त्व विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित विभागांनी संयुक्तपणे लक्ष देऊन मंदिर व दरगाह सुरक्षित ठेवावा आणि भाविकांसाठी ही स्थळे पुन्हा खुली करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

## थोडक्यात महत्त्वाचे...

### मंत्री गिरीश महाजन यांच्या आश्वासनाने जय महाराष्ट्र संघटनेचे आंदोलन स्थगित

**जळगाव :** जळगाव जिल्हा परिषदेच्या जय महाराष्ट्र शासकीय निम शासकीय अधिकारी व कर्मचारी संघटना यांच्या आंदोलनामुळे जिल्हा परिषदेचे व जिल्ह्यातील सर्व पंचायत समितीतील कामकाज गेल्या चार दिवसांपासून ठप्प होते. जलसंपदा मंत्री ना. गिरीश महाजन यांनी फोनद्वारे संघटनेचे जिल्हा पालक अध्यक्ष सोनवणे यांच्याशी केलेल्या चर्चेनुसार व दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने गेल्या चार दिवसापासून लिपिक वर्गीय संवर्गाच्या मागण्यासाठी चाललेले लेखणी बंद आंदोलन शुक्रवारी तूर्तास मागे घेण्यात आले.
चर्चेसाठी जलसंपदा मंत्री यांनी आश्वस्त करत व ग्रामविकास मंत्री यांनी मागण्यासंदर्भात बैठक बोलावल्याच्या अनुषंगाने कामकाज बंद आंदोलन मागे घेण्यात आल्याचे कर्मचारी संघटनेचे नेत्यांनी जाहीर केले गेल्या चार दिवसापासून जिल्हा परिषदेच्या संदर्भात पंचायत समिती संदर्भात ज्या नागरिकांना अधिकारी व कर्मचारी यांना गैरसोयीला तोंड द्यावे लागले. त्यांच्या कामे होवू शकली नाहीत अशा साऱ्यांचे मनापासून क्षमा मागत बहुतेक संघटनांनी दिलेला पाठिंबा अधिकाऱ्यांनी दिलेले नैतिक पाठबळ यासाठी संघटनेच्या सर्व पदाधिकरी जिल्हा पालक अध्यक्ष आर. टी. सोनवणे, जिल्हा परिषद संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रमोद काळे, उपाध्यक्ष राजू सोनवणे, पुरुषोत्तम पाटील, गिरीश चौधरी, गणेश पाटील, पंकज पाचपो, नदीम मिर्झा सर्व कर्मचाऱ्यांनी आभार मानले आहेत .

### जळगावातील सम्राट कॉलनी, टीएमनगरात कचरा डेपोला सत्ताधाऱ्यांचाच विरोध

**जळगाव:** शहरातील सम्राट कॉलनी व टी.एम. नगर येथे कचरा डेपोसाठी तयार करण्यात येणाऱ्या रॅम्पला आणि तोल काट्याला महापालिकेतील भाजपाच्याच सत्ताधाऱ्यांनी विरोध केला आहे. दरम्यान आज महापालिकेच्या पायऱ्यांवर बसून सत्ताधाऱ्यांनीच घोषणाबाजी केल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. शहरातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी कचरा डेपोचे काम सुरू होणार आहे. सम्राट कॉलनी आणि टी.एम. नगरात २ हजार नागरिक राहतात. या भागात रॅम्प आणि तोलकाटा करण्याला स्थानिक रहिवाशांसह भाजपाच्या सत्ताधारी नगरसेवकांनीच विरोध केला आहे. प्रशासकीय काळात हा निर्णय झाल्याने सत्ताधाऱ्यांनी प्रशासनावर रोष व्यक्त केला. तसेच याठिकाणी रॅम्प आणि तोलकाट्याचे काम होऊ देणार नाही असा इशारा देत भाजपाच्या नगरसेवकांनी प्रशासकीय इमारतीच्या पायऱ्यांवर बसून आंदोलन केले. यावेळी महापौर दीपमाला काळे व उपमहापौर मनोज चौधरी यांनी नगरसेवकांशी चर्चा करून त्यांना आश्वासन दिले. या आंदोलनात गटनेते प्रकाश बालाणी यांच्यासह नगरसेवक सहभागी झाले होते.




### 'राष्ट्रीय आरोग्य मेळा'चे बैद्यनाथ, सिद्धायू डायमंड प्रायोजक

**शेगाव :** सर्वसामान्य जनतेला आयुर्वेद पद्धतीद्वारे आरोग्य लाभ प्रदान करण्याच्या उद्देशाने २५ ते २८ फेब्रुवारीदरम्यान येथील विसावा मैदानावर राष्ट्रीय आरोग्य मेळा घेण्यात आला. त्याचे उद्घाटन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते झाले. केंद्र सरकारचे आयुष मंत्रालय आणि अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलन यांच्यातर्फे मेळा घेण्यात आला. डायमंड स्पॉन्सर म्हणून देशातील प्रतिष्ठित आयुर्वेदिक कंपन्या बैद्यनाथ व सिद्धायू सहभागी झाल्या आहेत. बुधवारी (२५ फेब्रुवारी) दुपारी बाराला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते मेळ्याचे उद्घाटन झाले. या वेळी राज्यपाल आचार्य देवव्रत, आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री प्रतापराव जाधव आदी उपस्थित होते. सिद्धायूचे संचालक आणि बैद्यनाथचे अध्यक्ष सिद्धेश शर्मा, मार्केटिंग विभागाचे जनरल मॅनेजर अर्चित कुमरवार यांची विशेष उपस्थिती होती. आयुर्वेदाचे महत्त्व, उपयुक्तता आणि वैज्ञानिक आधार जनसामान्यांपर्यंत पोहोचविणे हा या मेळ्याचा मुख्य उद्देश होता. मेळ्यात डायमंड स्पॉन्सर बैद्यनाथ व सिद्धायू यांनी स्टॉलद्वारे विविध आयुर्वेदिक औषधांचे प्रदर्शन केले तसेच आयुर्वेदिक साहित्य (पुस्तके) सवलतीच्या दरात उपलब्ध करून दिली. देशातील इतर नामांकित आयुर्वेदिक कंपन्यांनीही यात सक्रिय सहभाग नोंदवून स्टॉल उभारले. त्यामुळे हा मेळा आयुर्वेद प्रचार-प्रसार आणि जनजागृतीच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण उपक्रम ठरला.

### देवगिरी शॉर्ट फिल्म फेस्टिवलचे आज उद्घाटन

**जळगाव :** अजिंठा फिल्म सोसायटी आणि कान्ह ललित कला केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५ आंतरराष्ट्रीय देवगिरी शॉर्ट फिल्म फेस्टिवलला आज (दि.२८) पासून सुरुवात होणार आहे. सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड.आशिष शेलार, पालकमंत्री गुलाबराव पाटील, अभिनेते मनोज जोशी, अभिजित गोखले, उद्योजक अशोक जैन, उद्योजक प्रकाश चौबे, आ.राजूमामा भोळे, डॉ.शिल्पा बेंडाळे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत या फेस्टिवलचा उद्घाटन सोहळा पार पडणार आहे. दोन दिवस रंगणाऱ्या या महोत्सवाचा जळगावकर नागरीकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

## धनादेश प्रकरणी आरोपीस शिक्षा

**जळगाव :** धनादेश अनादर (चेक बाउन्स) प्रकरणी दाखल प्रकरणात न्यायालयाने आरोपीला दोषी धरत तीन महिन्याची साधी शिक्षा सुनावली. तसेच तक्रारदार यांना चेक रक्कमेच्या दुप्पट म्हणजे चार लाख ७८ हजार रुपये भरपाई देण्याचा आदेश दिला. निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स ॲक्ट अंतर्गत दाखल धनादेश अनादर प्रकरणात अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी ( न्यायालय क्र. चार) न्या. जयदीप एम. चौहान यांनी हा निकाल सोमवारी (१६ फेब्रुवारी) दिला.

तक्रारदार चरणदास प्रल्हाद चव्हाण (रा. लोणवाडी, जळगाव) यांनी संशयित राम पाटील (रा समनेर, ता. पाचोरा, सध्या जळगाव) यांच्याविरुद्ध निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स ॲक्ट १८८१ च्या कलम १३८ सह १४१ अंतर्गत तक्रार दाखल केली होती. तक्रारीनुसार, १६ फेब्रुवारी २०१८ रोजी संशयित आरोपीने तक्रारदारांकडून ४७.८० क्विंटल कापूस खरेदी केला. या व्यवहाराची एकूण रक्कम २ लाख ३९ हजार रुपये इतकी होती. मोबदल्यात संशयिताने त्याच दिवशी धनादेश दिला. व्यवहार साक्षीदारांच्या उपस्थितीत झाल्याचे न्यायालयात नमूद करण्यात आले. दरम्यान काही दिवसांनी धनादेश तातडीने सादर करु नका, असे तक्रारदार यांना फोन करुन संशयिताने सांगितले. दोन महिन्यांनंतर तक्रारदारांनी १४ मे २०१८ रोजी येथील स्टेट बँक ऑफ इंडिया येथे धनादेश सादर केला असता तो ''अपुऱ्या निधीमुळे'' अनादरित झाला.या प्रकरणी तक्रारदाराने वकिलामार्फत तक्रार न्यायालयात दाखल केली. न्यायालयात या प्रकरणात धनादेश, बँकेचा रिटर्न मेमो, नोटीस व पोस्ट पावत्या आदी कागदपत्रे तसेच साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली.कायदेशीर वसुलीयोग्य कर्ज अस्तित्वात असल्याचे तक्रारदार यांनी सिध्द केल्याने आरोपीला न्यायालयाने दोषी ठरविले. धनादेश अनादर प्रकरणांमध्ये न्यायालयाने दुप्पट रक्कम भरपाईचा आदेश देत कडक भूमिका घेतल्याचे या निकालातून स्पष्ट झाले आहे.तक्रारदार यांच्यातर्फे ॲड. एम.एस. दंडगव्हाळ यांनी कामकाज पाहिले.

## निधन वार्ता



### सुधाकर चौधरी; आज अंत्ययात्रा

**अडावद (ता. चोपडा) :** येथील नेहरू चौकातील रहिवासी सुधाकर सदाशिव चौधरी (वय ८२) यांचे शुक्रवारी (२७ फेब्रुवारी) वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा शनिवारी (२८ फेब्रुवारी) सकाळी दहापश त्यांच्या राहत्या घरातून निघेल. त्यांच्या पश्चात मुलगा, पाच मुली, सून, नातवंडे, असा परिवार आहे. प्रमोद चौधरी यांचे वडील, तर वरुण चौधरी यांचे ते आजोबा होत.

# धुळ्यात नवउद्योजकांना अतिरिक्त अनुदानाची संधी

## आमदार अग्रवाल यांच्या पाठपुराव्याला यश; जिल्ह्याला 'ड प्लस'पेक्षा अधिकच्या दर्जामुळे लाभ


देवेंद्र फडणवीस उदय सामंत

**धुळे :** राज्य शासनाने नवीन औद्योगिक धोरण २०२५ मध्ये धुळे जिल्ह्याला 'ड प्लस'पेक्षा अधिकचा दर्जा जाहीर केला आहे. शासनाच्या या निर्णयामुळे शहरासह जिल्ह्यात नवीन उद्योग उभारणाऱ्या नवउद्योजकांना त्यांच्या गुंतवणुकीच्या प्रमाणात अतिरिक्त १५ टक्के अनुदानाच्या लाभाची संधी प्राप्त होणार आहे. यासंदर्भात आमदार अनुप अग्रवाल यांनी मुख्यमंत्री व उद्योगमंत्र्यांकडे सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे.

यासंदर्भात आमदार अग्रवाल यांनी म्हटले आहे, की धुळे जिल्ह्याशेजारील जळगाव, नाशिक, छत्रपती संभाजीनगर आदी जिल्ह्यांमध्ये औद्योगिक विकासाला चालना मिळत गेल्याने ते विकासाबाबत धुळ्याच्या खूपच पुढे गेले आहेत. त्यातुलनेत धुळे जिल्ह्याची मात्र नेहमीच उपेक्षा झाली. यामुळे धुळे जिल्हा आजही अविकसित म्हणून ओळखला जातो. वास्तविक, सद्यःस्थितीत धुळे जिल्ह्यात अक्कलपाडा प्रकल्प, सुलवाडे-जामफळ-कनोली उपसा सिंचन प्रकल्प पूर्णत्वास येत असल्याने उद्योगांसाठी पाणीपुरवठ्याचा विषय निकाली निघाला आहे. याशिवाय, धुळे जिल्ह्यातून सात राष्ट्रीय महामार्गांचे जाळे विणले गेले असून, धुळे-नरडाणा रेल्वेमार्गाचे कामही प्रगतिपथावर आहे. तसेच दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर प्रकल्पांतर्गतही धुळे जिल्ह्याची निवड झाली आहे. यामुळे जिल्ह्यातील नरडाणा व धुळे शहरातील औद्योगिक वसाहतींच्या विकासाला चालना मिळू शकते. त्यासाठी शासनाच्या नवीन औद्योगिक धोरणात धुळे जिल्ह्याला 'ड प्लस'पेक्षा अधिकचा दर्जा मिळावा, तर निश्चितच औद्योगिक विकासाला चालना मिळून धुळे जिल्हाही प्रगतीच्या दिशेने झेपावू शकेल.

या पार्श्वभूमीवर नवीन औद्योगिक धोरणात जिल्ह्याला 'ड प्लस'पेक्षा अधिकचा दर्जा द्यावा, यासाठी आमदार अनुपा अग्रवाल यांनी गेल्या वर्षी जूनमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उद्योगमंत्री उदय सामंत यांना निवेदने देत यासंदर्भात बैठक घेऊन या प्रस्तावर तोडगा काढण्याबाबत विनंतीही केली होती. तसेच या मागणीबाबत मुख्यमंत्री फडणवीस, उद्योगमंत्री सामंत यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा सुरू होता.



> धुळे जिल्ह्याला नवीन औद्योगिक धोरणात 'ड प्लस'पेक्षा अधिकचा दर्जा मिळाल्याने नवीन उद्योग सुरू करणाऱ्या उद्योजकांना त्यांच्या गुंतवणुकीच्या प्रमाणात १५ टक्के अतिरिक्त अनुदानाचा लाभ मिळणार आहे. आता हा निर्णय झाल्यामुळे निश्चितच अनेक नवीन उद्योजक आकर्षित होऊन जास्तीत जास्त गुंतवणूक होऊन नवीन उद्योग सुरू करण्यास प्रोत्साहन मिळेल. तसेच जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला चालना मिळून धुळे जिल्हाही प्रगतीच्या दिशेने झेपावू शकेल. शिवाय स्थानिक युवकांना रोजगाराच्या जास्तीत जास्त संधी प्राप्त होणार आहेत.
> **- अनुप अग्रवाल (आमदार, धुळे शहर)**

याबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी जाहीर केलेल्या नवीन औद्योगिक धोरणात जिल्ह्याला 'ड प्लस'पेक्षा अधिकचा दर्जा बहाल केला. यामुळे जिल्ह्यात नवउद्योजकांना त्यांच्या गुंतवणुकीवर अतिरिक्त १५ टक्के अनुदानाचा लाभ मिळण्याची संधी प्राप्त झाली आहे. या निर्णयामुळे धुळे शहरासह जिल्ह्यात जास्तीत जास्त उद्योग सुरू होण्यास प्रोत्साहन मिळणार असून, जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला चालना मिळणार आहे. शासनाच्या या निर्णयाबद्दल आमदार अग्रवाल यांनी मुख्यमंत्री फडणवीस व उद्योगमंत्री सामंत यांचे आभार मानले आहेत.

# भ्रष्टाचाराला खतपाणी घालणाऱ्यांना पदमुक्त करा

## परिवहनमंत्र्यांसह राज्य लोकसेवा आयोग अध्यक्षांची निवड रद्द करण्याची प्रजाशक्ती क्रांती दलातर्फे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, २७ फेब्रुवारी**

उपप्रादेशिक परिवहन विभागात मोटार वाहन निरीक्षक नितीन सावंत व सुरेंद्र चौरे यांच्याकडून होत असलेल्या भ्रष्टाचारासंदर्भात वेळोवेळी निवेदने तसेच वर्षभरापासून साखळी उपोषण केले जात आहे. मात्र, याची दखल शासनाने घेत परिवहन आयुक्त विवेक भिवनवर आणि मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडून कोणतीही कारवाई झाली नाही. याबाबत परिवहनमंत्री आणि तत्कालीन आयुक्त तथा राज्य लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष भिवनवर यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राजीनामा घेत पदमुक्त करावे, अशा मागणीचे निवेदन उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांना प्रजाशक्ती क्रांती दलातर्फे देण्यात आले.



उपप्रादेशिक परिवहन विभागांतर्गत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत आहे. यासंदर्भात जळगाव विभागात कार्यरत असलेल्या मोटार वाहन निरीक्षक नितीन सावंत व सुरेंद्र चौरे यांच्या कार्याविषयी लेखी पुराव्यांसह निवेदन देऊनही कोणतीही कार्यवाही कारवाई झाली नाही. यात परिवहन आयुक्त विवेक भिवनवर यांचे उपप्रादेशिक परिवहन विभागात होत असलेल्या भ्रष्टाचाराला पाठबळ या दोन्ही अधिकाऱ्यांना असल्याशिवाय तसेच परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांचा पाठिंबा वा छुपा आशीर्वाद असल्यानेच कोणतीही कारवाई झालेली नसल्याचेच दिसून येत आहे. पुरावे देऊनही कोणतीही कारवाई वरिष्ठ पातळीवरून झाली नाही. याचा अर्थ परिवहन आयुक्त व परिवहनमंत्री हे भ्रष्टाचाराला जबाबदार आहेत, तसेच परिवहन आयुक्त भिवनवर यांना राज्य लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी दिली. यावरून प्रशासन भ्रष्टाचारमुक्त होणार नसल्याचेच दिसून येत आहे. यात लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष भिवनवर यांची निवड रद्द करीत मोटार वाहन निरीक्षक नितीन सावंत व सुरेंद्र चौरे यांना सेवेतून तत्काळ बडतर्फ करावे आणि आजपर्यंत दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने तत्काळ मागण्या मान्य कराव्यात; अन्यथा जळगाव उपप्रादेशिक कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्यात येईल, असा इशारा प्रजाशक्ती क्रांती दलाचे प्रसिद्धिप्रमुख राहुल मराठे यांनी निवेदनाव्दारे दिला आहे.

निवेदनावर प्रा. अशोराज तायडे, सतीश मोरे, मीराताई सोनवणे, मीराताई बावस्कर, अमित सिराज तडवी, अमित नामदार तडवी, वासुदेव भोई, चंद्रकला सोनवणे, सरला सोनवणे, इंद्रावणी इंगळे, खटाबाई सोनवणे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# शिंदखेडा तालुक्यातील ७ गावांची 'अमरावती'तून तहान भागणार

## जिल्हाधिकारी विसपुते : प्रकल्पातून आवर्तन सोडणार

**धुळे :** अमरावती मध्यम प्रकल्पातून शिंदखेडा तालुक्यातील सात गावांसाठी पिण्याच्या पाण्याचे आवर्तन सोडण्यात येणार आहे. याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी निर्गमित केले आहेत.

शिंदखेडा तालुक्यातील कामपूर, विखरण, खर्दे बुद्रुक, मांडळ, मेथी, रहिमपुरे आणि सोनशेलू या गावांसाठी ६९.१६ दशलक्ष घनफूट इतके आरक्षित पाणी प्रकल्पाच्या उजव्या कालव्यातून एका आवर्तनात सोडण्यात येणार आहे. संबंधित गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे.

धरणातील पाणी संबंधित गावांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी ग्रामपंचायत, तहसीलदार, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता, पंचायत समिती, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे उपअभियंता, पोलीस निरीक्षक, पाटबंधारे विभागाचे उपअभियंता, तलाठी व ग्रामसेवकांवर संयुक्तपणे सोपविण्यात आली आहे.

पाटबंधारे विभागाने संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पथक स्थापन करून कालव्यातून अवैधरीत्या पाणी अडवणे अथवा उपसा करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी. तसेच पाणीपट्टीची रक्कम जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनी पाटबंधारे विभागाकडे जमा केल्यानंतरच पाणी सोडण्याची कार्यवाही करावी, तसेच संबंधित सात गावांना आवर्तनाबाबत पूर्वसूचना देण्याचे निर्देशही जिल्हाधिकारी विसपुते यांनी दिले आहेत.

# संत गाडगे महाराजांना नवापूरकरांकडून अभिवादन

## प्रतिमापूजन, व्याख्यानांसह विश्वकर्मा योजनेवर मार्गदर्शन

**नवापूर :** तालुका परिट सेवा मंडळातर्फे संत शिरोमणी गाडगे महाराजांची जयंती विविध कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली. संत गाडगेबाबांचे प्रतिमापूजन, बाबांच्या जीवनकार्यावर व्याख्यान व केंद्र शासनाच्या विश्वकर्मा योजनेबाबत माहिती देण्यात आली.

कार्यक्रम शहरातील महिला मंडळाच्या सभागृहात झाले. व्यासपीठावर जिल्हा मंडळाचे सल्लागार महेंद्र जाधव अध्यक्षस्थानी होते. प्रमुख अतिथी म्हणून नवापूर मंडळाचे ज्येष्ठ सल्लागार पंढरीनाथ ईशी, अशोक खैरनार, भटू जाधव, तालुकाध्यक्ष राजेंद्र जाधव उपस्थित होते.



या वेळी भटू जाधव म्हणाले की, गाडगेबाबा एक वैज्ञानिक दृष्टी आणि सुयोग्य व्यावहारिक ज्ञान असलेले संत होते. त्यांनी तत्कालीन समाजात असलेल्या अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी-परंपरांवर घणाघात केला. व्यसनमुक्तीवर त्यांनी विशेष भर दिला. प्रत्येकाचे जीवन आनंदी कसे होईल यासाठी त्यांनी कीर्तनाच्या माध्यमातून समाजप्रबोधन व जनजागृती केली. समाजाच्या गरजेनुसार धर्मशाळा, छोटे-मोठे दवाखाने आणि शाळा सुरू केल्या. शिक्षणानेच माणसाचे जीवनमान उंचावू शकते, हे सोदाहरण पटवून दिले. अनावश्यक खर्च टाळायला पाहिजे. ही गोष्ट जनमानसात प्रकर्षाने रुजविली. शेवटच्या श्वासापर्यंत त्यांनी समाजोत्थानासाठी अथक प्रयत्न केले असल्याचे सांगत बाबांच्या जीवनकार्याची माहिती दिली.

यावेळी रामचंद्र सोनवणे यांनी केंद्र शासनाच्या विश्वकर्मा योजनेबाबत माहिती देत योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन केले. महेंद्र जाधव म्हणाले की, स्वच्छतेतून समृद्धीकडे जाण्याचा संदेश देणाऱ्या संत गाडगेबाबांच्या विचारांची नितांत गरज आहे. कीर्तनाचा उपयोग त्यांनी समाजप्रबोधनासाठी केला. बाबा वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले कृतिशील संत होते. त्यांचे विचार उच्च कोटीचे व परिवर्तनशील होते. बाबांचे कार्य विधायक होते म्हणूनच त्यांच्या कार्याची आठवण आजही कायम असल्याचे सांगितले

कार्यक्रमात जगदीश चव्हाण, हेमंत जाधव, शांतिलाल ठाकरे, आनंद जाधव, कमलेश बुंदेला, हर्षल बच्छाव, नैमिष बुंदेला, विजय जाधव, विपुल जाधव, छोटूलाल ठाकरे, निखिल जाधव, भरत बाविस्कर, संदीप बच्छाव, घनश्याम पवार, महेश शेवाळे, मालव बुंदेला, प्रज्ञेश जाधव, गितेश जाधव, वैभव ठाकरे, जयेश बच्छाव, क्रिष्णा जाधव, प्रेम जाधव आदींसह समाजबांधव उपस्थित होते. तालुकाध्यक्ष राजेंद्र जाधव यांनी प्रास्ताविक केले. उपाध्यक्ष शांतिलाल ठाकरे यांनी सूत्रसंचालन केले. भरत बाविस्कर यांनी आभार मानले.

# जळगाव सी.ए. शाखा पश्चिमी क्षेत्रीय स्तरावर प्रथम

## शाखेचे अध्यक्ष सी.ए. हितेश आगीवाल यांची पत्रकार परिषदेत माहिती

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, २७ फेब्रुवारी**

भारतीय सनदी लेखाकार संस्थानतर्फे जळगाव शाखेला पश्चिमी क्षेत्रीय (महाराष्ट्र, गुजरात, गोवा) स्तरावर उत्कृष्ठ शाखा म्हणून प्रथम पारितोषिक देवून गौरविण्यात आले आहे. जळगाव शाखेने २०२५ या वर्षामध्ये राबविलेल्या उपक्रमांची फलश्रृती म्हणून हा सन्मान करण्यात आला असल्याची माहिती, जळगाव शाखेचे अध्यक्ष सी.ए. हितेश आगीवाल यांनी पत्रकार परिषदेत दिली.

गजानन कॉलनीतील आयसीएआय भवन येथे या पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपाध्यक्ष सी.ए. रोशन रुनवाल, सचिव सी.ए. सोहन नेहेते, खजिनदार सी.ए. लक्ष्मीकांत लाहोटी, स्वीकृत सदस्य सी.ए. हितेश जैन आदी उपस्थित होते.

पुढे बोलतांना सी.ए. आगीवाल म्हणाले की, भारतीय अर्थव्यवस्थेसाठी सीएंची मोठी गरज वाढली आहे. ही बाब लक्षात घेवून जळगाव शाखेतर्फे विद्याज्योती स्कॉलरशिप व विद्यार्थी दत्तक योजनेची घोषणा करण्यात आली आहे. ही योजना विशेषतः ज्या विद्यार्थ्यांच्या कोणत्याही एका पालकाचे निधन झाले आहे, तसेच ज्या विद्यार्थ्यांचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न ३ लाखांपेक्षा कमी आहे, अशा गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि सी.ए.चे शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील शेतकरी, आदिवासी, मध्यमवर्गीय कुटूंबातील होतकरु मुले सीए सारख्या प्रोफेशनल शिक्षणापासून वंचित राहू नयेत, त्यांना चांगल्या सोयी-सुविधा मिळाव्यात, त्यांना मुख्यप्रवाहात आणण्याचे काम जळगाव शाखेतर्फे केले जाणार आहे. कुटूंबातून जास्तीत-जास्त सीए निर्माण व्हावेत, हा या योजनेमागचा हेतू असल्याचेही ते यावेळी म्हणाले.

**गरजू विद्यार्थ्यांना घेता येणार दत्तक**

या योजनेंतर्गत दर महिन्याला लागणारी फी, ग्रंथालय, परीक्षा फी, नोंदणी फी मध्ये देखील जळगाव शाखा योगदान देणार आहे. एखाद्या सीएला एखादा विद्यार्थ्याला शिक्षणासाठी दत्तक घेता येणार असल्याचेही सी.ए. हितेश आगीवाल यांनी यावेळी सांगितले.

**सी.ए. हितेश आगीवाल यांच्या नेतृत्वाला यश**

जळगाव शाखेने सी.ए. हितेश आगीवाल यांच्या नेतृत्वाखाली २०२५ या वर्षात 'प्रयास एक पाऊल प्रगतीकडे' या संकल्पनेअंतर्गत सी.ए. सदस्यांसाठी विविध तज्ज्ञांची व्याख्याने, चर्चासत्र, कार्यशाळा, रक्तदान, आरोग्य तपासणी शिबीर, योगा प्रशिक्षण, वृक्षारोपण, सी.ए. सायकलिंग, सी.ए. डे सप्ताह, गणेशोत्सव, ग्रीन इंडिया अंतर्गत प्लास्टिकमुक्त शाखा अभियान, कॅपिटल मार्केट परिषद, राष्ट्रीय परिषद, स्वच्छता मोहीम, अपंग सेवा मंडळ संचलित शाळेतील मुकबधीर विद्यार्थ्यांना अन्नदान व शैक्षणिक साहित्याचे वाटप, ग्रामीण भागातील मुलांसाठी ऑनलाइन करिअर कौन्सिलिंग, आर्थिक व कर साक्षरता अभियान असे विविध उपक्रम राबविले आहेत.

# शेतकऱ्यांनो, कापसाचे उत्पन्न अन् जमिनीचे आरोग्य जपा

## बेकायदेशीर कापूस बियाणे टाळण्याचे व्यावसायिकांचे आवाहन

**धुळे :** बेकायदेशीर मार्गाने विकल्या जाणाऱ्या विनापरवाना एचटीबीटी कापूस बियाण्यांबाबत कृषितज्ज्ञ आणि बीज उद्योगातील प्रतिनिधींनी कापूस उत्पादकांना सातत्याने सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. अनधिकृत मार्गांनी विकल्या जाणाऱ्या बियाण्यांची उगवणक्षमताही नसते. या बियाणांना शास्त्रीय मान्यता नसते. अशा बियाणांमुळे पिकाची वाढ अनिश्चित राहते. परिणामी, शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असते. त्यामुळे शेतकऱ्यांनी केवळ अधिकृत विक्रेत्यांकडूनच प्रमाणीत बियाणे खरेदी करावेत, असे आवाहन तज्ज्ञांनी केले आहे.

बाधित प्रदेशातून मिळालेल्या क्षेत्रीय अहवालांनुसार, अशा अनधिकृत बियाण्यांच्या वापरामुळे शेतक-यांच्या उत्पादनात मोठी घट झाल्याचे समोर आले आहे. हवामानातील बदल, किड्यांचा वाढता प्रादुर्भाव आणि बेकायदेशीर बियाण्यांचा वापर या तिहेरी संकटामुळे १० ते १५ क्विंटल कापूस पिकणा-या शेतात आता केवळ ४ ते ६ क्विंटलपर्यंत उत्पादनात घट झाली आहे. या घटत्या उत्पादनाबद्दल



विदर्भातील शेतकऱ्याने आपली व्यथा मांडली. ''सुरुवातीला ही बेकायदेशीर बियाणे स्वस्त वाटत होती. प्रत्यक्षातील वापराचा अनुभव अत्यंत वाईट होता. या बियाणांमुळे पिकाची वाढ समान पद्धतीने होत नाही. माझ्या उत्पादनात मोठी घट झाली. पिकाचे नुकसान झाल्याने परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली. या नुकसानीला जबाबदार धरण्यासाठी किंवा जाब विचारण्यासाठी कोणीही उपलब्ध नव्हते.'' या शब्दांत शेतकऱ्याने दुःख व्यक्त केले.

बेकायदेशीर एचटीबीटी बियाण्यांच्या वापरामुळे ग्लायफोसेटसारख्या तणनाशकांवरील अवलंबित्व मोठ्या प्रमाणात वाढले आहे. या बियाण्यांमध्ये तणनाशक सहन करण्याची क्षमता असल्याने शेतकर वारंवार फवारणी करतात. यामुळे भविष्यात साध्या औषधांनाही दाद न देणारी भयंकर तणे तयार होण्याचा धोका निर्माण झाला आहे. या बियाण्यांच्या वापराने शेतीचा खर्चही वाढतो. जमिनीचा पोत बिघडतो. तिची दीर्घकालीन सुपीकता कमी होते. जमिनीचे आरोग्य जपण्यासाठी आणि तणांचे कामयस्वरूपी नियंत्रण करण्यासाठी कृषी शास्त्रज्ञ आणि धोरणकर्ते आता एकात्मिक तण व्यवस्थापन पद्धतीचा आग्रह धरत आहेत. यामुळे केवळ तणनाशकांवर विसंबून न राहता पारंपरिक मशागत, यांत्रिकीकरण, विविध शास्त्रीय पद्धतींचा वापर करुन शेती करण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

रासी सीड्सचे अध्यक्ष डॉ. एम. रामासामी यांनी बेकायदेशीर एचटीबीटी कापूस बियाण्यांच्या वाढत्या प्रसारावर चिंता व्यक्त केली. ते म्हणाले, या बियाण्यांच्या अनिर्बंध प्रसारामुळे कापसाचे उत्पादन घटले. कापसाच्या धाग्याचा दर्जाही खालावला. याचा थेट फटका शेतक-यांना बसला आहे. भविष्यात बियाणे क्षेत्रातील नवनवीन संशोधन आणि नव्या तंत्रज्ञानासाठी होणारी गुंतवणूक धोक्यात येईल. गोदरेज अॅग्रोव्हेटसह शेतकऱ्यांसाठी कार्यरत असणाऱ्या विविध संस्थांनीही आता संबंधित विषयाशी निगडीत संपूर्ण माहिती घेऊनच विचारपूर्वक निर्णय घेण्याचे ठरवले आहे.

गोदरेज अॅग्रोव्हेटचे क्रॉप प्रोटेक्शन बिझनेसचे मुख्य कार्यकारी अधिकारी एन. के. राजवेलू म्हणाले की, केवळ ताणनाशकांवर अवलंबून न राहता एकात्मिक तण व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे. यामुळे केवळ शाश्वत उपाययोजना अबाधित राहते. अपेक्षित उत्पादन मिळते तसेच दीर्घकाळ जमिनीचा कस आणि आरोग्य टिकवण्यासही मदत होते. शेतकऱ्यांनी नेहमीच नामांकित कंपन्यांची आणि कायदेशीररीत्या मान्यताप्राप्त बियाणेच निवडावीत, असा आग्रहाचा सल्ला तज्ज्ञांनी दिला आहे. आज निवडलेली बियाणे उद्याच्या भरघोस उत्पन्नासाठी आणि कापूस शेतीची परिसंस्था टिकवण्यासाठी आवश्यक आहे. यामुळे पिकांचे संरक्षण होते आणि भविष्यातील शेतीचा पायाही भक्कम होतो, असे तज्ज्ञांनी सांगितले.

Kirloskar
जगप्रसिध्द **किर्लोस्कर** कंपनीचे सर्व प्रकारचे घरगुती, शेती उपयोगी, औद्योगिक व जीनींग प्रेसींग पंप, मोटर्स अल्टरनेटर्स उपलब्ध.


संपर्क : निलेश संघवी
M.9373232643
• अधिकृत विक्रेता •
संघवी पाईप
'कस्तुरी' २६, नवीपेठ, जुन्या बस स्टॅन्ड समोरील गल्लीत, जळगांव
☎ 2232641 To 2232645

### जाहिर नोटीस

तमाम लोकांना, वित्तीय संस्थांना, बँकांना, सरकारी क्रेडीट सोसायटी, को. ऑप. बँक, पतसंस्था, निमसरकारी कार्यालय यांना मला माझे पक्षकार **श्री. साकेत अतुल अग्रवाल,** रा. जळगांव, यांनी दिलेल्या हक्क व अधिकार अन्वये या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**१) मिळकतीचे वर्णनः- मौजे मेहरुण,** ता. जि. जळगांव मधील सर्व्हे नं.४२६/२/१/अ, सि.स.नं.५३३५ यांसी क्षेत्र ९८६२.५० चौ. मी. यातील गृप हौसिंग प्लॉट नं.सी यांसी क्षेत्र ४२०८.०० चौ.मी. यावरील बांधीव क्रिम सेंटर या बांधीव इमारतीतील **स्टिल्ट मजल्यावरील फ्लॅट नं.५ यांसी बांधीव क्षेत्र १२३.०५ चौ.मी. व स्टिल्ट मजल्यावरील फ्लॅट नं.६ यांसी बांधीव क्षेत्र १०७.०५ चौ.मी., यांसी चतुःसिमाः पुर्वेस-** फ्लॅट नं.६ आणि २, **पश्चिमेस-** स.नं.४२६/२/१अ मधील मोकळी जागा व पुढे १२ मिटर रोड, **उत्तरेस-** फ्लॅट नं.६ व स.नं.४२६/२/१अ मधील मोकळी जागा, **दक्षिणेस-** स.नं.४२६/२/१अ मधील गार्डनची मोकळी जागा. येणेप्रमाणे मिळकतीत जाणे-येणेचे, वहीवाटीचे रस्त्यासह व तदंगभुत वस्तुंसूध्दा. **२)** सदर मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची असुन सदर मिळकतीवर कोणाचाही काहीएक हक्क, हितसंबंध, बोजा, तारण, गहाण, जप्तीत, जामीनकीत, कर्ज प्रकरण, वाटणीत, वारसा हक्कात, मेहेरमध्ये, संबंध दिशा व सिमा क्षेत्र वगैरे बाबत कुठल्याही हक्क, दावा, अधिकार असल्यास खालील सही करणार यांच्याशी जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **७ (सात)** दिवसांचे आत समक्ष भेटून कागदोपत्री पुरावा दाखवुन तशी खात्री पटवुन आपली लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. तसा कोणताही आक्षेप वर मुदतीत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध, बोजाविरहीत व क्लिअर मार्केटेबल टायटलची आहे असे समजुन माझे अशिल सदर मिळकतीचा पुढील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मग तनंतर सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही, ही जाहीर नोटीस दिली. **३)** तसेच वर कलम १ यात वर्णन केलेल्या फ्लॅट मिळकतीपैकी फ्लॅट नं.५ हा ओॲसिस सिरॅमिक्स प्रा.लि. करीता डायरेक्टर श्री. अश्विन जयंतीलाल शाह, रा.१५१, गुजराथी गल्ली, जिल्हा पेठ, जळगांव यांनी मे. शामा फायर वर्क्स इंडस्ट्रीज, जळगांवचे भागीदार व वहिवाटदार म्हणुन श्री. हरीष शामलाल मिलवाणी व अरिहंत कन्स्ट्रक्शन, जळगांवचे भागीदार, वहिवाटदार व डेव्हलपर्स म्हणुन श्री. मनिष छबीलदास शाह, रा. नुतन मराठा कॉम्पलेक्स, जळगांव यांचेकडुन दि. २४/१०/२००१ रोजी खरेदीखतान्वये विकत घेतलेली असुन त्याबाबतचे खरेदीखत दस्त नं.५८८६/२००१ अन्वये मे. दुय्यम निबंधक सो, जळगांव-१ यांचे दप्तरी नोंदविलेले आहे. **४)** सदर दस्ताचे दस्त नं.५८८६/२००१, दि.२४/१०/२००१ रोजीच्या खरेदीखताचा मुळ दस्त, मुळ एस.आर.आर. पावती, मुळ **इंडेक्स- २** चा उतारा गहाळ झालेला असुन सदर दस्ताची आम्हाला आवश्यकता आहे. सदर दस्त कोणालाही आढळ झाल्यास माझ्यावतीने नोटीस देणार ॲडव्होकेट यांचेकडे आणुन द्यावेत. या व्यतिरिक्त अजुनही काही व्यवहार असल्यास तसे हरकतीद्वारे कळवावे. याउपर सदरचा दस्त न आढळल्यास आमचे अशिल **पुढील बँकेसह संपूर्ण/कर्ज प्रकरण व्यवहार करण्यास मोकळे राहतील.** सदरची जाहीर नोटीस आमचे अशिलांनी सांगितलेवरुन, माहिती दिलेवरुन आज रोजी अशिलांचे खर्चाने प्रसिध्दीस दिली आहे.

**जळगांव**
**दिनांकः-** २७/०२/२०२६

सही/-
**ॲड. शैलेश रविकांत नागला**
**ऑफिसः-** फ्लॅट नं. ३ पहिला मजला, कालिदास चेंबर्स (श्रध्दा अपार्टमेंट) शाहू कॉम्प्लेक्स जवळ, जळगांव.
मो.नं.८२०८००९६८९

हे वृत्तपत्र सर्जना मीडिया सोल्युशन्स प्रा. लि. जळगाव, धुळे, नंदुरबारकरिता मुद्रक व प्रकाशक **संजय प्रभाकर नारखेडे** यांनी **पी.एम.उद्योग**, डी-८९, एम.आय.डी.सी., जळगाव, जि.जळगाव येथे छापून गाळा क्रमांक ४, गोलाणी मार्केट, जळगाव येथे प्रकाशित केले आहे. * संपादक : **चंद्रशेखर दिगंबर जोशी** यांची पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी आहे. ■आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६, ■पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६.
■ फोन : ०२५७ - २२४२०३१, २२४२०३२, फॅक्स : २२४२०३३. ■E-mail - jaltbharat@gmail.com
■ editor.tarunbharat.jalgaon@gmail.com, ■E-paper : epaper.tarunbharatlive.com

जळगाव तरुण भारत
www.tarunbharatjalgaon.com






## महत्त्वाचे

### जलप्रदूषणविरोधात वकिलाचे आज मेहरुण तलावात आंदोलन

**जळगाव :** मेहरुण तलावात मोठ्या प्रमाणात प्रदुषण होत आहे. हे जल प्रदुषण थांबविण्यात यावे, यामागणीसाठी ॲड. ज्ञानदेव देविदास वाणी हे शनिवारी (२८ फेब्रुवारी) तलावाच्या पाण्यात उभे राहून आमरण उपोषण पुकारणार आहेत. सकाळी दहा वाजता हे आंदोलन सुरू होईल. निसर्गप्रेमी नागरिकांनी उपस्थिती द्यावी,अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

### जळगावात कष्टकरींसाठी १२ रोजी महिला दिन

**जळगाव :** कष्टकरी महिलांसाठी १२ मार्च रोजी महिला दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. येथील वुमेन्स अँड चाईल्ड केअर प्लस या संस्थेमार्फत या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी तीन वाजता कष्टकरी महिलांसाठी वेशभूषा स्पर्धा तसेच त्यांच्या पाल्यांसाठी ड्रॉइंग आणि नृत्य स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहेत. बक्षिस वितरण प्रसंगी मान्यवर मार्गदर्शन करतील. यावेळी कष्टकरी महिलांना गृहपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात येईल. १२ मार्च रोजी दुपारी चार वाजता एसएमआयटी कॉलेजवळ सुरत रेल्वे गेट परिसरातील आधार ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभागृहात हा कार्यक्रम होत आहे.

### पैशांच्या मागणीतून विवाहितेचा छळ

**जळगाव :** हॉटेल व्यवसाय वाढविण्यासाठी दहा लाख रुपये घेऊन आणण्याची मागणी करत २७ वर्षीय विवाहितेचा सासरी मानसिक शारिरीक छळ करत चापटाबुक्क्यांनी मारहाण केली. या जाचाला कंटाळून विवाहितेने तक्रार दिली. १० जानेवारी २१ ते २७ फेब्रुवारी २०२५ पावेतो पीडितेला त्रास देण्यात आला. याप्रकरणी पती हिमांशु जोशीसह सासु, सासरे, मोठा जेठ (रा.माखीनगर सोसायटी जवळ नवीन व्हीआयपी रोड वडोदरा, गुजरात) यांच्यासह एकुण सात जणांविरोधात रामानंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. हवालदार संजीव मोरे तपास करीत आहेत.

### उपचारात अनोळखीचा मृत्यू

**जळगाव :** अंदाजे ३५ ते ४० वर्षीय अनोळखी इसम अत्यवस्थ होऊन कोसळला होता. रविवारी (२२ फेब्रुवारी) दुपारी ४.४० वाजता ही घटना शहरातील महाराष्ट्र बँकेसमोर रस्त्यावर घडली होती. प्रत्यक्षदर्शी नागरिकांनी रुग्णवाहिका बोलवून त्याला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले होते. उपचार सुरू असताना अनोळखीचा गुरुवारी (२६ फेब्रुवारी) रात्री ९.४० वाजता मृत्यू झाला.या प्रकरणी जिल्हापेठ पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. ओळख पटवून नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घ्यावा,असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. सहायक फौजदार संजय सोनवणे हे तपास करीत आहेत.

### पार्किंगमधून दुचाकी लंपास

**जळगाव :** नवीन बसस्थानकाच्या पाणपोईनजिक पार्कींगमध्ये लावलेली हिरो दुचाकी ( एमएच १९ बीएस १५७३) चोरट्याने लंपास केली. मंगळवारी (२४ फेब्रुवारी) सकाळी सहा ते रात्री बारा वाजेदरम्यान ही घटना घडली. याप्रकरणी प्रमोद निंबा पाटील (वय ४४,रा. कोठल, ता. शहादा, ह मु. आशाबाबानगर,जळगाव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार गुरुवारी जिल्हापेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस नाईक संतोष सोनवणे हे तपास करीत आहेत.

### अपघातातील जखमीचा मृत्यू

**जळगाव :** अपघातामध्ये गृहस्थाच्या डोक्याला इजा होऊन जखमी झाले होते. गुरुवारी ( १९ फेब्रुवारी) सकाळी ११ वाजता बनोटी-पाचोरा रोडवरील खडकदेवळा बु. गावाजवळील धरणाजवळुन ईश्वर झावरु सोळंके (वय ५३,रा. वरठाण ,ता.सोयगाव) हे जखमी झाले होते. त्यांच्या डोक्यात मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाला होता. शहरातील खाजगी हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर उपचार सुरू होते. उपचाराला प्रतिसाद देऊ न शकल्याने त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी पाचोरा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. हवालदार दिलीप वाघमोडे हे तपास करीत आहेत.

# मनपातील तिजोरीची चावी डॉ. चंद्रशेखर पाटलांकडे

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, २७ फेब्रुवारी**

महापालिकेच्या विशेष महासभेत शुक्रवारी स्थायी समिती व महिला-बालकल्याण समिती सभापतींची निवड प्रक्रिया पार पडली. या निवड प्रक्रियेत भाजपचे डॉ. चंद्रशेखर पाटील यांची स्थायी समिती सभापतिपदी, तर शिवसेनेच्या सिंधू कोल्हे यांची महिला व बालकल्याण समितीच्या सभापतिपदी बिनविरोध निवड जाहीर झाली.

महापालिकेच्या दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात विशेष महासभेचे आयोजन सकाळी ११ वाजता करण्यात आले होते. व्यासपीठावर पीठासीन अधिकारी तथा जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल, आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे, तसेच नगरसचिव सतीश शुक्ला उपस्थित होते. सभेच्या सुरूवातीला पीठासीन अधिकाऱ्यांनी स्थायी समिती सभापतिपदासाठी आलेल्या अर्जांची माहिती दिली. डॉ. चंद्रशेखर पाटील यांचे तीन अर्ज आले होते. यात पहिल्या अर्जावर सूचक म्हणून नितीन लढ्ढा व अनुमोदक विशाल भोळे होते. अर्ज छाननीनंतर १५ मिनिटांचा माघारीचा अवधी देण्यात आला. मात्र, या कालावधीत अन्य कोणताही अर्ज मागे घेण्यात आला नाही. परिणामी, डॉ. पाटील यांची स्थायी समिती सभापतीपदी बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली.

## महिला-बालकल्याण सभापतिपदी सिंधूताई कोल्हे



**महिला व बालकल्याण समिती सभापतिपदाची निवड**

यानंतर महिला व बालकल्याण समिती सभापतिपदासाठी अर्ज छाननी करण्यात आली. सिंधू कोल्हे यांचे दोन अर्ज आले होते. पहिल्या अर्जात सूचक प्रतिभा देशमुख व अनुमोदक अमृता सोनवणे यांनी दाखल केला होता. अर्ज छाननीनंतर पंधरा मिनिटांचा माघारीचा अवधी दिला गेला. वेळ संपल्यानंतर अन्य कोणताही अर्ज मागे घेण्यात आला नसल्याने सिंधू कोल्हे यांची महिला व बालकल्याण समिती सभापतीपदी बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली.

**विशेष सभा १२ मिनिटे उशिराने सुरू**

सभागृहात ११ वाजता पीठासीन अधिकारी तसेच आयुक्त व महापालिकेचे अधिकारी हजर झाले. उपमहापौर मनोज चौधरी, नगरसेवक दिलीप पोकळे व काही महिला नगरसेवक उपस्थित होते. सदस्यांची तब्बल ११ मिनिटे वाट बघितल्यावर पीठासीन अधिकारी यांनी सभेला सुरुवात केली.

**फेटे घालून सदस्यांची उपस्थिती**

स्थायी व महिला बालकल्याण समिती सभापतींच्या निवडीसाठी भाजप व शिवसेनेच्या सदस्यांनी फेटे घालून सभागृहात उपस्थित होते. निवडीनंतर डॉ. पाटील व सिंधू कोल्हे यांना महापौर दीपमाला काळे, उपमहापौर मनोज चौधरी यांच्यासह नितीन लढ्ढा व अन्य नगरसेवकांनी शुभेच्छा दिल्या.

**शिवसेना ठाकरे गटाच्या नगरसेवकांची गैरहजेरी**

महापालिकेतील विरोधी पक्षातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पाच सदस्य असून स्थायी समिती सदस्यात पक्षाचे इब्राहिम पटेल तसेच महिला बालकल्याण समितीसाठी हिनाबी शाकीर खान या सदस्या आहे. परंतु दोन्ही सदस्य या निवडीच्या सभेला अनुपस्थित होते.

### प्रक्रिया आटोपल्यानंतर आले काही नगरसेवक

महासभेला सत्ताधारी पक्षातली भाजप व शिवसेनेचे काही नगरसेवक तब्बल अर्धातासापेक्षा अधिक उशिराने आलेले दिसून आले. तर काही सदस्य थेट स्थायी व महिला व बालकल्याण समिती सभापतींची निवड झाल्यानंतर सभेला पोहचले आणि शुभेच्छा देऊन लगेच निघून गेल्याचे दिसून आले. एवढेच नव्हे तर खुद्द महापौर निवड प्रक्रिया आटोपल्यानंतर सभागृहात दाखल झाल्या. त्यांनी नूतन सभापतींचा सत्कार केला. याप्रसंगी गटनेते प्रकाश बालाणी, नितीन लढ्ढा, उज्वला बेंडाळे, विष्णू भंगाळे, अरविंद देशमुख, सागर सोनवणे, नरेंद्र पाटील, यांच्यासह नगरसेवक उपस्थित होते.

### अंदाजपत्रकाचा आढावा घेणार : डॉ. पाटील

स्थायी समितीचे सभापतिपद स्वीकारल्यानंतर डॉ. चंद्रशेखर पाटील यांनी सांगितले की, महापालिकेचे अंदाजपत्रक लवकरच सादर होणार आहे. त्याअनुषंगाने अंदाजपत्रकाचा आढावा घेतला जाणार आहे. तसेच ई-बस, रस्ते, गाळ्यांचा प्रश्न हे विषय प्राधान्याने हाती घेऊन त्याबाबत प्रशासनाशी चर्चा करून सामूहिक निर्णय घेतला जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# पदवीनंतर शब्द दिला तो खरा आयुष्यातला टर्निंग पॉईंट : डॉ. आमटे

## डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाच्या १५२ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान

**जळगाव :** माझ्या वडीलांनी वैद्यकिय पदवी घेतल्यानंतर त्यांचे काम पुढे सूरू करण्याबाबत विचारले आणि हो म्हणून शब्द दिला तोच खरा आमच्या आयुष्यातला टर्निंग पॉईंट ठरला असल्याचे प्रतिपादन पद्मश्री डॉ. प्रकाश आमटे यांनी केले.

डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयात सन २०२० च्या बॅचचा दिक्षांत समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पद्मश्री डॉ. प्रकाश आमटे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर डॉ. मंदाकीनी आमटे, गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष माजी खा. डॉ.उल्हास पाटील, सदस्य, डीएम कार्डीओलॉजीस्ट डॉ. वैभव पाटील, वैद्यकीय महाविद्यालयाचे डीन डॉ. प्रशांत सोळंके, वैद्यकीय रूग्णालयाचे अधीक्षक डॉ. प्रेमचंद पंडीत, रजीस्ट्रार प्रमोद भिरूड, आदी मान्यवर उपस्थित होते. समारंभाच्या सुरूवातीला मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. तसेच यावेळी डीन डॉ. प्रशांत सोळंके यांनी पदवी प्रदान सोहळ्याची घोषणा केली.



**ग्रामीण भागात आरोग्य सेवेची गरज- डॉ. मंदाकीनी आमटे**

ग्रामीण भागात आजही वैद्यकीय सेवेची नितांत गरज आहे. त्यामुळे डॉक्टरांनी मोठ्या शहराकडे न वळता ग्रामीण भागात एक किंवा दोन वर्ष आरोग्य सेवा बजवावी असे आवाहन डॉ.मंदाकीनी आमटे यांनी केले.

**१५२ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान**

या दिक्षांत समारंभात डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाच्या १५२ विद्यार्थ्यांना पद्मश्री डॉ. प्रकाश आमटे यांच्या हस्ते पदवी प्रदान करून गौरविण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांचे पालकही उपस्थित होते. आपला पाल्य डॉक्टर झाल्याने अनेक पालकांच्या डोळे आनंदाश्रुंनी डबडबलेले दिसून आले. विद्यार्थी व पालकांनी आपले मनोगत देखिल व्यक्त केले.राष्ट्रगिताने समारोप केला. कार्यक्रमाचे आयोजन व यशस्वीतेसाठी अधिरथ बॅचच्या विदयार्थ्यांनी परिश्रम घेतले. सुत्रसंचालन श्रध्दा पाटील हिने तर आभार बुशरा खान हिने मानले.

# जळगाव पोलिसांची अवैध वाळूविरोधात कारवाई; ९० वर वाहने 'रडार'वर

**जळगाव :** विनापरवाना वाळूच्या चोरट्या वाहतुकीविरोधात जिल्हा पोलीस दलाने शुक्रवारी (२७ फेब्रुवारी) व्यापक कारवाई केली. वाहने कलम २०७ मधील अधिकारांचा वापर करून जागेवरच जप्त करून पोलीस ठाण्याच्या ताब्यात जमा करण्यात आली.

अवैध वाळू वाहतुकीला प्रतिबंध करण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली पहाटे जिल्ह्यात विविध पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात एकाच वेळी कार्यवाही करण्यात आली. या मोहिमेत जळगाव उपअधिक्षक नितीन गणापुरे यांनी घटनास्थळी कार्यवाहीचे नेतृत्व केले. या मोहिमेत जळगाव उपविभागातील सर्व पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी, एलसीबीचे अधिकारी व अंमलदार यांनी सक्रिय सहभाग घेतला. तालुका पोलीस स्टेशनच्या हद्दीतील बांभोरी, टाकरखेडे, खेडी व लगतच्या परिसरामध्ये अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या संशयित वाहनांची तपासणी करून ती ताब्यात घेतली. जळगाव तालुका पोलीस ठाणे हद्दीत ३२ ट्रॅक्टर आणि ८ डंपर (एकूण ४० वाहने), कासोदा पोलीस ठाण्यांतर्गत १५ ट्रॅक्टर, भडगाव १३ ट्रॅक्टर, एक डंपर, एरंडोल चार ट्रॅक्टर आणि एक डंपर, मेहुणबारे पोलीस ठाणे हद्दीत १५ ट्रॅक्टर आणि एक वाळूने भरलेला ट्रॅक्टर मिळून आला.

# जैन इरिगेशन कंपनीच्या धनादेश अनादर प्रकरणात कर्नाटकच्या दोघांना १.०८ कोटी भरपाई देण्याचे आदेश

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, २७ फेब्रुवारी**

जैन इरिगेशन सिस्टीम्स लिमिटेडच्या धनादेश अनादर (चेक बाऊन्स) प्रकरणात जळगाव येथील अतिरिक्त मुख्यन्यायदंडाधिकारी न्यायालयाने महत्त्वाचा निकाल दिला आहे. कर्नाटक येथील राजेंद्र ट्रेड लिंक आणि तिचे दोन भागीदार मिथुन सुरेश जैन व प्रशांत प्रकाश जैन यांना न्यायालयाने दोषी ठरवले आहे. आरोपींना सहा महिने साधा कारावासाची शिक्षा सुनावली. तसेच जैन इरिगेशन कंपनीला एकूण १ कोटी ८ लाख २० हजार ५८८ रुपये भरपाई देण्याचे आदेशही दिले आहेत.

कर्नाटक राज्यातील हावेरी जिल्ह्यातील रनेबेन्नुर येथील राजेंद्र ट्रेड लिंक या भागीदारी संस्थेने जैन इरिगेशन कंपनीकडून घेतलेल्या मालाच्या देय रकमेपोटी ५४ लाख १० हजार २९४ रुपयांचा धनादेश दिला होता. हा धनादेश बँकेत सादर केला असता तो अनादरीत झाला. यानंतर कंपनीने कायदेशीर नोटीस पाठवूनही आरोपींनी रक्कम अदा केली नाही. अखेर याप्रकरणी न्यायालयात खटला दाखल करण्यात आला. न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि उपलब्ध पुरावे ग्राह्य धरून निकाल दिला.

न्यायालयाने दिलेल्या निकालात १ कोटी ८ लाख २० हजार ५८८ रुपये जैन इरिगेशनला देण्याचे आदेश दिले . कायदेशीर कारवाईचा खर्च म्हणून जैन इरिगेशन कंपनीला अतिरिक्त १५ हजार रुपये देण्याचे आदेश दिले आहेत. जैन इरिगेशन कंपनीच्या वतीने ॲड. निशांत सुशील अत्रे यांनी प्रभावीपणे न्यायालयात युक्तीवाद करून कंपनी बाजू मांडली.

धनादेश अनादर हे नेगोशिएबल इन्स्टुमेंट ॲक्ट १८८१ मधील कलम १३८ नुसार फौजदारी स्वरुपाचा गुन्हा आहे. यामध्ये धनादेशाच्या रक्कमेच्या दुप्पट दंड आणि दोन वर्षापर्यंतच्या शिक्षेची तरतूद आहे. या निकालामुळे कायदेशीर व्यवहारात पारदर्शकता ठेवणे किती आवश्यक आहे, हे पुन्हा अधारेखित झाले आहे.

# 'हिंद-दी-चादर' कार्यक्रमासाठी जिल्ह्यातील भाविकांना बस सुविधा

## जळगावात नियोजनाबाबत पूर्वतयारीचा आढावा

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, २७ फेब्रुवारी**

हिंद दी चादर श्री गुरू तेग बहादूर साहिबजी यांचा ३५० व्या शहिदी समागम कार्यक्रम हिंद- दी- चादर नवी मुंबईच्या खारघर येथे शनिवारी (२८ फेब्रुवारी) व रविवारी (१ मार्च) होत आहे. या कार्यक्रमासाठी जिल्ह्यातून जाणाऱ्या भाविकांच्या नियोजनसंदर्भात पूर्वतयारीचा आढावा जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी घेतला.तालुकास्तरावरुन भाविकांना येण्याजाण्यासाठी बसेसचे नियोजन करण्यावर भर देण्यात आला आहे.

विविध सामाजिक संघटनांनी यासाठी पुढाकार घ्यावा,असे त्यांनी नमुद केले. या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात बैठक आयोजित करण्यात आली होती.

**भाविकांना आवाहन**

यावेळी जिल्हाधिकारी घुगे म्हणाले, हिंद दी चादर या कार्यक्रमाची विविध उपक्रमांच्या माध्यमातून जिल्हयात व्यापक प्रचार व प्रसिध्दी होत आहे. जिल्ह्यातील जास्तीत-जास्त भाविकांनी या कार्यक्रमात आपला सहभाग नोंदवावा, तसेच जिल्ह्यातील सेवाभावी संस्थांनी पुढाकार घेऊन कार्यक्रमाच्या नियोजनासाठी सहकार्य करावे, असे आवाहन यांनी केले.

नवी मुंबई खारघर येथे २८ फ ेब्रुवारी व १ मार्च,२०२६ रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या देशव्यापी भव्य कार्यक्रमाच्या अनुषंगाने नियोजन व पुर्वतयारीबाबत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली, यावेळी ते दूरदृष्य प्रणाली बोलत होते.

या बैठकीला अपर जिल्हाधिकारी डॉ.श्रीमंत हारकर, मनपा आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे, मनपा अति.आयुक्त शोभा बाविस्कर, प्र.निवासी उपजिल्हाधिकारी अर्चना मोरे, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी राहूल इधे, कार्यक्रमाचे राज्य समिती समन्वयक श्रावण चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

जिल्हाधिकारी म्हणाले, नवी मुंबई खारघर येथे कार्यक्रमास जिल्हयातील विविध तालुक्यातून, गावातून भाविकांना कार्यक्रमास जाण्यासाठी व परत येण्याची व्यवस्थेचे सुसूत्र नियोजन करण्यात येत असल्याचे सांगून ते म्हणाले, तालुकास्तरावरुन विविध सामाजीक संघटनांच्या मदतीने बसेसची व्यवस्था करण्यासाठी त्यांनी पुढाकार घ्यावा, असे त्यांनी बैठकीत नमूद केले.

**जिल्ह्यात जनजागृती अभियान**

कार्यक्रमाच्या व्यापक प्रचार प्रसिद्धीसाठी प्रशासनामार्फत नाविन्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. जळगाव शहरात तसेच तालुकास्तरावर कार्यक्रमाच्या प्रचार प्रसिध्दीसाठी चित्ररथ, हार्डिंगव्दारे जनजागृती सुरू आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले. देशातून तसेच राज्यातून अनेक मान्यवर व्यक्ती या कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. सर्व सेवाभावी संस्था, युवक-युवती व विविध समाज घटकांनी पुढाकार घेऊन एकत्रितपणे काम केल्यास हा उपक्रम यशस्वी होईल, असा विश्वास यांनी यावेळी व्यक्त केला. या बैठकीस शीख, शिकलगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहियाल, वाल्मिकी उदासीन व भगत नामदेव वारकरी संप्रदाय या नऊ समाजांचे प्रतिनिधी, आणि संबंधित विभागांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



## अग्रलेख...

# प्रचार आणि उधळपट्टी

निवडणुका हा लोकशाही व्यवस्थेचा गाभा आहे. लोकशाही शासन व्यवस्थेत निवडणुका अपरिहार्य असतात. मात्र त्याचा सध्या अतिरेक झाल्यासारखे चित्र आहे. आपल्या अवाढव्य अशा देशात प्रत्येक दिवशी कोणती ना कोणती निवडणूक होत असते. मग ती ग्रामपंचायतीपासून राष्ट्रपतिपदापर्यंत कोणतीही राहू शकते. काही निवडणुका प्रत्यक्ष लढवल्या जातात, तर काही अप्रत्यक्षपणे. विधानसभा आणि लोकसभेची निवडणूक प्रत्यक्ष म्हणजे जनतेतून होत असते, तर विधानपरिषद आणि राज्यसभेची निवडणूक अप्रत्यक्षपणे लढवली जाते. काही ठिकाणी नगराध्यक्ष थेट जनतेतून निवडला जातो. नगरसेवक आणि जि. प. सदस्य अनुक्रमे महापौर आणि जिल्हा परिषद अध्यक्षाची निवड करत असतात. यातील काही राज्य निवडणुका आयोगाच्या अखत्यारीत असतात तर विधानसभा, विधानपरिषद, लोकसभा, राज्यसभा, उपराष्ट्रपती आणि राष्ट्रपतिपदाची निवडणूक केंद्रीय निवडणूक आयोगाला घ्यावी लागते.

निवडणुका लढवण्याची एक नशा असते. कारण निवडणूक लढवल्याशिवाय सत्तेचे आणि अधिकाराचे पद मिळत नाही. जनतेच्या सेवेसाठी आम्ही राजकारण करतो, असे सर्व राजकीय पक्ष व त्याचे नेते सतत म्हणत असले, तरी सत्तेशिवाय प्रभावीपणे जनतेची सेवा करता येत नाही, असा समज झाला आहे. हातात सत्ता नसली तर जनतेच्या प्रश्नासाठी तुम्हाला आंदोलन करावे लागते; मात्र सत्ता असली तर जनतेचे प्रश्न सोडविण्याची किल्ली तुमच्या हातात येते आणि सत्तेची किल्ली निवडणुका लढवल्याशिवाय तुमच्या हातात येऊ शकत नाही. तथापि, निवडणुका लढवणे हे आज सोपे राहिले नाही तर अतिशय खर्चिक आणि महागडे झाले आहे. तरीसुद्धा निवडणूक रिंगणात उतरणाऱ्यांची संख्या कमी झाली नाही. हे सारे आठवण्याचे कारण म्हणजे सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेली एक याचिका. 'कॉमन कॉज आणि सेंटर फॉर पब्लिक इंटरेस्ट लिटिगेशन' या गैरसरकारी संस्थेने दाखल केलेल्या याचिकेत निवडणुकीत राजकीय पक्षांकडून होत असलेल्या अमर्याद खर्चावर मर्यादा घालण्याची मागणी करण्यात आली आहे. या याचिकेवर सरन्यायाधीश सूर्यकांत, न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या. विपुल पंचोली यांच्या खंडपीठाने केंद्र सरकार तसेच निवडणूक आयोगाला नोटीस बजावली आहे. लोकप्रतिनिधी कायद्याच्या कलम ७७(१) नुसार निवडणुकीत उमेदवारांनी प्रचारासाठी खर्च करण्यावर मर्यादा आहे. मात्र ही मर्यादा खरोखर पाळली जाते का? आपण ठरवून दिलेल्या मर्यादेत खर्च होतो का, हे पाहण्याची जबाबदारी निवडणूक आयोगाची असली, तरी निवडणूक आयोग ती जबाबदारी प्रभावीपणे पार पाडते का, हा संशोधनाचा आहे. आयोगाने खर्चाची जी मर्यादा ठरवून दिली, त्याच्या किमान १० पट खर्च निवडणुकीत उमेदवारांकडून होत असतो. उमेदवार आपल्या प्रचारावर करीत असलेला खर्च वेगळा आणि राजकीय पक्ष आपल्या उमेदवारांच्या प्रचारावर करीत असलेला खर्च वेगळा असतो. राजकीय पक्षांसाठी खर्चाची कोणतीच मर्यादा ठरविण्यात आलेली नाही, याकडेच याचिकेतून लक्ष वेधण्यात आले आहे. निवडणुकीच्या प्रचारात पैशाची उधळपट्टी केली जाते, पाण्यासारखा पैसा खर्च केला जातो, ते पाहून सर्वसामान्य माणसाचे डोळे फाटू शकतात. त्यामुळे आज निवडणूक लढवणे हे सर्वसामान्य माणसाचे नाही, तर ते धनाढ्यांचे झाले आहे. देशातील निवडणूक प्रणालीला तत्कालीन मुख्य निवडणूक आयुक्त टी. एस. शेषन यांनी वळण लावले. त्याआधी निवडणुका म्हणजे नुसता सावळागोंधळ होता, कोणत्याही प्रकारचे निर्बंध राजकीय पक्ष आणि त्यांच्या उमेदवारांवर नव्हते. प्रचाराची वेळ निश्चित नव्हती, रात्रभर प्रचार सुरू राहायचा. मात्र, शेषन यांनी प्रचारासाठी रात्री १० पर्यंतची वेळ निश्चित केली. रात्री १० नंतर प्रचारावर बंदी आणली. निवडणूक खर्चाची मर्यादाही त्यांनी तेव्हा ठरवून दिली. आपण प्रचारात दररोज काय खर्च करतो, याचा अहवाल आयोगाला सादर करणे उमेदवारांवर बंधनकारक केले. त्यानुसार आपल्या देशातील निवडणूक प्रणालीला शिस्त आणि काहीसे वळण लागले, असे म्हणायला हरकत नाही. आपल्या देशात मुख्य निवडणूक आयुक्त हे पद आहे. त्या व्यक्तीला काही अधिकारही असतात आणि मनात आणले तर तो देशातील सर्व राजकीय पक्षांचे कान पिरगाळू शकतो, हे शेषन मुख्य निवडणूक आयुक्त झाल्यानंतरच देशातील जनतेला समजले.

निवडणूक आयोग आज प्रचारातील खर्चाचे दर निश्चित करून देते. यात चहा, कॉफी, नाश्ता, दोन्ही वेळचे जेवण, मांसाहारी जेवण, प्रचारातील गाडीचा प्रतिकिमी दर, मंडप, लाऊडस्पीकर, झेंडे, पोस्टर आणि पत्रक याचा दर ठरविला जातो. एक काळ असा होता, जेव्हा कार्यकर्ते आपले घरचे खाऊन लष्कराच्या भाकऱ्या भाजत होते, म्हणजे राजकीय पक्षांचे काम करीत होते. आता परिस्थिती बदलली आहे. आपण उमेदवाराचा प्रचार करतो, म्हणजे त्याच्यावर उपकार करतो असे मानत, त्यामुळे त्याने आपला दिवसभराचा सगळा खर्च केला पाहिजे, अशी कार्यकर्त्यांची मानसिकता झाली आहे. आता दारू आणि मांसाहारी जेवणाशिवाय कार्यकर्ते कामच करत नाही. याशिवाय त्यांच्या खिशातही काही टाकावे लागते. कोणत्याही निवडणुकीत दोन प्रकारचे खर्च होत असतात. एक म्हणजे उमेदवार करतो तो खर्च आणि राजकीय पक्ष आपल्या उमेदवारांच्या प्रचारावर खर्च करतो तो खर्च. पक्षाचा सामायिक खर्च असतो, तो उमेदवाराच्या प्रचार खर्चात धरला जात नाही. आज छोटे पक्ष वगळले तर बहुतांश मोठ्या पक्षाचे सर्वच नेते प्रचारासाठी हेलिकॉप्टर आणि चार्टर्ड विमानातून फिरत असतात. कमीत कमी वेळात जास्त प्रचारसभा घेता याव्या म्हणून हे करावे लागते. आज निवडणुकीच्या प्रचारात असणारी सर्वच नेते आणि कार्यकर्ते चार्टर्ड विमानातून फिरतात आणि पंचतारांकित हॉटेलात राहात असतात. हा खर्च पक्षाचा खर्च मानला जातो.

आज नगरसेवकपदाचा एक उमेदवारही काही लाख रुपये प्रचारावर खर्च करीत असतो. जिल्हा परिषद, नगर परिषद, पंचायती निवडणूकही तशीच. विधानसभा आणि लोकसभेच्या उमेदवाराचे खर्चाचे आकडे पाहिले तर डोळे फिरतील. निवडणुकीत जो पैसा खर्च केला जातो, तो बहुतांश काळा पैसा असतो. कारण या पैशाचा काही हिशेब नसतो. गेल्या काही वर्षांत आपल्या देशातील निवडणूक प्रणालीत एका अनिष्ट परंपरेचा शिरकाव झाला आहे, ती म्हणजे मतदारांना भेटवस्तू वा रोख रक्कम देणे. खरं म्हणजे ही एक प्रकारची लाचच झाली. मतदारांना आपल्या पक्षाची विचारधारा सांगून त्यांचे मत परिवर्तन करण्यापेक्षा त्यांचे मत विकत घेण्याकडे आज सर्व राजकीय पक्षांच्या उमेदवारांचा कल झाला आहे. विशेष म्हणजे यात काही गैर आहे, हे जसे उमेदवारांना वाटत नाही; तसेच उमेदवारांकडून पैसे घेण्यात आपण काही चूक करतो, असे मतदारांना वाटेनासे झाले आहे. मतदान करणे हा आता दोन्ही बाजूने सरळसरळ व्यवहार झाला आहे. सरकारी कार्यालयात लाच देऊन कामे केली जातात. निवडणुकीत पैसे वाटून मतं विकत घेतली जातात. निवडणुकीत जो पैसा वापरला जातो, तो बहुतांश काळा पैसा असतो. काळ्या पैशाचा प्रभाव रोखण्यासाठी निवडणुका लढवण्यासाठी सर्व राजकीय पक्षांना सरकारने पैसे उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी अजूनही केली जात आहे. काही देशात असा प्रकार केला जातो. त्यामुळे सरकारने या मागणीवर गांभीर्याने विचार करायला हरकत नाही.

सर्व प्रकारच्या निवडणुकीच्या प्रचारावर होणारा खर्च काही हजार कोटींचा असतो. एवढ्या पैशात देशात कितीतरी विकास कामे होऊ शकतात, देशाचा चेहरामोहरा बदलू शकतो. आपल्या देशात वर्षभर निवडणुका सुरू असतात, निवडणुकांसाठी आचारसंहिताही लागू होत असते. त्यामुळे विकास कामे ठप्प होऊन जातात, सरकारला काही काम करता येत नाही. नोकरशाहीला काम न करण्याचे निमित्तच हवे असते. याला आळा घालण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी 'एक देश एक निवडणूक' या संकल्पनेचा आग्रह धरून आहेत. ही संकल्पना व्यापक समाजहित आणि देशहिताचीही आहेत. राजकीय पक्षांच्या निवडणुकीतील खर्चावर मर्यादा आणण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने योग्य तो निर्णय घेतला पाहिजे, सद्यस्थितीची ती गरज म्हटली पाहिजे.

## विशेष

**डॉ. राजकुमार अवसरे**

# विज्ञान शिक्षण संस्थेची वाटचाल

### २८ फेब्रुवारी; राष्ट्रीय विज्ञान दिन विशेष



२१ व्या शतकात विज्ञान व तंत्रज्ञान हे केवळ शिक्षणाचे विषय न राहता मानवी जीवनाची दिशा ठरवणारे मूलभूत घटक बनले आहेत. समाजाचा बौद्धिक विकास, आर्थिक प्रगती, पर्यावरणीय समतोल आणि सामाजिक परिवर्तन विज्ञानाधारित विचारसरणीवर अवलंबून आहेत. राज्य विज्ञान शिक्षण संस्थेचा उद्देश केवळ माहिती देणं नसून विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा निर्माण करणे, प्रश्न विचारण्याची सवय लावणे, तर्कशुद्ध विचार विकसित करणे आणि समस्यांकडे वैज्ञानिक दृष्टीने पाहण्याची क्षमता घडविणे हा असतो. विज्ञान शिक्षण समाजघडणीचे प्रभावी साधन म्हणून विकसित करण्यासाठीराज्य विज्ञान शिक्षण संस्था महत्त्वाची भूमिका बजावत आहे. विज्ञान शिक्षणाला दिशा देणारी, धोरण ठरवणारी व प्रत्यक्ष अंमलबजावणी करणारी ही एक अग्रगण्य शैक्षणिक यंत्रणा असून शालेय स्तरावर विज्ञान शिक्षण अधिक प्रयोगशील, जीवनोपयोगी आणि समाजाभिमुख बनवणे तसेच विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवून जबाबदार नागरिक घडवणे, हे मूलभूत कार्य आहे. त्यामुळे राज्य विज्ञान शिक्षण संस्था विज्ञानाधारित समाजनिर्मितीची एक सशक्त चळवळ म्हणून ओळखली जाते.

१९६८ मध्ये पुणे येथे राज्य विज्ञान शिक्षण संस्थेची स्थापना करण्यात आली. प्रारंभी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद अंतर्गत कार्यरत होती. १९८० पासून विज्ञान शिक्षण अधिक व्यापकपणे राज्याच्या विविध भागांपर्यंत पोहोचावे या उद्देशाने संस्थेचे विकेंद्रीकरण करण्यात आले. त्यानुसार संस्थेचे नागपूर येथे स्थलांतर करण्यात आले. या बदलामुळे विदर्भ, मराठवाडा, खानदेश व ग्रामीण भागातील विज्ञान शिक्षणाला विशेष चालना मिळाली. पुढे १७ ऑक्टोबर २०१४ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील शैक्षणिक प्रशासन अधिक प्रभावी करण्यासाठी पाच प्रादेशिक विद्या प्राधिकरणांची स्थापना करण्यात आली. त्यामध्ये नागपूर येथील राज्य विज्ञान शिक्षण संस्था प्रादेशिक विद्या प्राधिकरण (विज्ञान) म्हणून घोषित करण्यात आली.

या टप्प्यापासून संस्थेची भूमिका अधिक व्यापक, धोरणात्मक व परिणामकारक झाली. राज्यातील विज्ञान शिक्षणाचे नियोजन, समन्वय, अंमलबजावणी व मूल्यांकन करण्याची जबाबदारी या संस्थेकडे आली. काळानुरूप बदल स्वीकारून विज्ञान शिक्षणाला नवी दिशा देणारी गतिमान आणि परिवर्तनशील संस्था म्हणून विकसित झाली. संस्थेची दृष्टी ही पारंपरिक, परीक्षा केंद्रित शिक्षणाच्या चौकटीपलीकडे जाणारी असून ती समाजपरिवर्तनाभिमुख विज्ञान शिक्षण घडवण्यावर केंद्रित आहे. विज्ञान शिक्षण अधिक अनुभवाधारित, प्रयोगशील, जीवनाशी निगडित आणि समाजोपयोगी बनवण्यावर भर दिला जातो. दैनंदिन जीवनातील प्रश्न, पर्यावरणीय आव्हाने, आरोग्यविषयक समस्या आणि तंत्रज्ञानाचा विवेकपूर्ण वापर यांच्याशी जोडले जावे, ही संस्थेची प्रमुख भूमिका आहे. संस्थेची उद्दिष्टे व्यापक, बहुआयामी आणि दीर्घकालीन स्वरूपाची असून ती शैक्षणिक व सामाजिक गरजांशी सुसंगत आहेत. राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर विज्ञान शिक्षणाचा दर्जा उंचावणे, अध्यापन-अध्ययन प्रक्रिया अधिक परिणामकारक बनवणे आणि विज्ञान शिक्षणाला व्यवहार्य व जीवनोपयोगी स्वरूप देणे, हे या संस्थेचे उद्दिष्ट आहे. यासोबतच शिक्षकांचे विषयज्ञान, अध्यापन कौशल्य, मूल्यमापन तंत्र आणि व्यावसायिक आत्मविश्वास वृद्धिंगत करणे हेही ध्येय आहे. विज्ञान शिक्षणाची गुणवत्ता ही शिक्षकांच्या गुणवत्तेवर अवलंबून असते, या भूमिकेतून शिक्षक प्रशिक्षण, शैक्षणिक नवोपक्रम आणि कृती संशोधनाला चालना दिली जाते तसेच समाजामध्ये विज्ञान व तंत्रज्ञानाविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे, अंधश्रद्धा व अवैज्ञानिक समजुतींना तर्कशुद्ध विचारांनी आव्हान देणे आणि विज्ञान शिक्षणाला सामाजिक विकासाशी जोडणे केंद्रस्थानी आहे. राष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक धोरणे, विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील नव्या घडामोडी तसेच राज्याच्या सामाजिक-भौगोलिक गरजा यांचा समन्वय साधून विज्ञान शिक्षणाची दीर्घकालीन दिशा निश्चित करणे, ही भूमिका आहे. एनसीईआटी, डीएसटी, एनसीएसएम यांसारख्या राष्ट्रीय संस्थांच्या मार्गदर्शक तत्त्वांचा अभ्यास करून त्यांचे राज्यस्तरीय रूपांतर केले जाते; जेणेकरून ही धोरणे प्रत्यक्ष शाळा आणि वर्गखोलीपर्यंत परिणामकारकरीत्या पोहोचू शकतील. ग्रामीण, आदिवासी व दुर्गम भागांतील विद्यार्थ्यांपर्यंत विज्ञान शिक्षण समानतेने पोहोचावे, यासाठी धोरणात्मक उपाययोजना राबविल्या जातात. वैज्ञानिक विकास घडविण्यासाठी विविध अभिनव उपक्रम राबवते. विज्ञान प्रदर्शन, विज्ञान मेळावे, विज्ञान नाट्योत्सव, विज्ञान मंच, अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा आदी उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा, सर्जनशीलता, नवोन्मेष क्षमता आणि संशोधन वृत्ती विकसित केली जाते.

गुणवत्तापूर्ण विज्ञान शिक्षणासाठी सक्षम, अद्ययावत आणि प्रेरित शिक्षक असणे अत्यावश्यक असून प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षकांसाठी विषयज्ञान वृद्धिंगत करणारे, प्रयोगाधिष्ठित अध्यापन, आधुनिक अध्यापन पद्धती आदींवर आधारित प्रशिक्षण कार्यक्रम सातत्याने आयोजित केले जातात. शिक्षकांच्या व्यावसायिक विकासातूनच विज्ञान शिक्षणाची गुणवत्ता उंचावते, या तत्त्वज्ञानावर संस्था कार्य करते. राज्य विज्ञान शिक्षण संस्था राज्यात विज्ञान संस्कृती रुजवण्याचे व्यापक कार्य करते. विज्ञान नाटक, विज्ञान प्रदर्शन, विज्ञान मेळावे, जनजागृती शिबिरे, व्याख्याने आणि संवादात्मक उपक्रमांच्या माध्यमातून विज्ञान सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनाशी जोडले जाते. यामुळे विज्ञान ही केवळ अभ्यासाची शाखा न राहता समाजाच्या प्रगतीचे प्रभावी साधन ठरते. या उपक्रमांमुळे अंधश्रद्धा, गैरसमज आणि अवैज्ञानिक समजुतींना तर्कशुद्ध विचारांनी आव्हान दिले जाते. विज्ञान संस्कृती निर्माण करण्यामध्ये राज्य विज्ञान शिक्षण संस्थेचे योगदान सामाजिक व सांस्कृतिक स्तरावरही अत्यंत मोलाचे ठरते. संस्थेचे कार्य राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरही असून राष्ट्रीय स्तरावरील उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना संधी मिळते. जवाहरलाल नेहरू विज्ञान प्रदर्शन, अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा आणि विविध विज्ञान स्पर्धांमध्ये सहभाग आणि यश हे राज्य विज्ञान शिक्षण संस्थेच्या मार्गदर्शनाचे फलित आहे. एकूणच राज्य विज्ञान शिक्षण संस्था विज्ञान शिक्षणाच्या प्रवासाची दिशा ठरवणारी, त्याला आशय देणारी आणि भविष्याकडे नेणारी एक सशक्त शैक्षणिक चळवळ आहे, असे म्हणता येईल.

९३२५८४४५२४

(लेखक राज्य विज्ञान संस्थेचे संचालक आहेत.)

## वेध

**रेवती जोशी-अंधारे**

# पांढरा नव्हे तपकिरी कापूस!

आपल्या देशात कापूस उत्पादनाचा उण्यापुऱ्या पाच हजार वर्षांचा इतिहास आहे. केवळ पांढराच नाही तर कथ्था, हिरवा आणि फिकट गुलाबी रंगाचा कापूस भारतात तयार होत असे. त्यात विविध रंगसंगती करून दर्जेदार कापड निर्मिती होत असे. यांत्रिक शोधांच्या क्रांतिकारी प्रवाहात स्थानिक बियाणे आणि शेतकऱ्यांचे कौशल्य मागे पडून, पांढऱ्या कापसाला विविध रंगांचा डाय करणे अंगवळणी पडले आहे.

कापड उद्योगांमध्ये सर्वाधिक पाणी कापडाला विशिष्ट रंग देण्यासाठी वापरलं जातं. जगातील औद्योगिक जल प्रदूषणाच्या २० टक्के प्रदूषणासाठी हा उद्योग जबाबदार आहे. जगातील एकूण कार्बन उत्सर्जनापैकी १० टक्के उत्सर्जन यातून होतं. युनायटेड नेशन्स इनव्हायर्नमेंट प्रोग्रामनुसार, शेतातील कापूस ते तयार जीन्स पँट या प्रवासासाठी तब्बल ३७८१ लिटर पाणी लागतं. हे ३३.४ किलोग्रॅम कार्बन उत्सर्जनाच्या बरोबर आहे. एका जीन्स पँटला इतकं एकूण कापड उद्योगासाठी किती पाणी खर्च होत असेल? अमेरिकेतील नॉन प्रॉफीट रिसर्च सेंटर, वर्ल्ड इन्स्टिट्यूटच्या मते, कापड उद्योगांना दरवर्षी कापड रंगविण्यासाठी अंदाजे पाच ट्रिलियन लिटर पाणी लागतं. हे रसायनयुक्त डाय मिश्रित प्रदूषित आणि बहुतांश वेळा कोणतीही प्रक्रिया न करता नैसर्गिक जलस्रोतांमध्ये सोडले जाणारे पाणी प्रदूषण सोबत घेऊन प्रवाहित होत राहते. पण, रंगीत कापडासाठी आपण निसर्गावर प्रदूषणाचं काळं फासतोय, याचा विसर पडला. पण, नागपूरच्या केंद्रीय कापूस संशोधन केंद्रातील संशोधकांनी मात्र याची आठवण ठेवून कापड निर्मितीला इको फ्रेंडली करण्यासाठी दमदार पाऊल टाकले. कापड उद्योगातील हे प्रदूषण कमी करण्यासाठी नागपूरच्या केंद्रीय कापूस संशोधन संस्थेच्या मुख्य शास्त्रज्ञ डॉ. विनीता गोतमारे आणि त्यांच्या चमूने शेतात थेट रंगीत कापूसच पिकविण्याचे यशस्वी संशोधन केले आहे. गेल्या २५ वर्षांपासून कापसाच्या विविध वाणांवर संशोधन करणाऱ्या डॉ. विनीता यांनी कपाशीच्या जंगली प्रजातींचा वापर करून नैसर्गिकरीत्या तपकिरी (ब्राऊन) रंगाच्या कापसाचं वाण शोधून काढलं आहे. रंगीत कापसाचे चार भारतीय वाण सध्या हातात आले असून त्याचं बियाणं शेतकऱ्यांनाही देण्यात आले आहे. कापसाच्या जंगली वाणासोबत क्रॉसिंग करून नवीन वाण तयार करताना रंगीत कापसाचे काही डेरिव्हेटिव्हज त्यांना मिळाले. या कापसाचं व्यावसायिक महत्त्व बघता त्याला स्टेबल करणं गरजेचं आहे, हे लक्षात घेऊन रंग फिका पडू नये यासाठी त्यांचे भगीरथ प्रयत्न सुरू झाले. त्यांनी हिरूसुटम, थर्बेरी, बारबाडन्स आणि रायमोंडी या जंगली जातींचा क्रॉस करून त्यामधून प्रोजिन्स मिळविले. डॉ. गोतमारे आणि कापूस संशोधन संस्थेच्या टीमने वर्ष २०१३ मध्ये वैदेही ९५ जेनेटिक स्टॉक म्हणून रजिस्टर केला. हे वाण गडद तपकिरी रंगाचे आहे. हे भारतीय रंगीत कापसाचे वाण जंगली जातींपासून मिळविलेले आहेत आणि हेच याचं वेगळेपण आहे. या कापसाला रासायनिक फवारणीची गरज नाही. पांढऱ्या कापसापेक्षा याचं उत्पन्न कमी असले, तरी सेंद्रिय फवारणीमध्येच याचे उत्पन्न होते. तपकिरीला पांढऱ्या कापसापेक्षा जास्त भाव मिळतो. माणसाकडून पर्यावरणाची होणारी हानी कमी करण्यासाठी हा कापूस महत्त्वाचा आहे. आणखी रंगीत कापूस आल्यास टेक्सटाईल इंडस्ट्रीमधील प्रदूषण कमी होईल.

या कापसाच्या उत्पादनासाठी फक्त पावसाच्या पाण्याची गरज असते. नंतर या कापसापासून कापड तयार होईपर्यंत याला कुठल्याही रसायनाची किंवा पाण्याची गरज नसते. हा कापूस नैसर्गिकरीत्या रंगीतच असल्याने कुठल्याही प्रकारचा डाय करायची किंवा धुवायला ब्लिंचिंगची गरज नाही. या पर्यावरणस्नेही कापसाचा प्रचार-प्रसार वाढायला निश्चित धोरणाची गरज आहे. मायबाप सरकारने संशोधकांच्या प्रयत्नांना समर्थ हातभार लावला तर शेतकरीही कापूस पिकविण्यासाठी पुढाकार घेतील. सध्या उत्पादित होणारा हा रंगीत कापूस फक्त तपकिरी रंगामध्ये उपलब्ध आहे. यामध्ये वेगवेगळे शेड्स आहेत. विदर्भाच्या उन्हात या कापसाचा रंग फिका न पडता आणखी गडद होतो, असं डॉ. विनीता यांच्या संशोधनात स्पष्ट झाले आहे. तपकिरी रंग स्टेबल करण्यात यश मिळालं. आता इतर रंग स्टेबल करून त्या रंगाचा कापूस घेता येईल का? यावर डॉ. विनीता यांचे संशोधन सुरू आहे. हा तपकिरी कापूस सध्या फक्त हातमागासाठी वापरला जातो कारण याच्या लांबी-रुंदीच्या मर्यादा आहेत. हाय स्पीडमशिनसाठी हा कापूस कसा वापरता येईल, यासाठीच्या डॉ. गोतमारे यांच्या संशोधनाला लवकरच यश मिळेल. भविष्यात आणखी सुधारित वाण तयार झालं तर पर्यावरणाच्या दृष्टीनं नव्या भारतातील आमूलाग्र बदलांची ती नांदीच ठरणार आहे.

९८५०३३९२४०

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# सातवी जागा, सातवा डाव!



इतिहासापासून आपण काय शिकतो? तर काहीच नाही, हे वाक्य अनेकदा उद्धृत केले जाते. पण महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या जे घडत आहे, ते पाहिल्यावर या वाक्याची प्रचीती पुन्हा एकदा येते. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांतील धडे, टक्केवारीतील किरकोळ फरक, मागील काळात राज्यसभा आणि विधान परिषदेच्या निवडणुकीत देवेंद्र फडणवीसांनी केलेली मतांची बेगमी रणनीती आणि त्याअंती आलेला निकाल हे सगळं डोळ्यासमोर असताना महाविकास आघाडी आणि विशेषतः उबाठात पुन्हा तेच जुने डावपेच खेळले जाताना दिसत आहेत. त्यामुळे आता या सातव्या जागेवर सातवा डाव कोण टाकतो, हा खरा प्रश्न आहे.

२०२२ च्या सहा जागांसाठी झालेल्या राज्यसभा निवडणुकीत महायुतीच्या दोन जागा विजयी होण्याएवढं संख्याबळ त्यांच्याकडे होतं. सहाव्या जागेसाठी आवश्यक असलेलं हक्काचं संख्याबळ नव्हतं. देवेंद्र फडणवीसांनी आपले राजकीय कौशल्य दाखवत, अचूक रणनीतीच्या आधारावर सहावा उमेदवार निवडून आणला होता आणि याच निवडणुकीत संजय राऊत हे काठावर पास झाले होते. त्यांना आवश्यक असलेला ४१ चा कोटाच प्राप्त करता आला होता. एक मतं जरी कमी पडलं असतं तर राऊत बाद झाले असते. त्यावेळी नारायण राणेंसह काही नेते उपहासाने बोलत होते, ''तुम्ही बघा एक संजय पडेल म्हणून...'' पण नशीब बलवत्तर हे संजय बचावले आणि संजय पवार या शिवसेनेच्याच उमेदवाराचा बळी गेला होता. त्यापाठोपाठ २०२२ मध्येच विधान परिषदेच्या १० जागांसाठी निवडणूक झाली. महायुतीकडे चार जागा जिंकण्याएवढं संख्याबळ होतं. मात्र, भाजपाचे पाच उमेदवार निवडून आले. यावेळी काँग्रेसचे पहिल्या क्रमांकाचे उमेदवार चंद्रकांत हंडोरे पराभूत झाले होते. हा कटू अनुभव अलिकडल्या काळातलाच महाविकास आघाडीला आलेला आहे.

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला मिळालेलं यश हे भव्य असलं, तरी मतांच्या टक्केवारीतला फरक नगण्य होता. महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यातील अंतर अर्ध्या-एक टक्क्याच्या आसपास होतं. त्याचाच अभ्यास करून महायुतीने विधानसभा निवडणुकीत मतदान वाढविण्यावर भर दिला आणि निकाल पालटले. दुसऱ्या बाजूला जागांच्या आकड्यांच्या भूलभुलय्यात अडकून वास्तवाचा अंदाज न घेण्याची चूक महाविकास आघाडीने केली. यावेळच्या राज्यसभा आणि विधान परिषद निवडणुकांच्या पृष्ठभूमीवर पुन्हा एकदा इतिहास समोर उभा असताना, यांची गती तीच दिसत आहे. त्यामुळे महाविकास आघाडीच्या वाट्याला येऊ शकणाऱ्या एका राज्यसभा जागेवरून तीन पक्षांमध्ये चाललेली रस्सीखेच बघता, ही एक जागाही गमावून बसले तर त्यात आश्चर्य वाटण्याचं काही कारण नाही. महाविकास आघाडीसमोर प्रश्न आहे तो, सातवी जागा जिंकायची की घरातील लढाई?

**मातोश्रीवर सातव्या जागेची कुस्ती :** राज्यसभेची घोषणा होताच संजय राऊत यांनी जाहीरपणे शरद पवार यांचे नाव पुढे केले. महाविकास आघाडीचे सर्वात ज्येष्ठ नेते शरद पवार आहेत; त्यांनीच राज्यसभेत जावे, अशी भूमिका त्यांनी घेतली. गंमत म्हणजे पवारांच्या पक्षाकडून किंवा स्वतः पवारांकडून अधिकृत घोषणा नव्हती. सध्याच्या विधानसभेच्या संख्याबळावर अजून एक राज्यसभा निवडणूक होणार आहे. आज पवारांना पाठिंबा दिला, तर उद्या उबाठाच्या उमेदवाराला काँग्रेस आणि पवार गटाचा पाठिंबा मिळायलाच हवा, अशी अडेल भूमिका उबाठा यावेळी घेत आहे. उबाठा खेळत असलेल्या या खेळीतूनच खरा खेळ सुरू होत आहे. २०२८ मध्ये राऊत यांची राज्यसभेची मुदत संपणार आहे. त्या वेळी त्यांना पुन्हा निवडून यायचं असेल, तर महाविकास आघाडीची एकजूट आणि संख्याबळ आवश्यक असेल. पण आजच जर त्या जागेवर उबाठा शिवसेनेचा दावा कमजोर केला गेला, तर दोन वर्षांनी राऊत यांचा मार्ग मोकळा होऊ शकतो. याच पृष्ठभूमीवर आदित्य ठाकरे यांची भूमिका महत्त्वाची ठरते. राज्यसभेच्या संभाव्य उमेदवारीबाबत प्रियांका चतुर्वेदी यांचं नाव पुढे करण्याचा प्रयत्न हा केवळ एका नेत्याच्या पुनर्नियुक्तीचा प्रश्न आहे की अन्य काही हे आदित्य ठाकरेच जाणोत. पण एक गोष्ट खरी आज जर महाविकास आघाडीच्या नावाखाली उबाठाने स्वतःचा उमेदवार पुढे रेटला, तर उद्याच्या अर्थात राऊतांसाठी मजबूत दावा करता येणार नाही. परिणामी, राऊत यांचा गेम होऊ शकतो. मातोश्रीवरील हे अंतर्गत राजकारण नवीन नाही. आज इतिहासाची पुनरावृत्ती होत असल्याची दिसत आहे. उद्धव ठाकरेंकडून पक्षाची जबाबदारी आदित्यकडेच जाईल, हे निर्विवाद सत्य आहे. राज्यसभेच्या सातव्या जागेवरून सुरू असलेली जुंपण, हे सगळं एका मोठ्या राजकीय घडामोडींचा भाग असल्याचं जाणवतं. राऊत हे केवळ प्रवक्ते नाहीत, ते उद्धव यांचे रणनीतीकार आहेत आणि आघाडीतील समन्वयकही आहेत. अशा नेत्याला भविष्यातील समीकरणांतून बाहेर ठेवायचं असेल, तर त्याची सुरुवात जागेच्या दाव्यापासूनच होऊ शकते. एवढी राजकीय समज आदित्य ठाकरेंना आलेली दिसते. बरं, आदित्यसमोर संजय राऊत बोलू शकत नाही ही त्यांची कमजोरी नव्हे मजबुरी आहे. त्यामुळेच आदल्या दिवशी पवारच राज्यसभेवर जाती असा छातीठोक दावा करणारे राऊत यांनी लगेच आदित्य ठाकरेंचं बरोबर असल्याचं घुमजाव दुसऱ्या दिवशी केलं. यानिमित्तानं केवळ महाविकास आघाडीमध्येच नव्हे तर मातोश्रीवरही सुप्त संघर्ष सुरू आहे, हे उघड झालं.

राजकारणात विजय आणि पराभव दोन्हीचा अभ्यास करावा लागतो. जर प्रत्येक वेळी पराभवाचं खापर मतफुटीवर, ईव्हीएमवर किंवा सहयोगी पक्षांवर फोडलं, तर आत्मपरीक्षण होत नाही आणि आत्मपरीक्षणाशिवाय रणनीती बदलत नाही. आज राज्यसभेच्या सातव्या जागेवरून सुरू असलेली ही कुस्ती केवळ एका उमेदवाराची नाही. ती २०२८ च्या समीकरणांची, मातोश्रीवरील प्रभावाची आणि भविष्यातील नेतृत्वाच्या रचनेची चाचपणी आहे. राऊत आणि आदित्य यांच्यातील जुंपण ही वैयक्तिक राजकीय स्वार्थाची, अस्तित्वाची आहे.

९२७०३३३८८६

## कीर्तनकार साहित्य संपदेचा वाहक

विदर्भ साहित्य संघाच्या निवडणुकीची चर्चा जोरात आहे. अध्यक्षपदाचे उमेदवार आणि त्यांच्या गटांनी उमेदवारीच्या समर्थनार्थ त्यांचे दृष्टिकोन मांडले आहेत पण निरागस, दर्जेदार, सद्भिरुचिपूर्ण आणि परस्पर सद्भावनेतून समाजाला एकत्रित बांधून ठेवण्याचा परिणाम साधण्याची क्षमता असणाऱ्या वाङ्मयीन कृती समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचवून साहित्याला सामाजिक चळवळ बनवू, असे आश्वासन कोणीही दिले नाही आणि ते बरोबरही आहे. कारण साहित्यिक केवळ साहित्याची निर्मिती करतो, पण तो त्याच्या कृतीचा वाहक नसतो. ते कार्य साहित्यिक चर्चा, अधिवेशने आणि संमेलनांच्या माध्यमातून होत असते. या उपक्रमांचा प्रभाव बहुधा शहरी आणि त्यातही काही विशिष्ट वर्गापुरता मर्यादित असतो. परिणामतः साहित्यिक चळवळ ही सार्वत्रिक लोकचळवळ न होता ठरावीक वर्गापुरती बंदिस्त बनली आहे. ही आजची स्थिती आहे. याउलट नगरवासींपासून ग्रामवासी आणि वनवासींपर्यंत अफाट पसरलेल्या भारतीय समाजाच्या जडणघडणीत रामायण, महाभारत आणि पौराणिक साहित्याचा मोठा भाग आहे, असे आपण मान्य करतो. म्हणजे साहित्य हे समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचले होते आणि सामाजिक सद्भावनेला व गुणवत्तेला बळ देणाऱ्या वाङ्मयीन कृती समाजाच्या आस्थेचा विषय बनल्या होत्या, असा त्याचा अर्थ होतो. असे साहित्य समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे कार्य जर कोणी केले असेल तर निर्विवादपणे असे म्हणावे लागते की, ते काम आपल्या कीर्तनकार-प्रवचनकारांनी केले आहे. तेच साहित्य संपदेचे वाहक आहेत. त्यामुळे हा वर्ग साहित्यिक चळवळीचा अविभाज्य अंग आहे; आज दुर्दैवाने तो दुर्लक्षित आहे, उपेक्षित आहे. कीर्तनकार व प्रवचनकार समाजाच्या सर्व स्तरात उपलब्ध आहेत. त्यांचा सर्वत्र संचार असतो, ते प्रतिभासंपन्न आहेत. अशांना प्रतिष्ठापूर्वक साहित्यिक चळवळीशी संलग्न करून त्यांच्या प्रतिभेचा उपयोग करून साहित्य प्रसाराला नवी दिशा व गती देता येणे शक्य आहे, असे वाटते.

**उषा दीक्षित**

## वाचक पत्रे

### रामफळ : लागवडीकडे दुर्लक्ष



रामनवमीला रामफळ खरेदी करून मंदिरात रामाच्या मूर्ती समोर अर्पण करतात. खवय्यांना या रामफळाची महती कळू लागल्याने आवर्जून रामफळ खरेदी केले जात आहे. साधारणतः हृदयासारख्या आकाराचे, पिवळट, लालसर, थोडेसे हिरवट व चवीला गोड रामफळाची विक्री हातोहात होत असते. रामफळ (कस्टर्ड ॲपल) हे सीताफळाच्या जातीचे. वर्षभर बाजारपेठेत ही फळे मिळत नाहीत. पूजाअर्चा विधीत जशी अन्य फळे असतात, तसे रामफळ नसते. चवदार असूनही क्वचित लोक ते घेतात. शेतकऱ्यांनी रामफळाचे उत्पादन घ्यायचे ठरवले तर या मालाला बाजारपेठ आहे. बिब्बा, कवठ, सीताफळ, जांभूळ, रामफळांच्या लागवडीसाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ प्रयत्न करत आहे; मात्र, शेतकऱ्यांचा प्रतिसाद नसल्याने कोरडवाहू फळ पिकांच्या जाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. रामफळही असेच एक दिवस नामशेष होऊन जाईल, अशी भीती कृषितज्ज्ञ व्यक्त करतात. राज्यात रामफळांच्या मोठ्या प्रमाणात बागा नाहीत. ग्रामीण भागात परसदारी किंवा शेतावर एखादे झाड असते. सरासरी सात वर्षाच्या एका झाडापासून वर्षाला १००-१५० फळे उत्पादन मिळते.

**नितीन दुर्बुडे**

### स्त्रियांची तल्लख स्मृती

स्त्री ही प्रत्येक कुटुंबाचा महत्त्वाचा भाग असते. तिच्याशिवाय कुटुंब पूर्ण होत नाही. मग ती कोणत्याही रूपात असो. जसे आई, पत्नी, बहीण, आजी, आत्या, मावशी. एकच व्यक्ती वेगवेगळ्या टप्प्यावर या सगळ्या जबाबदाऱ्या लीलया पेलते. आज स्त्री समाजातील प्रत्येक क्षेत्रात प्रगतिपथावर आहे. ग्रामसेविकापासून राष्ट्रपती पदापर्यंत तसेच शिक्षिका, खेळाडू, डॉक्टर, पोलिस, पायलट, अशा सर्व क्षेत्रात ती आघाडीवर आहे. मात्र तिला देण्यात येणारे मानधन पुरुषापेक्षा कमी असते. ही बाब चित्रपटसृष्टीतही आढळून येते. नुकत्याच झालेल्या संशोधनात असे आढळून आले आहे की, स्त्री व पुरुष त्यांच्या मेंदूतील जैविक मंडलांची जोडणी वेगळ्या प्रकारची असते. त्यामुळे ती मल्टिटास्किंग करू शकते. स्त्रीची स्मृती जास्त तल्लख असते. नवरात्रात स्त्रीचा गौरव केला जातो. तिच्या शक्तीची पूजा केली जाते. जागतिक स्तरावर झालेल्या स्त्री-पुरुषांच्या मेंदूच्या अभ्यासाच्या संशोधनाच्या कामगिरीत तज्ज्ञ म्हणून एका भारतीय महिलेने काम केले आहे.

**स्नेहल खंडागळे**

# अफगाणिस्तानचा पाकिस्तानी 'पीएमओ'जवळ हल्ला




शुक्रवारी मध्यरात्रीपासून अफगाणिस्तान आणि पाकिस्तान यांच्यात भीषण संघर्ष पेटला. अफगाणींच्या माऱ्यात पाकिस्तानच्या बाजोर जिल्ह्यातील सीमेवरील एका गावात मोठे नुकसान झाले. पर्वताच्या शिखरावर तैनात असलेले तालिबानी सैनिक

## चार लष्करी तळांवरही केला हल्ला

**काबुल, २७ फेब्रुवारी**

भारताची लढाऊ विमाने पाडल्याचा दावा करणाऱ्या पाकिस्तानच्या हवाई संरक्षण यंत्रणेची पोल उघडली आहे. अफगाणिस्तानने ड्रोनच्या माध्यमातून थेट इस्लामाबादेत 'एअर स्ट्राईक' केला. हे ठिकाण पाकिस्तानी पंतप्रधान कार्यालयापासून केवळ पाच किमी दूर आहे. केवळ इतकेच नव्हे, तर चार लष्करी तळांवरही हल्ले करण्यात आले. नॅशनल मिनिस्ट्री ऑफ डिफेन्सशी संबंधित वायुदलाने दिवसाढवळ्या हवाई हल्ले चढवले, असे अफगाणिस्तानच्या संरक्षण मंत्रालयाने म्हटले आहे. दरम्यान, दोन्ही देशांनी शांततेच्या माध्यमातून प्रश्न सोडवावा, असे आवाहन चीनने केले आहे.

शुक्रवारी रात्री सीमेवर हल्ला करून पाकिस्तानच्या ५५ सैनिकांना ठार केल्यानंतर अफगाणिस्तानने त्यांच्या शहरांवर हल्ले सुरू केले आहेत. आज सकाळी ११ वाजता इस्लामाबाद येथे अफगाणी वायुदलाने हवाई हल्ला केला, असे अफगाणिस्तानच्या संरक्षण मंत्रालयाने सांगितले. हे हल्ले दिवसाढवळ्या करण्यात आले.

अफगाणी वायुदलाने पाकिस्तानची राजधानी इस्लामाबादेतील फैजाबाद शहरातील एका लष्करी तळावर हल्ला केला. सोबतच खैबर पख्तुनख्वाच्या नौशेरातील एका लष्करी छावणी आणि जमरूद येथील लष्करी तळाला अचूक लक्ष्य केले. या व्यतिरिक्त अफगाणी वायुदलाने एबटाबाद येथेही हल्ले केले.

सकाळी अकरा वाजताच्या सुमारास इस्लामाबादेतील फैजाबादजवळचा लष्करी तळ, नौशेरा केन्ट, जमरूद लष्करी कॉलनी आणि एबटाबादला लक्ष्य करण्यात आले. या कारवाईत लष्करी ठिकाणे, केंद्र आणि सुविधा केंद्रांना यशस्वीपणे लक्ष्य करण्यात आले. काबुल, कंदहार आणि पक्तिया येथे पाकिस्तानी वायुदलाने रात्रीच्या वेळी केलेल्या हल्ल्यांना उत्तर देण्यासाठी ही कारवाई करण्यात आल्याचे अफगाणी संरक्षण मंत्रालयाने सांगितले.

### अफगाणिस्तानात तयार केलेल्या ड्रोनचा वापर

**या ड्रोन हल्ल्यांबाबत पाकिस्तानी सरकारकडून कोणतीही प्रतिक्रिया समोर आलेली नाही. पाकिस्तानी अफगाणी सैन्याने पाकिस्तानी लष्करी तळांवर ड्रोन हल्ले केल्याची माहिती अफगाणिस्तान बॉर्डर फोर्सच्या प्रवक्त्याने दिली. अफगाणिस्तानात तयार करण्यात आलेल्या ड्रोनचा वापर करून पाकिस्तानी लष्करी शासनाशी संबंधित केंद्रांना लक्ष्य केल्याचा दावा अफगाणी संरक्षण मंत्रालयाने केला.**



### शस्त्र वाटताना दिसले अफगाणी सैनिक

ताब्यात घेतलेली पाकिस्तानी शस्त्रास्त्रे अफगाणी मुजाहिद्दीन वाटत असल्याचे एका चित्रफितीत दिसून आले. अफगाणिस्तानने ड्युरांड लाईनवरील कित्येक पाकिस्तानी चौक्यांचा ताबा घेतल्याचे सांगितले जात आहे. या कारवाईत मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्रे जप्त करण्यात आली.

### कित्येक सैनिकांना अटक

**अफगाणिस्तानातील वृत्तवाहिन्यांनुसार, केलेल्या कारवाईत पाकिस्तानचे ५५ सैनिक ठार झाले. अफगाणी लष्कराने सैनिकांचे काही मृतदेह तसेच शेकडो हलके आणि जड शस्त्रे जप्त केली. येथे कित्येक पाकिस्तानी सैनिकांना अटक करण्यात आल्याचा दावा करण्यात आला. पाकिस्तानची दोन लष्करी मुख्यालये आणि १९ चौक्या जप्त केल्याचा दावाही अफगाणिस्तानने केला.**

## मणिपूरमध्ये पाच बंडखोरांना अटक

**इम्फाळ, २७ फेब्रुवारी**

मणिपूरच्या खोऱ्यातील जिल्ह्यांमधून सुरक्षा दलांनी विविध बंदी घातलेल्या संघटनांशी संबंधित पाच बंडखोरांना अटक केली, असे पोलिसांनी शुक्रवारी सांगितले. दोन जिल्ह्यांमध्ये वेगवेगळ्या कारवाईत १० बंदुका आणि दारूगोळ्याचा साठा जप्त करण्यात आला.

बुधवारी इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील कोइरेंगेई मानुंग लायखोन लीकाई भागातून प्रतिबंधित पीपल्स लिबरेशन आर्मीच्या एका सक्रिय कॅडरला अटक करण्यात आली, असे पोलिसांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. त्याच्या ताब्यातून या संघटनेचे तीन बॅनर जप्त करण्यात आले. याच दिवशी इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील याइंगांगपोक्पी येथून बंदी घातलेल्या संघटनेच्या इतर दोन कार्यकर्त्यांनाही अटक करण्यात आली. त्यांच्याकडून एक हातबॉम्ब, एक डिटोनेटर आणि दारूगोळा जप्त करण्यात आला. इम्फाळ पश्चिम जिल्ह्यातील वाहेंग खुमान भागातूनही या संघटनेच्या आणखी एका सदस्याला अटक करण्यात आली आहे. गुरुवारी इम्फाळ पूर्वेतील लिशम लीरक येथील त्याच्या निवासस्थानातून बंदी घातलेल्या केसीपी (पीएससी)च्या एका सक्रिय कॅडरला अटक करण्यात आली. गुरुवारी इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील लायरो चिंग परिसरात केलेल्या कारवाईत सुरक्षा दलांनी शस्त्रास्त्रे आणि दारूगोळ्याचा साठा जप्त केला.

# ऑपरेशन सिंदूर-२ साठी भारतीय लष्कर सज्ज

### वेस्टर्न कमांडचे लेफ्टनंट जनरल पुष्कर यांचा पाकिस्तानला इशारा

**पठाणकोट, २७ फेब्रुवारी**

भारताने राबविलेल्या ऑपरेशन सिंदूरने पाकिस्तानला गुडघे टेकवण्यास भाग पाडले होते. ही मोहीम केवळ एक नमुना होती. शत्रूच्या एका चुकीची आम्ही वाट पाहत आहोत. त्यांनी हल्ल्याचा प्रयत्न केल्यास भारतीय लष्कर ऑपरेशन सिंदूर-२ सुरू करेल. यावेळी पाकिस्तानला मोठी किंमत चुकवावी लागेल असा इशारा भारतीय लष्कराच्या वेस्टर्न कमांडचे लेफ्टनंट जनरल राजेश पुष्कर यांनी दिला आहे.

पंजाबच्या पठाणकोट येथील लष्करी तळावर सुरू असलेल्या युद्ध सरावाच्या अखेरच्या दिवशी प्रसार माध्यमांशी संवाद साधताना लेफ्टनंट जनरल पुष्कर म्हणाले, भारतीय लष्कराकडून सुरू असलेला सराव ऑपरेशन सिंदूर २.० चा भाग आहे. शत्रूवर कारवाईची वेळ आल्यास हल्ल्याची व्याप्ती मागच्या वेळेपेक्षा खूप जास्त असेल. गेल्या वर्षी राबवलेल्या ऑपरेशन सिंदूरमध्ये मिळालेल्या यशाचा उल्लेख करताना ते म्हणाले, भारताने पाकिस्तानला कठोर संदेश दिला आणि त्यावेळी अवघ्या चारच दिवसांत गुडघे टेकायला भाग पाडले. पाकिस्तानला लहानसा नमुना दाखवला होता. ऑपरेशन सिंदूर- २ साठीची तयारी भारतीय लष्कराने केली आहे. ही मोहीम कशा प्रकारे पार पडेल याबद्दल मी तुम्हाला आता सांगू शकत नाही, कारण ते आपल्याला शत्रूचे किती नुकसान करायचे, यावर अवलंबून असेल. आम्ही तिन्ही मार्गांनी कारवाई करण्यासाठी आम्ही सज्ज आहोत. भारताला कमकुवत समजणे ही त्यांची चूक असेल.



### अण्वस्त्र धमक्यांना घाबरत नाही -लेफ्टनंट जनरल कटियार

'वेस्टर्न कमांड'चे प्रमुख लेफ्टनंट जनरल मनोज कुमार कटियार यांनी सांगितले की, लष्कर भविष्यातील कोणत्याही परिस्थितीसाठी पूर्णपणे तयार असून अण्वस्त्रांच्या धमक्यांना घाबरणार नाही. भविष्यातील कोणत्याही संघर्षाचा निकाल निर्णायक असेल. या वेळी आम्ही पूर्वीपेक्षा अधिक चांगल्या प्रकारे तयार आहोत आणि आमच्याकडे भविष्यासाठी स्पष्ट योजना आहे.

# एपस्टीन प्रकरणात क्लिंटन दाम्पत्याची चौकशी

### अमेरिकेच्या बड्या नेत्यांचे धाबे दणाणले

**वॉशिंग्टन, २७ फेब्रुवारी**

मानवी तस्कर जेफ्री एपस्टीनचा मृत्यू होऊन अनेक वर्षे झाली असली तरी, एपस्टीन फाइल्सने पुन्हा एकदा अमेरिकेच्या राजकारणात भूकंप आणला आहे. या प्रकरणात आता अमेरिकेच्या माजी परराष्ट्र मंत्री हिलेरी क्लिंटन आणि त्यांचे पती माजी राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांच्या अडचणी वाढल्या आहेत. रिपब्लिकन पक्षाच्या नेतृत्वाखालील हाऊस ओव्हरसाइट कमिटी त्यांची चौकशी करणार आहे.



हिलेरी यांचे पती आणि माजी राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांचीही चौकशी होणार असून, यामुळे अनेक बड्या नेत्यांचे धाबे दणाणले आहेत. जेफ्री एपस्टीन आणि त्याची साथीदार गिलेन मॅक्सवेल यांच्या लैंगिक गुन्ह्यांची चौकशी सध्या सुरू आहे. २०१९ मध्ये न्यूयॉर्कच्या तुरुंगात एपस्टीनचा संशयास्पद मृत्यू झाला होता.

मात्र, अलीकडेच समोर आलेल्या सरकारी कागदपत्रांमध्ये (एपस्टीन फाइल्स)अनेक दिग्गज नेत्यांची नावे समोर आली. हाऊस ओव्हरसाइट कमिटी आता क्लिंटन दाम्पत्याची चौकशी करणार आहे. सुरुवातीला क्लिंटन दाम्पत्याने या कमिटीसमोर हजर राहण्यास नकार दिला होता. मात्र, रिपब्लिकन खासदारांनी काँग्रेसचा अवमान केल्याप्रकरणी कारवाई करण्याची धमकी दिल्यानंतर त्यांनी चौकशीला सामोरे जाण्याची तयारी दर्शवली. बिल क्लिंटन यांनी या चौकशीला राजकीय सूडबुद्धी आणि कांगारू कोर्ट असे संबोधले असून, ही सर्व प्रक्रिया केवळ राजकारणाने प्रेरित असल्याचे म्हटले आहे.

# एसआयआरसाठी गेलेल्या अधिकाऱ्यांवर जीवघेणा हल्ला

### मुले चोरणारे असल्याचा झाला समज

**कोलकाता, २७ फेब्रुवारी**

पश्चिम बंगालमधील मतदार याद्यांचे पुनरीक्षण अर्थात् एसआयआर प्रक्रियेत सहभागी असलेले दोन अधिकारी चुकून ओडिशाच्या बालासोर जिल्ह्यातील एका गावात पोहोचले. त्यांनी नागरिकांना माहिती मागायला सुरुवात केली असता, गावकऱ्यांनी त्यांना मुले चोरणारे समजून जबर मारहाण केली.

दोन्ही अधिकारी पश्चिम बंगालच्या सीमेला लागून असलेल्या बालासोर जिल्ह्यातील रायबानिया पोलिस ठाणे परिसरातील एका गावात पोहोचले. त्यांना पश्चिम बंगालच्या नयाग्राम ब्लॉकमधील एका गावात जायचे होते. तथापि, त्यांनी भाड्याने घेतलेल्या ऑटो-रिक्षाच्या चालकाने त्यांना चुकून ओडिशाच्या एका सीमावर्ती गावात नेले. स्थानिकांना मुले चोरणाऱ्या टोळीचे सदस्य असल्याचा संशय आला आणि त्यांनी त्यांच्यावर हल्ला केल्याची माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने दिली. माहिती मिळताच स्थानिक पोलिस घटनास्थळी पोहोचले, परंतु जमावाने पोलिसांना अडथळा आणला आणि पोलिस पथकाशी झटापट केली. काही वेळाने पोलिसांनी दोन्ही अधिकाऱ्यांना जमावापासून वाचवले. याप्रकरणी गुन्हा दाखल करून ७२ जणांना अटक केली आहे.

# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे 'प्रचंड'मधून उड्डाण



जैसलमेर येथील हवाई तळावर 'प्रचंड'मधून उड्डाण करण्यापूर्वी स्वदेशी बनावटीच्या हेलिकॉप्टरसोबत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, हवाईदल प्रमुख एपी सिंग व अधिकाऱ्यांनी छायाचित्र काढले.

**जैसलमेर, २७ फेब्रुवारी**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी शुक्रवारी वायुदलाच्या जैसलमेर तेथील तळावरून स्वदेशी हलक्या लढाऊ हेलिकॉप्टर (एलसीएच) प्रचंडमधून उड्डाण केले. त्या प्रचंड हेलिकॉप्टरमध्ये सह-वैमानिक म्हणून उड्डाण करणाऱ्या देशाच्या पहिल्या राष्ट्रपती आहेत.

द्रौपदी मुर्मू यांनी उड्डाणादरम्यान हेलिकॉप्टरच्या कॉकपिटमधून सॅल्यूट केला. मुर्मू यापूर्वी लढाऊ विमाने सुखोई आणि राफेलमधून उड्डाण करणाऱ्या देशाच्या पहिल्या राष्ट्रपती ठरल्या होत्या.

द्रौपदी मुर्मू सकाळी सव्वानऊ वाजताच्या सुमारास जैसलमेर येथील वायुदलाच्या तळावर पोहोचल्या. लष्करी अधिकाऱ्यांनी त्यांना हेलिकॉप्टरबद्दल माहिती दिली. यानंतर त्या कॉकपिटमध्ये बसल्या. त्यानंतर सव्वाअकरा वाजताच्या सुमारास ग्रुप कॅप्टन एन. एस. बहुआ यांच्यासोबत हेलिकॉप्टरमधून उड्डाण केले. हेलिकॉप्टरमध्ये २५ मिनिटांच्या उड्डाणादरम्यान मुर्मू यांनी सीमावर्ती भाग आणि पोखरण फील्ड फायरिंग रेंजची पाहणी केली.

जैसलमेरच्या सोनार किल्ल्यावरून 'प्रचंड' हेलिकॉप्टरमधून उड्डाण करताना द्रौपदी मुर्मू यांनी रेडिओद्वारे देशाला संदेश दिला. त्या म्हणाल्या, मी आज प्रचंड हेलिकॉप्टरमधून उड्डाण करत आहे. प्रचंड हेलिकॉप्टर आत्मनिर्भरतेचे एक मजबूत प्रतीक आहे. मी सध्या जैसलमेरच्या प्रसिद्ध किल्ल्यावरून उड्डाण करत आहे. मी देशाच्या वीर सैनिकांना अभिमानाने धन्यवाद देते. माझा सर्वांना प्रेमळ नमस्कार. जय हिंद, जय भारत.

# दिवाळखोर व्यावसायिक बांगलादेश सेंट्रल बँकेचे गव्हर्नर

**● पंतप्रधान रहमान यांना विरोधकांचा इशारा ● झुंडशाही खपवून घेणार नाही**

**ढाका, २७ फेब्रुवारी**

बांगलादेशमध्ये सेंट्रल बँकेच्या नवीन गव्हर्नरपदी बँकांनी दिवाळखोर घोषित केलेल्या व्यावसायिकाची नियुक्ती केल्याने विरोधक संतापले. देशात झुंडशाही सुरू झाली असून, गव्हर्नरचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी त्यांनी पंतप्रधान तारिक रहमान यांच्याकडे केली.

बांगलादेश बँकेचे नवीन गव्हर्नर म्हणून मोस्ताकुर रहमान यांच्या नियुक्तीनंतर राजकीय संघर्ष तीव्र झाला. जमात-ए-इस्लामीचे प्रमुख आणि विरोधी पक्षनेते शफीकुर रहमान यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना म्हटले की, हा निर्णय पंतप्रधानांच्या सांगण्यावरून घेण्यात आला आहे आणि तो सहन केला जाणार नाही.

सरकारने अहसान हबीब मन्सूर यांना कार्यकाळ संपण्यापूर्वीच पदावरून हटवले आणि रहमान यांची तडकाफडकी नियुक्ती केली. आतापर्यंत बांगलादेशात केंद्रीय बँकेचे गव्हर्नर अनुभवी बँकर, अर्थशास्त्रज्ञ किंवा वरिष्ठ नागरी सेवक असायचे, मात्र पहिल्यांदाच व्यावसायिकाची या पदावर नियुक्ती करण्यात आली, हे नियमांचे उल्लंघन आहे. त्यांची कंपनी ८६ कोटींचे कर्ज फेडण्यात अपयशी ठरली. जो व्यक्ती आपल्याच कंपनीसाठी विशेष अटींवर कर्जाची पुनर्रचना करतो, तो देशाच्या बँकिंग प्रणालीच्या हिताचे रक्षण कसे करेल असा प्रश्न विरोधकांनी उपस्थित केला.

## चित्रपट वार्ता

### तापसी पन्नूने जारी केला 'अस्सी'चा व्हिडीओ

**मुंबई** : अभिनेत्री तापसी पन्नूने चित्रपटाबद्दल एक व्हिडीओ तयार केला आहे. यामध्ये तिने चित्रपटाला मिळालेल्या कौतुक आणि पुनरावलोकनांबद्दल चर्चा केली आहे. व्हिडीओमध्ये तापसीने 'थप्पड' पासून 'अस्सी' पर्यंत सर्व गोष्टींबद्दल सांगितले आणि लोकांना चित्रपट पाहण्याचे आवाहन केले. तापसीने तिच्या इंस्टाग्राम खात्यावर एक व्हिडीओ जारी केला. व्हिडीओमध्ये ती, काही चित्रपटांना संदेश मिळतात की त्यांची कथा किती अद्भुत आहे. काहींना त्यांच्या पात्रांसाठी प्रशंसा मिळते, पण काहींना चित्रपट बनवल्याबद्दल धन्यवाद, असे संदेश मिळतात. कथा अस्वस्थ करणारी आहे. ती घृणास्पद आहे, पण तरीही तुम्ही ती पाहिली पाहिजे. ही एक तातडीने पाहण्याची गरज आहे, असे ती 'अस्सी' चित्रपटाबद्दल सांगते आहे.



### मृणाल ठाकूरने अल्लू अर्जुनला पाठवला पुष्पगुच्छ

**चेन्नई** : ७० व्या फिल्मफेअर साऊथ अवॉर्ड्समध्ये अभिनेता अल्लू अर्जुनला 'पुष्पा २' या चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार मिळाला. अभिनेत्री मृणाल ठाकूरने अल्लू अर्जुनला फुलांचा गुच्छ पाठवला आणि एक चिठ्ठीही लिहिली. यात तिने, सर फिल्मफेअरमध्ये सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार जिंकल्याबद्दल मनःपूर्वक अभिनंदन. हा सन्मान तुमच्यासाठी पूर्णपणे योग्य आहे. तुमची मेहनत, सखोलता आणि प्रत्येक अभिनयात दिसणारी ऊर्जा प्रेरणादायी आहे, असे लिहिले आहे. अल्लू अर्जुनने या गुच्छाचा फोटो इंस्टाग्राम स्टोरीवर जारी केला. खूप खूप धन्यवाद मृणाल. तुमचा संदेश खूप सुंदर आहे. आशा आहे की, लवकरच तुमच्यासोबत काम करण्याची संधी मिळेल, असे त्याने प्रत्युत्तरात लिहिले.



### १२ वर्षांनी री-रिलीज होणार 'हंसी तो फंसी'




**मुंबई** : परिणीती चोप्रा आणि सिद्धार्थ मल्होत्रा यांनी २०१४ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'हंसी तो फंसी' या रोमँटिक ड्रामामध्ये काम केले होते. मागील १२ वर्षांत या चित्रपटाने कल्ट दर्जा मिळवला आहे. हा चित्रपट पुन्हा चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. हा चित्रपट ६ मार्च रोजी पुन्हा प्रदर्शित होणार असल्याचे पीव्हीआर आयनॉक्सने एका अधिकृत निवेदनात जाहीर केले. करण जोहर, विकास बहल, विक्रम आदित्य मोटवणे आणि अनुराग कश्यप निर्मित, या चित्रपटातून विनिल मॅथ्यूने दिग्दर्शनात पदार्पण केले होते. हा चित्रपट वर-निखिल (सिद्धार्थ) आणि शास्त्रज्ञ मीता (परिणीती) यांच्यातील एका अनोख्या प्रेमप्रकरणाची कहाणी सांगता. अनुराग कश्यपने चित्रपटाचे संवादही लिहिले.

# सोन्यावरील कराचे नियम १ एप्रिलपासून बदलणार

**नवी दिल्ली, २७ फेब्रुवारी**

भारतातील सोन्याच्या गुंतवणुकीबाबत एक मोठा धोरणात्मक बदल सुरू आहे. सरकारने सॉवरेन गोल्ड बाँड (एसजीबी) योजनेअंतर्गत कर सवलतीच्या नियमांमध्ये सुधारणा केली आहे. ज्याचा थेट परिणाम स्टॉक एक्सचेंजमधून सोने खरेदी करणाऱ्या गुंतवणूकदारांवर होईल. २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात सादर केलेल्या या बदलांनुसार, दुय्यम बाजारातून खरेदी केलेल्या एसजीबीवरील कर सवलत १ एप्रिल २०२६ पासून बंद करण्यात आली आहे.

**नवीन नियम काय आहे?**

सध्याच्या नियमांनुसार, सॉवरेन गोल्ड

### गुंतवणूकदारांना सहन करावा लागेल कराचा बोजा

बाँड मॅच्युरिटी (आठ वर्षे)पर्यंत धारण केल्याने होणारा भांडवली नफा करमुक्त होता. मग तो थेट सरकारकडून खरेदी केला गेला असेल किंवा स्टॉक एक्सचेंजमधून. तथापि, नवीन नियमांनुसार, करमुक्त मॅच्युरिटीचा लाभ आता फक्त त्या मूळ गुंतवणूकदारांना मिळेल ज्यांनी प्राथमिक इश्यू दरम्यान थेट रिझर्व्ह बँकेच्या माध्यमातून बाँडची सदस्यता घेतली होती. तज्ज्ञांच्या मते, जर एखाद्या गुंतवणूकदाराने १ एप्रिल २०२६ नंतर दुय्यम बाजारातून (एनएसई / बीएसई) एसजीबी खरेदी केले किंवा ते भेट घेतले, तर मॅच्युरिटी नफा आता करमुक्त मानला जाणार नाही.

या बदलाचा थेट गुंतवणूकदारांच्या कमाईवर परिणाम होईल. जर तुम्ही एक्सचेंजमधून ७,००० ला बाँड खरेदी केला आणि त्याची मॅच्युरिटी किंमत ११,००० पर्यंत वाढली, तर ४,००० चा नफा होतो. आता यावर १२.५% दराने दीर्घकालीन भांडवली नफा (एलटीसीजी) कर आकारला जाईल. याचा अर्थ तुम्हाला प्रति बाँड ५०० कर भरावा लागेल. पूर्वी, ही संपूर्ण रक्कम गुंतवणूकदाराकडे जात असे.

तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की ,या निर्णयामुळे दुय्यम बाजारपेठेतील एसजीबीची तरलता आणि आकर्षण कमी होऊ शकते. पूर्वी, गुंतवणूकदार अनेकदा करमुक्त नफा मिळविण्यासाठी एक्सचेंजवर सवलतीच्या दरात बाँड खरेदी करण्याची रणनीती वापरत असत. परंतु, आता हे प्रभावी राहणार नाही.




### गुंतवणूकदार दोन श्रेणींमध्ये विभागले

**या नियमाने गोल्ड बॉन्ड गुंतवणूकदारांना दोन श्रेणींमध्ये विभागले आहे.**

- **प्राथमिक गुंतवणूकदार** : त्यांना २.५% वार्षिक व्याज तसेच मॅच्युरिटीवर पूर्णपणे करमुक्त परतावा मिळेल.
- **दुय्यम बाजारातील खरेदीदार** : त्यांना २.५% व्याज मिळेल. परंतु, परिपक्वतेच्या रकमेवर कर आकारला जाईल.

## थोडक्यात महत्त्वाचे...

### सातपुडा पर्वतरांगांवर फुलली पळसाची फुले!



**तळोदा** : तालुक्यातील कुंडवे, इच्छागव्हाण शिवारात वसंत ऋतूत अर्थात होळीच्या सुमारास येणारी, गर्द केशरी-लाल रंगाची, वणव्यासारखी दिसणारी आयुर्वेदिक पळसाची फुले (पलाश) आहेत. पळसाला 'जंगलाची ज्वाला' असेही म्हणतात. कारण, फुले बहरल्यावर झाड जणू पेटल्यासारखे दिसते. या फुलांचा वापर नैसर्गिक रंग तयार करण्यासाठी, त्वचेच्या समस्या, केसांची निगा आणि पचन सुधारण्यासाठी केला जातो. ही फुले पोटातील जंत कमी करण्यास, सूज आणि वेदनाशामक गुणधर्मांसाठी प्रसिद्ध आहेत. सातपुडा पर्वतरांग, डोगराळ व मैदानी भागात ही पळसाचे झाडे आणि त्याची फुले मनमोहक, आनंददायी, आकर्षक दिसून येत असून, ही फुले सौंदर्य निखारताना दिसतात. आदिवासी भागात काही लोकं ही पळसाची फुले उचलून ठेवतात आणि फुले पाण्यात भिजवून त्या फुलाच्या केसरी रंगाच्या पाण्याने लहान मुलांना आंघोळ घालतात. याने लहान मुलांचे शरीराचे तापमान चांगले राहते, असे जाणकार व्यक्तींकडून सांगण्यात येते.



### राजकुळे विद्यालयात शहिदी समागम कार्यक्रम

**तळोदा** : 'हिंद-दी-चादर' श्री गुरू तेग बहादूर यांचे ३५० वे शहिदी समागम शताब्दी वर्ष असल्याने, त्यांचा गौरवशाली इतिहास व बलिदान सर्वांना माहीत व्हावे, यासाठी शहरातील गुलाबबाई दुल्लभ राजकुळे कन्या विद्यालयात विविध शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. गटशिक्षणाधिकारी शेखर धनगर अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी देवमोगरा विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष चेतन पवार, समन्वयक निमेश सूर्यवंशी, मुख्याध्यापक मिलिंद धोदरे, संचालक महेश मगरे आदी उपस्थित होते. सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून व गुरू तेग बहादूर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. विद्यार्थिनींनी भक्तिगीते सादर केली. वक्तृत्व स्पर्धेत ३० विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला. निबंधलेखन स्पर्धेलाही विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विद्यार्थिनींनी शहिदी समागमचे ऐतिहासिक व सामाजिक महत्त्व भाषणातून प्रभावीपणे मांडले. गटशिक्षणाधिकारी धनगर यांनी उपक्रमांचे कौतुक केले. कार्यक्रमास दिलीप तडवी, भाग्यश्री सागर, दिनेश मराठे, आकाश टवाळे, ज्योती महाजन, अनिल मगरे, सुदाम माळी, धनराज केदार, हिरालाल पाडवी आदी उपस्थित होते. वैशाली देवरे यांनी सूत्रसंचालन केले. योगेश पाटील यांनी आभार मानले.



### डॉ. काणे गर्ल्स हायस्कूलमध्ये गीतगायन स्पर्धा

**नंदुरबार** : 'हिंद-दी-चादर' श्री गुरू तेग बहादूर यांचे ३५० वे शहिदी समागम शताब्दी वर्ष असल्याने, त्यांचा गौरवशाली इतिहास व बलिदान सर्वांना माहीत व्हावे, यासाठी शहरातील डॉ. काणे गर्ल्स हायस्कूलमध्ये भक्तिगीत गायन कार्यक्रम झाला. मुख्याध्यापिका सीमा मोडक अध्यक्षस्थानी होत्या. याप्रसंगी पर्यवेक्षक मिलिंद चव्हाण, महेश भट यांची उपस्थिती होती. मुख्याध्यापिका मोडक यांनी सांगितले की, श्री गुरू तेग बहादूरजी यांनी काश्मिरी पंडित, धार्मिक स्वातंत्र्य, मानवी मूल्य, तसेच अन्यायाविरोधात लढा देऊन शहीद झाले. याप्रसंगी नूपुर गिरासे, आराध्या गावित यांनी भक्तिगीते सादर केली. वक्तृत्व स्पर्धेत वैष्णवी धनगर, जान्हवी गोरे, ज्योत्स्ना कोकणी या विद्यार्थिनींनी यश प्राप्त केले. सहभागी विद्यार्थिनींना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले. शांताराम पाटील यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले.



### मालपूरला गाथा पारायण, कीर्तन सप्ताहास प्रारंभ

**मालपूर (शिंदखेडा)** : मालपूर येथे संत तुकाराम महाराज प्रतिष्ठानतर्फे रामचंद्र महाराज (मालपूरकर) यांच्या मार्गदर्शनात श्री संत तुकाराम महाराज सदेह वैकुंठ गमन बीजनिमित्त श्री संत तुकाराम महाराज गाथा पारायण व अखंड हरिनाम कीर्तन सप्ताहास गावातून पालखी सोहळा फिरवुन प्रारंभ झाला. शुक्रवारी (६ मार्च) महाप्रसादाचे वाटप होईल. सप्ताहात रोज पहाटे ४ ते ५ प्रभातफेरी, ५ ते ७ काकडा आरती, सकाळी ८ ते १० व दुपारी २ ते ४ गाथा पारायण, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, रात्री ८ ते १० किर्तन होणार आहे. सप्ताहात गुरुवारी (२६ फेब्रुवारी) अतुल महाराज (जैताणेकर) व शुक्रवारी (२७ फेब्रुवारी) प्रथमेश महाराज (मुंजवाळकर) यांची कीर्तने झाली. शनिवारी (२८ फेब्रुवारी) श्यामसुंदर महाराज (सौंदाणे), रविवारी (१ मार्च) मुकुंद महाराज (ढेकूकर), सोमवारी (२ मार्च) कैलास महाराज (टाकरखेडा), मंगळवारी (३ मार्च) विजय महाराज काळे (पिंपळनेरकर), बुधवारी (४ मार्च) तात्या महाराज (भुईगव्हाण), गुरुवारी (५ मार्च) पोपटनाना कपालेश्वर यांची कीर्तन होतील. शुक्रवारी (६ मार्च) सकाळी ९ ते ११ अशोक महाराज (विखरण देवाचे) यांचे काल्याचे कीर्तन होईल. यानंतर महाप्रसादाचे वाटप होईल.



### साक्री येथे शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन

**साक्री** : येथील रूपाईनगर परिसरात कुळवाडीभूषण छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. रेखा देवरे अध्यक्षस्थानी होत्या. सर्वप्रथम शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कबिराकार कवी डॉ. दिलीप लोखंडे यांनी प्रास्ताविक केले. उपस्थित सर्वांकडून शिवशपथ वदवून घेण्यात आली. डॉ. दिलीप लोखंडे यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले. कार्यक्रमासाठी डॉ. श्यामराव कवडे, प्रमिला कवडे, पूजा महाले, प्रभावती बागूल, प्रियांका देवरे, शोभा लोखंडे यांनी सहकार्य केले.

### नंदुरबारला ६ वर्षांच्या चिमुरड्यांनी जपले रोजाचे व्रत

**नंदुरबार** : शहरातील अवघ्या सहा वर्षांच्या अरिबा दानिश अहमद बागवान



आणि कशफ अश्फाक शेख या दोन मुलींनी दोन दिवस कडक रोजा (उपवास) पाळून अल्लाहची इबादत केली. दोन्ही मुलींच्या कौतुकासाठी इस्माईल दगू जनसेवा फाउंडेशनतर्फे विशेष कार्यक्रम घेण्यात आला. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एजाजभाई बागवान यांनी दोन्ही मुलींचे पुष्पहार घालून स्वागत केले. त्यांना रोख पारितोषिक आणि सायंकाळी रोजा सोडण्यासाठी (इफ्तार) मिठाईचे बॉक्स दिले. या वेळी जनसेवा महिला स्वयंसहाय्यता बचत गटाच्या अध्यक्षा रुकसाना बागवान, सय्यद मकसूद, फाउंडेशनचे सचिव दानिश अहमद बागवान, हलिमा अश्फाक शेख आदी उपस्थित होते. दोन्ही मुलींनी पाचही वेळेची नमाज अदा करून धार्मिक शिस्त पाळली.

# गाव-पाड्यांत भोंगऱ्या बाजारात जल्लोष!

## आदिवासी बांधवांच्या लोकगीत गायन, बासरीवादनाने उत्सवात रंगत

**तभा वृत्तसेवा**
**शिरपूर, २७ फेब्रुवारी**

तालुक्यातील सातपुडा पर्वतरांगेतील पनाखेडसह आदिवासी गाव-पाड्यात भोंगऱ्या बाजारांची धूम सुरू आहे. नोकरी व रोजगारासाठी स्थलांतरित झालेली कुटुंबेही भोंगऱ्या, होळी, रंगपंचमी, मेलादा उत्सव साजरा करण्यासाठी गावी पोहोचली. यामुळे सातपुड्यातील आदिवासी गाव-पाडे गजबजून गेली आहेत. पनाखेड (ता. शिरपूर) येथे भोंगऱ्या बाजार बुधवारी (२५ फेब्रुवारी) भरविण्यात आला. भोंगऱ्या बाजार हा आदिवासी संस्कृतीतील महत्त्वाचा सण आहे. ज्याद्वारे सांस्कृतिक मूल्यांचे जतन व संवर्धन होत आहे. यासाठी महाराष्ट्र-मध्य प्रदेश सरहद्दीवरील डोंगरदऱ्यांत राहणारे व परिसरातील गाव- पाड्यांतील आदिवासी बांधव, महिलांसह तरुणाई, लहान मुले उत्सवात सहभागी झाले होते. परिसरातील काही गावांतील आदिवासी बांधवांनी पारंपरिक आदिवासी ढोल, बासरी, कांस्याची थाळी, मांदलच्या निनादात पारंपरिक आदिवासी गीतांसह गटागटाने नृत्य सादर करून भोंगऱ्या उत्सवात रंगत आणली. सायंकाळी उशिरापर्यंत समाजबांधवांनी पारंपरिक कार्यक्रम सादर करून जल्लोषात भोंगऱ्या बाजराची सांगता केली.





पनाखेड (ता. शिरपूर): भोंगऱ्या भाजारात ढोलवादन करताना आदिवासी बांधवांबरोबर सरपंच वेरसिंग पावराव व पदाधिकारी.

सरपंच वनसिंग पावरा, पोलीसपाटील दिनेश पावरा, पंचायत समितीचे माजी सदस्य बालकिसन पावरा, ग्रामसेवक हेमंत चौधरी, माजी पोलीसपाटील शिवदास भिल, माजी सरपंच सीताराम पावरा, बालकिसन पावरा, सामाजिक कार्यकर्ते खेलसिंग पावरा, मेरसिंग पावरा, सखाराम भिल, भिसन पावरा, जाड्या पावरा आदींनी भोंगऱ्या बाजाराच्या नियोजनासाठी पुढाकार घेतला. बाजारात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी शिरपूर तालुका पोलीस ठाण्याचे सहायक निरीक्षक जयपाल हिरे यांच्या मार्गदर्शनात पोलीस कर्मचारी नजर ठेवून होते.

**रस्त्याच्या दुतर्फा थाटली दुकाने**

पनाखेड गावातून धुळे- इंदूर राष्ट्रीय महामार्गाचा रस्ता असल्यामुळे भोंगऱ्या बाजार मुख्य ग्रामपंचायत पटांगणात व खैरखुटी रस्त्याच्या दुतर्फा व्यावसायकांनी मेवा मिठाई, वस्त्रालंकार, गृहोपयोगी वस्तू, पाळणे व झुल्यांसह अनेक दुकाने थाटली होती.

**लाखोंची उलाढाल**

भोंगऱ्या बाजारात आलेल्या समाजबांधवांनी होळीसाठी प्रसाद म्हणून डाळ्या, फुटाणे, साखरेचे कंगनहार व ओल्या खजुराची मोठ्या प्रमाणात खरेदी केली. महिला व तरुणींनी वस्त्रालंकार, गृहोपयोगी वस्तू, पारंपरिक पद्धतीचे कपडे व दागदागिन्यांच्या दुकानांसह लहान मुलामुलींसाठी, स्वतःसाठी कपडे खरेदी करताना आदिवासी बांधव दिसून आले. या खरेदीमुळे बाजारात लाखो रुपयांची उलाढाल दिसून आली.

## मराठी भाषा गौरव दिननिमित्त ग्रंथदिंडी, प्रदर्शन अन् प्रतिमापूजन

### नवापूरमध्ये गांधी पुस्तकालय, कुसुमाग्रज प्रबोधिनीतर्फे विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**नवापूर, २७ फेब्रुवारी**

ज्येष्ठ कवी वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांनी साहित्य क्षेत्रात मोलाचे योगदान दिले असून, मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहेत. मातृभाषेचा गौरव म्हणून कवी वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून शहरातील गांधी पुस्तकालय व कुसुमाग्रज प्रबोधिनीतर्फे साजरा करण्यात आला. यानिमित्त ग्रंथदिंडी, ग्रंथप्रदर्शन, प्रतिमापूजनासह विविध कार्यक्रम घेण्यात आले.

ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज यांच्या जन्मदिवशी मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून महात्मा गांधी पुस्तकालय व कुसुमाग्रज प्रबोधिनीतर्फे शुक्रवारी (२७ फ



ेब्रुवारी) सकाळी आठला ग्रंथदिंडी, ग्रंथप्रदर्शन, कुसुमाग्रजांच्या प्रतिमेचे पूजन आदी कार्यक्रम घेण्यात आले. कुसुमाग्रजांच्या प्रतिमेचे पुजन पुस्तकालयाचे कार्यवाह राजेंद्र साळुंखे यांच्या हस्ते करण्यात आले. हेमंतभाई शाह अध्यक्षस्थानी होते. पुस्तकालयाचे सदस्य राहुल साळुंखे, साहित्यिक गोपाल पवार, विजया पाटील, सरला साळुंखे, कुसुमाग्रज प्रबोधिनीचे माजी अध्यक्ष विजय चव्हाण, साहित्यिक विजय बागुल, ग्रंथपाल सुधीर साळुंखे, ग्रंथालयसेवक मुकेश सांगळे आदी उपस्थित होते.

ग्रंथदिंडीत सार्वजनिक मराठी हायस्कूचे विद्यार्थी पारंपरिक वेशभूषेत सहभागी झाले होते. ग्रंथदिंडीचे पूजन पुस्तकालयाचे कार्यकारिणी सदस्य राहुल साळुंखे व सरला साळुंखे यांनी केले. ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन कुसुमाग्रज प्रबोधिनीचे माजी अध्यक्ष विजय चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. विजया पाटील यांनी प्रास्ताविक केले. साहित्यिक विजय बागुल यांनी आभार मानले. कार्यकमासाठी सार्वजनिक मराठी हायस्कूलचे शिक्षक, विद्यार्थी, महात्मा गांधी पुस्तकालयाचे अध्यक्ष, कार्यकारिणी सदस्य, तसेच कुसुमाग्रज प्रबोधिनीचे सदस्य, ग्रंथपाल सुधीर साळुंखे, ग्रंथालयसेवक मुकेश सांगळे यांनी सहकार्य केले.




### वावद येथील के. डी. गावित विद्यालयात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त कार्यक्रम

**नंदुरबार** : तालुक्यातील वावद येथील के. डी. गावित माध्यमिक विद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी मराठीतून कविता, पोवाड्यांचे गायन केले.

महेंद्र पाटील यांनी सांगितले की, वि. वा. शिरवाडकर हे मराठी भाषेतील अग्रगण्य कवी, लेखक, नाटककार होते. त्यांनी कुसुमाग्रज या टोपणनावाने कवितालेखन केले. त्यांचा जन्मदिवस हा मराठी भाषा दिन म्हणून साजरा केला जातो. 'अमृताशीही पैजा जिंकेल' अशी मराठी भाषा. ज्ञानेश्वरांनी रुजविलेले मराठीचे बीज येथे रुजले, वाढले, त्याचा वटवृक्ष झाला. रस आणि माधुर्याने परिपूर्ण, शब्दविलासाने नटलेली, विविध बोलींचे लेणे लेऊन आलेली, साहित्यिकांच्या लेखणीने समृद्ध केलेली मराठी भाषा ही सर्वांचीच मानबिंदू आहे. मराठी भाषा दिन साजरा करतानाच मराठी भाषेचे संवर्धन आणि जोपासनेची धुरा अभिमानाने पुढे नेऊ, असे आवाहन मुख्याध्यापक मनोहर साळुंके यांनी केले. अश्विनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रीती नाईक यांनी आभार मानले. कार्यक्रमाला गोपाल शिंत्रे, नितीन पाटील, सागर पाटील, मीनाक्षी व्यास, पावबा ठाकरे, संजय पाटील, दीपक माळी उपस्थित होते.

## मालपूरमध्ये उद्यापासून एकोत कानबाईचा जागर!

### उत्सवाची तयारी : ध्वजारोहणापासून महाप्रसादापर्यंत होणार धार्मिक विधी

**तभा वृत्तसेवा**
**मालपूर (शिंदखेडा), २७ फेब्रुवारी**

मालपूर येथे तब्बल ३८ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर एकोत कानबाई माता उत्सव रविवारपासून (१ मार्च) सुरू होणार असून, या नऊदिवसीय उत्सवामुळे मालपूरसह परिसरात कमालीची उत्सुकता आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. उत्सवाची तयारी केली जात असून, ध्वजारोहणापासून महाप्रसादापर्यंत होणार धार्मिक विधी होणार आहेत.

येथील निवृत्त शिक्षक तथा प्रगतिशील शेतकरी काशिनाथ अहिरे यांच्याकडे हा विशेष एकोत कानबाई माता उत्सव होणार आहे. खान्देशच्या लोकसंस्कृतीचा अविभाज्य भाग असलेला हा एकोत उत्सव दशरथ भगत (शनिमांडळ), सागर भगत (शेवाडे) आणि अंजनाबाई धनगर यांच्या मार्गदर्शनात होत आहे. उत्सवाची जय्यत तयारी सुरू असून, रविवारपासून (१ मार्च) उत्सवाला प्रारंभ होणार आहे.

उत्सवामुळे जुन्या परंपरेला नव्याने उजाळा मिळत असून, अहिरे परिवारासह ग्रामस्थ तयारी करीत आहेत.

उत्सवासाठी ग्रामस्थांसह काशिनाथ अहिरे, पंढरीनाथ अहिरे, तुषार अहिरे, डॉ. नितीन अहिरे, देवमन अहिरे, प्रकाश अहिरे, प्रशांत अहिरे, राजेंद्र अहिरे, नीलेश अहिरे आदींसह अहिरे परिवार सहकार्य करीत आहे.

**असा आहे नऊ दिवसांचा कार्यक्रम**

उत्सवाची सुरुवात रविवारी (१ मार्च) ध्वजारोपण, भूमिपूजन आणि धार्मिक विधींनी होणार आहे. ४ मार्चला मातेचा बाजार व रत्न आणून रासपूजन केले जाईल, तर ५ मार्चला कस्तुरी आणि कानबाई मातेचे आगमन होईल. ६ मार्चला मातेच्या प्रसादाचा माल दळणे व मातेची विधिवत स्थापना करण्यात येईल. ७ मार्चला महाप्रसाद तयार करून ८ मार्चला भोजनाची पूजा आणि महाप्रसाद वाटपाचा कार्यक्रम होणार आहे. उत्सवाची सांगता ९ मार्चला सकाळी आठला विसर्जनाने होईल, तर रात्री ९ ते १२ या वेळेत कानबाई मातेची गीते आणि लोकगीतांचा जागर केला जाणार आहे.

## भाविकांनो, शहिदी समागम कार्यक्रमास उपस्थित राहा

### धर्मगुरू बाबूसिंगजी महाराज यांची साद; नंदुरबारमध्ये बैठक

**नंदुरबार** : 'हिंद-दी-चादर' श्री गुरू तेग बहादूर यांचे ३५० वे शहिदी समागम शताब्दी वर्ष असल्याने, त्यांचा गौरवशाली इतिहास व बलिदान सर्वांना माहीत व्हावे, यासाठी राज्य शासनातर्फे २८ फेब्रुवारी व १ मार्चला नवी मुंबईतील खारघर येथील (सेक्टर २९) ओवे मैदानावर समागम कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमास जिल्ह्यातील भाविकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन विधान परिषदेचे सदस्य धर्मगुरू परमपूज्य बाबूसिंगजी महाराज केले आहे.

'हिंद-दी-चादर' श्री गुरू तेग बहादूर यांचे ३५० वे शहिदी समागम शताब्दी वर्ष कार्यक्रमाच्या अनुषंगाने गुरुवारी (२६ फेब्रुवारी) नियोजन भवन सभागृहात बैठक घेण्यात आली, त्या वेळी ते बोलत होते. बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी, निवासी उपजिल्हाधिकारी आशा संघवी, बंजारा समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्रावण चव्हाण, बंडू महाराज, सुधाकर भाऊ, आनंद महाराज, वसंत महाराज, विविध विभागाचे प्रमुख, जिल्हास्तरीय

जागरण, प्रचार व प्रसार समितीचे सदस्य उपस्थित होते.



धर्मगुरू परमपूज्य बाबूसिंगजी महाराज म्हणाले की, खारघर येथे होणाऱ्या कार्यक्रमास शीख, सिकलकर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहियाल, वाल्मिकी, उदासिन व भगत नामदेव परंपरा समाज या समाजाचे साधुसंत, मान्यवर व मागदर्शक उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रम यापूर्वी नागपूर, नांदेड येथे

यशस्वीरीत्या पार पडला असून, खारघर येथील कार्यक्रमही यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी शासन-प्रशासनाने दिलेल्या आदेशानुसार समन्वय करून भाविकांना कार्यक्रमस्थळी जाण्या-येण्याची व्यवस्था करून तो यशस्वीरीत्या पार पाडावा, असे सांगितले.

जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी सांगितले की, कार्यक्रमाबाबत जिल्ह्यातील सर्व शाळा-महाविद्यालयातं जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात येत आहेत. कार्यक्रमास जाण्यासाठी सहा वाहनांची व्यवस्था करण्यात आली असून, प्रत्येक वाहनात वैद्यकीय साहित्य,, पाण्याची व्यवस्था आदी सुविधा करण्यात येणार आहेत. कार्यक्रमास जिल्ह्यातून जास्तीत जास्त भाविक उपस्थित राहतील असे नियोजन करण्यात आले आहे.

बंजारा समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्रावण चव्हाण यांनी प्रास्ताविकात, जिल्ह्यातील ९० टक्के शाळांमध्ये तसेच प्रत्येक चित्रपटगृहात श्री गुरू तेग बहादूर साहिबजी गीत वाजविण्यात आले असून, जिल्ह्यात या कार्यक्रमाची जनजागृती चांगल्या प्रकारे होत आहे, असे सांगितले.

## ट्रकच्या धडकेत हेल्मेटमुळे दुचाकीस्वार प्राध्यापकाचा वाचला जीव

**नंदुरबार** : कोरीट (नंदुरबार) येथील कनिष्ठ महाविद्यालयात प्रा. भरत चव्हाण हे बुधवारी (२५ फेब्रुवारी) सकाळी दहाच्या सुमारास दुचाकीने (एमएच ३९, डी ६९१६) जात असताना समशेरपूर कारखान्यालगत मागून त्यांच्या दुचाकीला उजव्या बाजून ट्रकने (एमएच १८, बीजी ९३५८) धडक दिली. त्यामुळे त्यांचे दुचाकीवरील नियंत्रण



सुटले आणि ते रस्त्यावर कोसळले. डोक्यावर हेल्मेट असल्याने ते बालंबाल वाचले. मात्र, त्यांच्या डाव्या खांद्याला गंभीर दुखापत झाली असून, त्यांना शहरातील स्मित हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात विविध कलमांन्वये ट्रकचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

## 'सिव्हिल'मध्ये सिटी स्कॅन, एमआरआय मशीनअभावी रुग्णांचे हाल

### आमदार अनुप अग्रवाल यांनी उठविला विधिमंडळ अधिवेशनात आवाज
### पुरवणी मागण्यांद्वारे शासनाने तातडीने मंजुरी देण्याची आग्रही मागणी

**धुळे** : शहरातील भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्न सर्वोपचार रुग्णालय, तसेच जुन्या जिल्हा रुग्णालयात सिटी स्कॅन, एमआरआय मशीन उपलब्ध नाही. तसेच गंभीर रुग्णांना आवश्यक डायलिसिस सेंटरचीही सुविधा नसल्याने रुग्णांचे प्रचंड हाल होत आहेत. एवढेच नव्हे; तर या तपासण्यांसह उपचारांसाठी गोरगरीब रुग्णांना खासगी रुग्णालयांत जावे लागत असल्याने मोठा आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर भाऊसाहेब हिरे वैद्यकीय महाविद्यालयासह जिल्हा रुग्णालयात सिटी स्कॅन, एमआरआय मशीनची उपलब्धता करून द्यावी, तसेच डायलिसिस सेंटरही कार्यान्वित करावे, अशी मागणी आमदार अनुप अग्रवाल यांनी गुरुवारी (२६ फेब्रुवारी) विधिमंडळाच्या अधिवेशनात केली.



राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन २३ फेब्रुवारीपासून मुंबईत सुरू आहे. गुरुवारी (२६ फेब्रुवारी) विधिमंडळाच्या कामकाजात पुरवणी मागण्यांवरील चर्चेत सहभागी होताना आमदार अनुप अग्रवाल यांनी शहराशी संबंधित विविध विषयांवर आवाज उठवत राज्य सरकारकडे त्यांना मंजुरी देण्याची आग्रही मागणी केली.

**रुग्णांना हव्यात सुविधा**

आमदार अग्रवाल म्हणाले की, धुळे शहर-जिल्ह्यातून सात राष्ट्रीय महामार्ग जातात. यामुळे अवजड वाहनांसह अन्य सर्व वाहनांची मोठी वर्दळ असते. यातून अनेक अपघातही घडतात. यातील गंभीर जखमींना शहरातील जुन्या जिल्हा रुग्णालयासह शहरातील भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल केले जाते. मात्र, तेथे सिटी स्कॅन, एमआरआय मशीनसह डायलिसिस सेंटरचीही सोय नाही. यामुळे अपघातांतील जखमींसह विविध आजारांच्या रुग्णांना विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे. यासाठी सातत्याने सिटी स्कॅन, एमआरआय मशिनसह डायलिसिस सेंटरची मागणी करत आहे. मात्र, शासनाकडून अद्याप कार्यवाही झाली नाही. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने या सर्व बाबींची गांभीर्याने दखल घेत पुरवणी मागण्यांमध्ये या विषयांना मंजुरी द्यावी, अशी मागणीही आमदार अग्रवाल यांनी केली

**जिल्हा रुग्णालयात साचते पाणी**

धुळे शहरातील जुन्या जिल्हा रुग्णालयात दरवर्षी पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचते. अनेकदा रुग्णालयातील विविध विभागांमध्ये दाखल रुग्णांच्या कक्षातही पाणी साचते. यामुळे रुग्णांसह रुग्णालय प्रशासनाला तारेवरची कसरत करावी लागते. रुग्णालया ये-जा करण्यासाठीही रस्ता राहत नाही. याबाबत गेल्या वर्षभरापासून मी सातत्याने जुन्या जिल्हा रुग्णालयात काही ठिकाणी रस्ते, पेव्हर ब्लॉक बसविण्यासह अन्य उपाययोजना करण्याची गरज आहे. या कामांबाबतचा प्रस्तावही शासनाकडे पाठविला आहे. हा प्रस्ताव प्राधान्याने मंजूर करून उपाययोजना कराव्यात, अशी मागणी आमदार अग्रवाल यांनी केली.

**गोंदूर विमानतळ धावपट्टीचा विस्तार करा**

नाशिक येथे येत्या ऑक्टोबरमध्ये कुंभमेळा होणार आहे. यामुळे देश-विदेशातून भाविक कुंभमेळ्यात सहभागी होण्यासाठी येतील. नाशिकपासून धुळे शहर अवघ्या १५० किलोमीटरवर असल्याने अनेक भाविक धुळेमार्गे नाशिककडे प्रस्थान करतील. सध्या धुळे शहरात गोंदूरलगत विमानतळ आहे. मात्र, या विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार करण्याची गरज आहे. तसेच कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर धुळे शहरालगत वाहनतळाची व्यवस्था करण्यात येणार आहे. त्याबाबतही नियोजन समितीच्या माध्यमातून जागेची पूर्तता करण्यासह वाहळतळ व्यवस्थेसाठी कार्यवाही करण्याची गरज आहे. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून हे काम होण्यासाठी पुरवणी मागण्यांमध्ये या विषयाचा समावेश करण्याची गरजही आमदार अग्रवाल यांनी व्यक्त केली.

**लॉजिस्टिक पार्क, समांतर रस्त्याची गरज**

शहरासह जिल्ह्यातून सात राष्ट्रीय महामार्ग जातात, तसेच धुळे जिल्ह्याला लागून गुजरात व मध्य प्रदेशच्या सीमा आहेत. यामुळे वाहनांची सातत्याने मोठी वर्दळ असते. या पार्श्वभूमीवर धुळे शहरालगत लॉजिस्टिक पार्क उभारण्याची मागणीही सातत्याने राज्य शासनाकडे केली आहे. या मागणीचाही राज्य शासनाने सकारात्मक विचार करून पुरवणी मागण्यांमध्ये याचा समावेश करावा. कारण लॉजिस्टिक्स पार्क उभारल्यास उद्योग, व्यापार व रोजगाराला मोठी चालना मिळू शकते. तसेच या राष्ट्रीय महामार्गांवर समांतर रस्त्याबाबतही अनेक ठिकाणी अडचणी आहेत. या प्रश्नावरही आराखडा तयार करून आवश्यक त्या ठिकाणी समांतर रस्ता तातडीने तयार करण्यासाठी शासनाने पुरवणी मागण्यांमध्ये समावेश करून कार्यवाही करावी, अशी मागणी आमदार अग्रवाल यांनी केली.


www.tarunbharat.net

तरुण भारत

# आकांक्षा

शनिवार, २८ फेब्रुवारी २०२६

## चविष्ट उंदलकाल



उंदलकाल हा एक पारंपरिक कोकणी गोडाचा पदार्थ आहे. ही रेसिपी बहुतेकदा गणेश चतुर्थीच्या शुभ मुहूर्तावर बनवली जाते. उंदलकाल दिसायला छान आणि चवीला अप्रतिम लागतात. तांदळाच्या कुरकुरीत गोळ्यांवर गुळ आणि नारळाचे मिश्रण आणि जायफळाची चवही अप्रतिम असते. ही खूप सोपी आणि सोपी रेसिपी आहे आणि उकडीचे मोदकासाठी एक चांगला पर्याय असू शकते.

**उंदलकाल बनवण्यासाठी लागणारे साहित्य**

१ कप पाणी, साजूक तूप, १ कप तांदळाचं पीठ, बारीक चिरलेला सुकामेवा, अर्धा कप खोवलेलं ओलं खोबरं, गूळ, विलायची आणि जायफळाची पूड

**कृती :** एका पॅनमध्ये पाणी तापवून त्यात गूळ आणि तूप घाला. मिश्रण उकळू लागलं की त्यात तांदळाचे पीठ घाला, गॅस कमी करा आणि पटकन मिसळा. गॅस बंद करा, झाकण ठेवून मिश्रण सुमारे १० मिनिटे वाफवण्यासाठी ठेवा. ही उकड एका ताटात काढून चांगली मळून घ्या. उकडीचे छोटे गोळे बनवा. एका पॅनमध्ये तूप गरम करून उकडचे गोळे तुपात टाका आणि सर्व बाजूंनी छान सोनेरी रंग येईपर्यंत परतून घ्या. हे गोळे एका डिशमध्ये काढा. त्याच पॅनमध्ये सुक्या मेव्याचे तुकडे आणि खोवलेला नारळ घालून थोडे परतून घ्या. आता गूळ घालून मिश्रण छान एकत्र करून घ्या. विलायची व जायफळ पूड घालून आणि चांगले मिसळा. या मिश्रणात तळलेले उंदलकल घालून गूळ-नारळाच्या मिश्रणात घोळून घ्या. चविष्ट उंदलकाल तयार आहेत.

# बालजगत : स्वप्नातून साकारलेले संस्कारधाम

कव्हर स्टोरी

**गौरी सरनाईक** / ९७३०१०७७०२






**३५ वर्षांचा तेजस्वी प्रवास**

सुमतीबाई सुकळीकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त साजरा करण्यात आलेला बाल जगत कार्यकर्ता दिन हा केवळ एक स्मरणदिन नव्हता, तर ३५ वर्षांच्या अखंड, निष्ठावान आणि संस्कारमय प्रवासाचा भावपूर्ण सोहळा ठरला. ११ फेब्रुवारी १९९१ रोजी तत्कालीन पंतप्रधान

चंद्रशेखर यांच्या हस्ते या प्रकल्पाचे  झाले आणि एका मोठ्या स्वप्नाला प्रत्यक्ष आकार मिळाला.हे स्वप्न होते नानाजी देशमुख यांचे □ देशाला सुजाण, सुसंस्कृत आणि जबाबदार नागरिक घडवायचे असतील, तर बालपणापासूनच योग्य संस्कारांची पायाभरणी करावी लागेल. त्यांच्या या ध्यासाला सुमतीबाई सुकळीकर यांची तितकीच निष्ठावान साथ लाभली. दोघांच्या दृढ संकल्पातून नागपूरच्या भूमीत बाल जगताची बीजं रोवली गेली.

लक्ष्मीनगर येथील अडीच एकरांचा उंच-सखल, ओसाड भूखंड निवडण्यात आला. आज हिरवाईने नटलेले, टेकडीवर शिवजींची मूर्ती, तिच्या पायथ्याशी कोसळणारा धबधबा, शांत तलाव, जलतरण तलाव, शांतिनिकेतनच्या धर्तीवरील मंडप, फुलझाडे  छोटेखानी रंगमंच □हे सर्व पाहताना त्या ओसाड भूमीचे रूपांतर म्हणजे जिद्दीचा आणि श्रद्धेचा चमत्कारच वाटतो.

५ जुलै १९९१ पासून बाल जगतचे प्रत्यक्ष कार्य सुरू झाले. सुरुवातीला तब्बल १२०० अर्जांमधून केवळ २५० मुलांची निवड करण्यात आली. मुलांच्या मानसिक, शारीरिक चाचण्या, पालकांशी संवाद □ या सर्व प्रक्रियेतून घडलेली पहिली बॅच  ४५-५० वर्षांची झाली आहे. विशेष म्हणजे त्या पहिल्या बॅचमधीलच पालक आज आपल्या मुलांना बाल जगतात प्रवेश देताना दिसतात □ दीदी, आमच्या मुलालाही बाल जगतचा अनुभव द्यायचा आहे, असे म्हणताना त्यांच्या डोळ्यांतला विश्वास आणि आपुलकी हेच कार्याचे खरे यश आहे.

बाल जगत हे केवळ उपक्रमांचे केंद्र नव्हते, तर एक जिवंत विचार धारा होती. सण-उत्सव, दिनविशेष, मातृदिन-पितृदिन, संस्कृतीपर कार्यक्रम, चित्रकला स्पर्धा □ प्रत्येक उपक्रमातून मुलांमध्ये आत्मविश्वास, सहकार्यभाव, सर्जनशीलता आणि कृतज्ञता रुजवली गेली. बापूराव आठवले चित्रकला स्पर्धेला लाखो विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला. कार्यक्रमांना  मान्यवरांनी उपस्थित राहून कौतुकाची थाप दिली.कार्यकर्त्यांसाठीही हा प्रवास घडवणारा ठरला. सुरुवातीला १३-१४ तरुण संयोजिकांनी  पाऊल टाकले. नानाजींनी घेतलेल्या तीन दिवसांच्या ओरिएंटेशनमधून त्यांना कार्याचा आत्मा समजला. मुलांबरोबरआपणही वाढतो, हा अनुभव प्रत्येकाने जगला. मुलांच्या कुतूहलातून, त्यांच्या हसण्यातून, त्यांच्या छोट्या यशांतून कार्यकर्त्यांचे आयुष्यही समृद्ध होत गेले.आज ३५ वर्षांनंतर मागे वळून पाहताना जाणवते. □

**फ्लॉवर व्हॅली ते महिला जलतरण बाल जगतचा अविस्मरणीय उत्सवमय प्रवास**

बाल जगतात वर्षभर विविध उपक्रमांची रेलचेल असायची;  त्यामधील फ्लॉवर व्हॅली हा कार्यक्रम विशेष ठरला. सुरुवातीला फ्लॉवर व्हॅली म्हणजे नेमकं काय? असा प्रश्न अनेकांच्या मनात होता. मात्र दोन दिवसांच्या या उपक्रमाने संपूर्ण परिसर अक्षरशः फुलांनी आणि मुलांच्या उत्साहाने बहरून गेला.

विविध ठिकाणांहून आणलेली रंगीबेरंगी फुले, आकर्षक फ्लॉवर अरेंजमेंट्स, जमिनीत लावलेली फुलझाडे, सजवलेले मंडप □ पूर्ण बाल जगत  एका सजीव फुलबागेत रूपांतरित झाले होते. एक दिवशी मुसळधार पाऊस झाला, तरी भर पावसातही नागरिकांनी उपस्थिती लावली. हा प्रतिसादच त्या उपक्रमाच्या यशाची साक्ष देणारा होता. फ्लॉवर अरेंजमेंट स्पर्धांमध्ये मुलांनी सर्जनशीलतेची कमाल दाखवली. ते दिवस जणू झपाटल्यासारखे होते □ कोणताही कार्यक्रम घेतला, की त्याला लोकांचा उत्स्फूर्त आणि मनापासून प्रतिसाद लाभत

बाल जगत वर्षभर सुरू असले, तरी अनेक मुलांच्या दुपारच्या शाळांमुळे त्यांना पूर्ण लाभ घेता येत नव्हता. त्यातूनच ग्रीष्मकालीन शिबिरांची संकल्पना पुढे आली. बालरंजन, शिशुरंजन, ज्ञानरंजन अशी एक महिन्यांची शिबिरे सुरू झाली. खेळ, गोष्टी, गाणी, सणांची माहिती, संस्कार, आणि भावला-भावलीचे लग्न यांसारखे उपक्रम मुलांना त्यांच्या बालपणाशी पुन्हा जोडणारे ठरले. जवळपास  ते ४५ प्रकारची शिबिरे घेतली जात होती □ हस्ताक्षर शिबिर, संस्कृत पाठांतर शिबिर यांनाही उत्तम प्रतिसाद मिळाला.

मात्र सर्वाधिक प्रतिसाद मिळाला तो जलतरण शिबिराला. १९९२ पासून स्विमिंग सुरू झाले. पाच ते चौदा वर्षांच्या मुलांसाठी हे विशेष आकर्षण होते. त्या काळात नागपूरमध्ये जलतरण तलावांची संख्या अत्यल्प होती. बाल जगतच्या तलावातील  स्वच्छता, प्रशिक्षित कोच आणि सुरक्षित वातावरण यामुळे एप्रिल, मे, जून हे तीन महिने संपूर्ण परिसर मुलांनी, पालकांनी आणि प्रशिक्षकांनी गजबजून जात असे. या पुढील महत्त्वाचे पाऊल म्हणजे महिला जलतरण. १९९५ पासून महिला जलतरणाला प्रारंभ झाला. मातृशक्ती सर्वदृष्ट्या सक्षम आणि सुदृढ झाली पाहिजे, या विचारातून या उपक्रमाला गती  मिळाली. महिला जलतरणासाठी वयाची अट नव्हती □ हीच त्याची खासियत.

यामध्ये दोन धाडसी सहभागी विशेष उल्लेखनीय ठरल्या □ दांडेकर आजी आणि डॉ. लता जोशी. वय वर्षे ६५-६६ असूनही त्यांनी स्विमिंग शिकण्याचा निर्धार केला. सुरुवातीला थोडी भीती, थोडा संकोच; पण चिकाटी, जिद्द आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर त्यांनी उत्तम प्रगती केली. सहभागी होऊन दोघींनीही प्रथम क्रमांक पटकावला □ तो क्षण आजही डोळ्यांसमोर उभा राहतो. दांडेकर आजींची कोकणी कच्छ नेसून तलावात उतरलेली ती प्रतिमा आजही प्रेरणादायी आहे.

बाल जगतचा हा प्रवास केवळ उपक्रमांचा इतिहास नाही; तो जिद्दीचा, सर्जनशीलतेचा आणि समाजाच्या पाठिंब्याचा जिवंत दस्तऐवज आहे. आणि महत्त्वाचे म्हणजे हा इतिहास अजून  नाही. कारण आजही तीच ऊर्जा, तोच उत्साह आणि तेच संस्कार पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी आपण तितक्याच निष्ठेने प्रयत्नशील आहोत.अशा प्रकारे कार्याचा विस्तार होत असताना एक विचार सतत मनात रुंजी घालत होता□अगदी लहानग्यांसाठी काही वेगळं, काही खास करता येईल का? आणि त्या विचारातून जन्म झाला ❇❇'स्वच्छंद'❇❇चा. दीड ते साडेतीन वर्षांच्या  सुरू झालेला हा उपक्रम म्हणजे जणू आनंद, खेळ आणि संस्कारांचा संगमच!

सुरुवातीला छोट्याशा स्वरूपात सुरू झालेल्या 'स्वच्छंद'ला पालकांचा इतका उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला की सकाळचे सत्र अपुरे पडले आणि दुपारचे सत्रही सुरू करावे लागले. लहानग्यांच्या निरागस हास्याने, गोंडस पावलांच्या टपटपाटाने आणि किलबिलाटाने परिसर भारून जाऊ लागला. सहली, वार्षिक दिन, विविध  उपक्रम□प्रत्येक कार्यक्रमात आनंदाची उधळण होत राहिली.

अशा प्रकारे 'बालजगत'चा वयोगट दीड वर्षांपासून १४ वर्षांपर्यंत विस्तारला आणि नानाजींचे स्वप्न जणू आकार घेऊ लागले. वाढत्या प्रतिसादामुळे काही दिवसांतच दुसरा जलतरण तलाव सुरू करावा लागला. आज बालजगतचे दोन्ही जलतरण तलाव शिस्त, सुरक्षितता आणि गुणवत्तेचे प्रतीक म्हणून दिमाखात सुरू आहेत.

काळ पुढे सरकत  २०१९-२० मध्ये कोरोना संकटाने सर्वांनाच थांबवले; 'बालजगत'लाही काही काळ विश्रांती घ्यावी लागली. दरम्यान तंत्रज्ञानयुग अधिक वेगाने पुढे गेले. मोबाईल, इंटरनेट आणि बदलती जीवनशैली यामुळे मुलांच्या जगात नवे आव्हान उभी राहिली. पण एक गोष्ट मात्र बदलली नाही□संस्कारांची गरज! आज आपले पंतप्रधान मोदी युवाशक्ती आणि मातृशक्तीसाठी ज्या ध्येयाने कार्य करीत  ते पाहून प्रेरणा मिळते. आधुनिकतेच्या शर्यतीत धावताना संस्कारांची सावली सोबत असणे किती आवश्यक आहे, हे प्रकर्षाने जाणवते. संस्कार म्हणजे केवळ शिकवण नव्हे, तर आयुष्यभर साथ देणारा मित्र, संकटात मार्ग दाखवणारी दीपशिखा! कार्यकर्ता दिनाच्या भाषणात केंद्रीय मंत्री नितिन गडकरी यांनी अत्यंत मार्मिक शब्दांत सांगितले होते,

पूर्व संसद हो सकता है,  खासदार हो सकता है, मगर कार्यकर्ता कभी पूर्व नहीं होता; वह हमेशा कार्यकर्ता ही रहता है. ही भावना 'बालजगत'च्या प्रत्येक कार्यकर्त्याच्या श्वासात आहे.म्हणूनच आज पुन्हा एकदा आवाहन करावेसे वाटते□'बालजगत'ला आपलेसे करा. आपल्या मुलांचे लहानपण येथे आनंद, संस्कार आणि सर्जनशीलतेच्या छायेत फुलू द्या. चला, एकत्र येऊन उद्याच्या भारतासाठी सुसंस्कृत, आणि सजग नागरिक घडवूया!हा केवळ एक प्रकल्प नव्हता; हे एक कुटुंब होते, एक संस्कारधाम होते,  जपलेले स्वप्न होते. नानाजींच्या ध्येयाची आणि सुमतीबाईंच्या समर्पणाची ही जिवंत साक्ष आहे.बाल जगतचा हा प्रवास पुढेही असाच तेजस्वी राहो, संस्कारांचा हा दीप अखंड प्रज्वलित राहो □ हीच कृतज्ञ भावनेतून व्यक्त होणारी प्रार्थना.

# दोडका, दुधी, कारली आणि अमेरिका

**सायली मोकाटे-जोग** / +१(८१८) ६२०-७११९



तसा तो दोडकाच! खास आवडावा असं काय होतं त्याच्यात? खरखरीत फताडी पाने त्याची, ८-१० भावंडे तर पिवळी पडून गेलेली!  या बिया पार विमानातून अवतरल्या म्हणून नवलायचे की, ऑस्टिन-सीडर पार्कच्या येऊ घातलेल्या वसंत ऋतूच्या आधी कधीतरी पुन्हा पडणाऱ्या गारठ्याच्या फसव्या हवामानातून तग धरत पालवू पाहणाऱ्या म्हणून त्याचे कौतुक करायचे? त्रिकोणी-पंचकोनी, मधून पुढे येणारे टोक, असली जेमतेम ३ पाने घेऊन हा एकटा दुकटा दोडका माझ्याकडे टुकूटुकू बघायचा. त्याला तशी सांगायची रोज, 'लावीन हं, तुला छान बाहेर बागेत' नाहीतर जरा पाणी घालायला उशीर झाला की गडी मलूल. अखेर लागला मुहूर्त पण, नेमका सूर्य महाशयांनी तो आठवडा अशी हजेरी लावली की, मानच टाकली याने ३-४ दिवसात! वाऱ्याने तर पार रया जायची काय ती बाकी ठेवली होती. निसर्गाला दोडका वाटला की काय हा? कुरवाळलं त्याला मीच,'उन्हानं कोकरू सुकलं गं माझं', म्हणत, थोडा जीवात जीव आल्यासारखा भासला तो! तर असा हा दोडका!

तिकडे तू-का-मी करत एकमेकांना धक्काबुक्की करायची काय ती बाकी, अशा एका कुंडीत अर्धी वाटी टाकलेल्या बियांतून मिरचीची रोपे तरारलेली, त्यांना अलगद बाहेर घेतलं. दोन-दोन, तीन-तीनच्या गटात त्यांची फौज शिस्तीने वाफ्यात उभी केली. यात सगळी तयारीची कामं माझा तगडा माळी करतो, म्हणजे बागकामातलं फारसं कळत नाही पण, कामाला वाघ आहे. मध्यंतरी पुढच्या हिरवळीतले तण साफ करताना कोणी गाडी थांबवून विचारून गेला,'छान वीड काढतोस, किती पैसे घेतोस?' तर हा म्हणाला,'आत मालकीणबाईंना विचारा' इतका कामसू आणि आज्ञाधारक माणूस अमेरिकेत कामाला मिळाला कुठून, कसा? हे आता तुम्हीही काय लागतात विचारायला? अहो, तो माळी म्हणजे दुसरं तिसरं कोणी नसून आमचे 'अहो'च! तर अशी आमच्या अहोंची भक्कम मदत असते म्हणून आमचा फुल-भाजी मळा (फुल्ल) फुलत असतो. (बागकामोत्सुक महिलांनी ही टीप घ्यायला हरकत नाही.) तर सांगत काय होते की, मिरचीची रोपं नवीन वाफ्यात लावून झाली.

केसांच्या बटात बोटं घालावीत आणि सहज चाळा करत गोल गोल गुंडाळावीत अशा कारल्याच्या बाळवेली बाजूच्या कुंड्यांतील जास्वंद, गार्डेनिया, जुई, मोगरा आदी झुडपागतांमध्ये गुंतू बघत होत्या, त्यांना अलगद सोडवलं. मिरच्यांच्या बाजूला लावलं त्यांना! या वेलीबाळींना थोडे लाडकोड लागतात हो, आधाराच्या मुंडावळ्यांसोबत गोड दिसतात या पिटुकल्या! एकदा जोम धरला ना की, हिरवा मांडव उभा करतात या परसदारी! हलक्या वाऱ्याच्या झुळुकीबरोबर डुलणारी, हिरव्यागार शालूवर यथावकाश फुलणारी पिवळ्या नाजूक फुलांची वेलबुट्टी...पाहात राहावी जणू!

दुधीची बातच न्यारी! चुरगाळून गुंडाळा करावीत तर चेंडूएवढी होतील अशी भरघोस पाने, एक विशिष्ट उग्र वास! त्याच्या बिया दोन प्रकारच्या, एक बुटकम्मा जेमतेम पाव इंच तर दुसऱ्या इंच दिड इंच लांबीच्या! या लांबड्यांचे अक्षरशः हातभार लांब दुधी लटकले. किडीचा उपद्रव फार, सारखे लक्ष ठेवायला लागायचे. स्वतःच्या कडू वासाने किडीला फटकून लावण्यात कारलीबाई वाकबगार, त्यामानाने दुधीचे लाड फार पण, खुशीत आला की बहर विचारायचा नाही. यांच्यात 'दोडक्याचं काय?' ही काळजी होती. मग वाटलं, राहू दे याला इकडे मागे भिंतीशी सावलीला, आधी जोम धरू दे मग लावू याला स्वतंत्र, म्हणत खोचला मिरची मागच्या जेमतेम जागेत!

प्रत्येकाची कथा निराळी पण दिवसामाजी कलेकलेने वाढणारी! एके दिवशी नाष्टा करतो तिथे जेवायच्या बाजूच्या खिडकीत सकाळच्या कोवळ्या किरणांसोबत कोणीतरी डोकावून बघत होतं. नीट पाहिलं तर आपला दोडकुल्या! अगं बाई, योगायोगाने पडलेल्या मागच्या दोन पावसात तरारून नवसंजीवनीच घेऊन आला की, म्हणता म्हणता ३-४ फूट वर! किती काय सांगू अन् काय बोलू असं झालेलं त्याला त्या दिवशी! त्याचा उत्साह पाहून मग आम्ही मांडव घातला त्याच्यासाठी! 'बहरेन मी याच प्रेमासाठी' अस्सा फोफावला मग बाजूच्या ५-६ कारलींच्या तोडीसतोड हा लाडका दोडका!

दंगाच केला या एकूण सडपातळ वर्गीय भाज्यांनी! चार-पाच महिन्यात ३०० अधिक कारली, ८० पेक्षा जास्त दोडकी, २५ एक लांब पोसलेले दुधी असा भरगच्च भाजीमाल पिकला. अमेरिकेत आपल्याकडच्या भाज्या फारशा मिळत नाहीत म्हणून तक्रारीला वाव राहिला नाही.

हृदयात शिरण्याचा मार्ग पोटातून जातो तसंच घरी पिकवलेल्या भाज्यांचा विषय अंतिमतः पाककलेतून फळफळतो. दोडक्याची भाजी आणि काढलेल्या सालांची कोरडी चटणी, किती ती करायची? मग लागला शोध, दोडक्याची खीर! पूर्ण साले काढलेली दोडकी, थोड्या काजूपाकळ्या, कपभर दुधात घालून कुकरमधून मऊ वाफवून घ्यायचं. शिजल्यावर एकजीव वाटून त्यात वेलची, केशर, सुकामेवा घालायचा की, बासुंदीच्या तोडीची चविष्ट सुंदर खीर तयार आणि त्या दोडक्याच्या काढलेल्या सालांबरोबर तासभर भिजवलेले तांदूळ, उडीद डाळ, जिरं अन् मिरची वाटून घेतली की त्याचे झटपट कुरकुरीत डोसे! आहे की नाही फक्कड बेत!

चिंचगूळ घालून वा परतून अशा कारल्याच्या भाज्या, त्यासोबत घातला घाट मग कारलं-मिरची लोणच्याचा आणि सुक्या खोबऱ्यासोबत किसलेल्या कारल्याच्या परतून केलेल्या खमंग चटणीचा! सकाळी कधी दुधीचा पुदिना घालून ताजा रस तर कधी केवळ कडू जहर कारल्याचा, असा चाललेला देशी भाज्यायुक्त आरोग्यवर्धक कार्यक्रम, विचारांच्या गाडीवरून अमेरिकन जेवणाशी येऊन ठेपला. एरवी ब्रोकोली, बीन्स, कॅरट, बेल पेपर, कॉर्न, पीज, झुकिनी, अॅस्परॅगस्, मशरूम्स्, बांबू, स्पिनॅच, केल, बोकचॉय इत्यादी भाज्यांत रेंगाळणारा अमेरिकन भाजी बाजार आपण 'अपनावलेला' आहेच. त्यासोबत, दोडकी, दुधी, कारली (आणि आणखीही आपल्याकडच्या भाज्या) असा व्यापित करायचा झाला आणि फायबरची मक्तेदारी ही त्या निःसत्व ओट्स नि तत्सम चवहीन काही धान्यांभोवती गुंतून पडलेली न राहता या भाज्यांच्या रूपाने सत्वरूप पुरवली गेली तर?

बागेत इतक्या भाज्या पिकून आणि त्यातल्या अनेक माझ्या अमेरिकन शेजारणीच्या बाजूला कुंपणावरून लटकूनही यातले तिच्या स्वयंपाकात काय उपयोगी पडेल, हा तिला आणि मलाही प्रश्नच पडला होता. तेव्हा मग विचार आला, थंडीतही निष्ठेने बर्फाळ पाणी पिणारे अमेरिकन लोक बाहेर बर्फ पडत असतानाही आईसक्रीम सहज म्हणून खातात. त्यात एखादे फायबर रिच 'रिज गोर्ड आईस्क्रीम' वा 'पुडींग' कसे वाटेल? किंवा रिज गोर्ड पील सॅव्होरी क्रिस्पी पॅनकेक म्हणून आपला दोडक्याच्या सालींचा डोसा? कोलेस्टेरॉल कमी करण्यापासून ते अनेक फायदे देणारा सकाळचा फ्रेश बॉट्ल गोर्ड ज्युस विथ मिंट अॅण्ड लेमन अथवा बॉट्ल गोर्ड सूप आणि तसाच एखादा बिटर गोर्ड स्क्रेप (कारली) ब्रेड किंवा पिझ्झा? लठ्ठपणाने त्रस्त अमेरिकन जनतेला या सडपातळ भाज्या रोजच्या खाण्यात वापरल्याने उपयुक्त ठरल्या तर?

टेक्ससमध्ये सुदैवाने बर्फ आणि एकूण हिवाळा तसा कमी त्यामुळे बागकामाला, प्रयोग करायला अधिक वाव असतो. मध्यंतरी अशाच तुरीच्या बिया पेरल्या आणि त्याचे झाड चक्क १०-१२ फूट वाढले. अगदी पिटुकल्या शेंगा लागल्या तेव्हा क्वचित पडणारा डिसेंबर सुरुवातीचा बर्फ पडला आणि झाडं गारठून गेली. नाहीतर एडमामेसारख्याच कोवळ्या तुरीच्या हिरव्या शेंगा मिठाबरोबर उकडून सोलून खायला मस्त लागतात. मात्र, इथे बागेचा प्रत्येक प्रयोग तसा वेळखाऊ असतो कारण तो वार्षिक ठरतो. पण, डोक्याला, कल्पनाविस्ताराला (आणि पिकून आल्यास पोटालाही) खाद्य पुरवतो. आपल्याकडच्या औषधी, गुणकारी अगदी उदाहरणच घ्यायचे झाले तर हळदीचेही पेटंट भारताबाहेरच्या लोकांनी घेण्याचे प्रयत्न झाल्याचे आपल्याला माहिती आहे. त्या चढाओढी पलिकडे, ज्या भारतीय भाज्या, वनस्पतींचे गुण माणसास कल्याणकारी आहेत हे बघून ते अमेरिकन जीवन पद्धतीतही खास पर्यायाने उतरवण्याचा प्रयत्न करता आला तर? याच वैचारिक धर्तीवर मांडलेली 'दोडका, दुधी, कारली आणि अमेरिका'ची सहज सुचलेली ही अफलातून कल्पना! आता यावर पेटंट वगैरे घेऊन काम करावे का? गंमतीचा भाग सोडता, येणाऱ्या गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर कडुलिंबाची पाने, रस घातलेला एखादा टेस्टी फ्रुट पंच कसा वाटतो? सध्या माझ्या ग्रीन हाऊसमधली कडुलिंबाची रोपे लहान आहेत, ती व्यवस्थित मोठी झाली की तो ही विचार करू या, काय?

## आहार-विहार

डॉ. सीमा पांडे/ ९९२२९१९७२०

# संपूर्ण आरोग्यासाठी 'माईंडफुलनेस'

आज सकाळी तुम्ही काय खाल्लंय? आठवतंय का? हे जर तुम्हाला आठवावं लागत असेल तर ही समस्या आहे. आपण जे अन्न खात आहोत त्याकडे आपलं लक्ष असणं आवश्यक आहे. संपूर्ण आरोग्याच्या बाबतीत माईंडफुलनेस अत्यंत महत्वाचा आहे. माध्यमांवरही माईंडफुलनेसवर आज सर्वत्र चर्चा दिसून येते. माईंडफुलनेस अंगिकारण्यासाठी किंवा तो वाढविण्यासाठी काय केले पाहिजे, याचे उपायही सांगितले जातात. आरोग्याच्या सामान्य आणि गंभीर तक्रारी कोणतेही औषध न घेता, माईंडफुलनेस चांगला ठेवून आपण कशा प्रकारे नियंत्रणात आणू शकतो, हे ही सांगितले जाते. पण काही वेळा त्यामध्ये संदिग्धता असल्याने किंवा कधी विश्वासार्हतेचा अभाव असल्याने सामान्य लोकांपर्यंत या गोष्टी पोहोचत नाहीत.

**माईंडफुलनेस म्हणजे काय**

माईंडफुलनेस म्हणजे सजगता! वर्तमानाचे भान असणे आणि आपला वर्तमान आहे तसा स्विकारणे! आपल्या आजूबाजूला काय घडतंय याकडे आपलं पूर्ण लक्ष असणे, आपण काय करत आहोत, काय बोलत आहोत, किती आणि कसे जेवत आहोत याबद्दल सजग असणे. उदा. आपण अनेक वर्ष ज्या रस्त्याने ये-जा करत आहोत तो रस्ता आपल्या इतका सवयीचा होतो की कधी असे होते की, आपल्याला एखाद्या दिवशी दुसऱ्या ठिकाणी जायचे असते पण, आपण सवयीने रोजच्या रस्त्याने आपली गाडी नेतो. थोडे अंतर गेल्याबरोबर आपल्या लक्षात येते की, आज आपल्याला दुसरीकडे जायचे होते आणि आपण सवयीने रोजच्या दिशेने निघालो आहोत. याचा अर्थच असा की, आपण विचारांच्या तंद्रीत हरवतो. म्हणजेच आपण वर्तमानात न राहता आपलं मन अचानक भूतकाळात किंवा एखाद्या गोष्टीचा ताण असेल तर काय होईल? असा विचार करून भविष्यात जातो. आपल्या बाबतील कधी असं झालंय का की, रोज आपण तीन पोळ्या खात असू पण, एखाद्या दिवशी आपल्याला तेवढी भूक नाही. तरीही आपण रोजच्या सवयीने किंवा विचारांच्या तंद्रीत अधिक खातो आणि खाल्यावर आपल्याला जाणवतं की आपल्याला हे नको होतं तरी आपण खाल्लं. माईंडफुलनेस म्हणजे आपण जे काही करत आहोत त्याबद्दल सजग राहून योग्य ती कृती करणं आणि आपल्या छोट्या गोष्टींकडेही आपलं पूर्ण लक्ष असणं.

**माईंडफुलनेस म्हणजे काय नाही?**

माईंडफुलनेस म्हणजे काय हे लक्षात घेतल्यावर तो कशाला म्हणत नाहीत, हे सुद्धा आपल्याला स्पष्ट असणे आवश्यक आहे. एक सामान्य गैरसमज असा आहे की, माइंडफुलनेस म्हणजे एखादी विशिष्ट अवस्था मिळवण्याचा प्रयत्न करणे जिथे आपण पूर्णपणे शांत असतो, आपल्या मनात कोणतेही विचार नसतात आणि जिथे आपल्याला आनंदी किंवा समाधानी वाटते. माईंडफुलनेस म्हणजे शांत होण्याचा प्रयत्न करणे नाही. माईंडफुलनेस म्हणजे काही निर्माण करणे किंवा काही दूर लोटण्याचा प्रयत्न करणे नाही. तर जे घडत आहे ते जसे आहे तसे स्वीकारणे आणि एखाद्या गोष्टीची जाणीव ठेवणे आणि ती मनापासून स्विकारणे. एक असाही गैरसमज दिसतो की, माईंडफुलनेस म्हणजे निष्क्रिय आणि भावनाशून्य होणे. पण, तसे अजिबात नाही. माईंडफुलनेस म्हणजे परिस्थितीचं भान ठेवून व्यक्त होणे. बहुतांश लोकांच्या मनात सतत भूतकाळ किंवा भविष्याबद्दलचे विचार असतात. त्यामुळे प्रत्यक्षात काय घडत आहे याची जाणीव ठेवण्याची त्यांची मानसिक तयारी नसते. ती मानसिक क्षमता आपल्याला विकसित करावी लागते. आपल्या स्वतःच्या नैसर्गिक माईंडफुलनेसशी जोडलं जाणं आपल्याला शिकावं लागतं. या पद्धतीने मेंदू काम करावा यासाठी सरावाची गरज असते. माईंडफुलनेस ही आपली जन्मजात क्षमता आहे. जरी आपल्या मनाची सवय विचारांमध्ये हरवण्याची असली तरी सजग राहण्याची नैसर्गिक क्षमता आपल्यापैकी
प्रत्येकात आहे.



ती ओळखण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. माईंडफुलनेसबद्दल अनेकदा तणाव कमी करण्याच्या दृष्टीने बोलले जाते. पण, तो इतक्यावरच मर्यादित नाही. माईंडफुलनेस आपल्या जीवनाचे कल्याण कसे वाढवू शकतो, हे समजून घेणं खूप महत्त्वाचं आहे.

माईंडफुलनेस हा आपल्या नेहमीच्या मनःस्थितीपेक्षा वेगळा आहे कारण, आपण अनेकदा आपल्या विचारांमध्ये हरवलेले असतो. सतत भविष्याची चिंता किंवा भूतकाळाबद्दल पश्चात्ताप करतो. आपण आयुष्याचा मोठा भाग आपण काय अनुभवत आहोत याची जाणीव न ठेवता घालवतो आणि त्यामुळे पाहण्यासारखी दृश्ये, ऐकण्यासारखे आवाज आणि अनुभवण्यासारखा आनंद आपण गमावतो. उदा. जेवण करताना आपलं लक्ष खाण्याकडे नसून, आपण विचारांमध्ये हरवलेले असतो. जेवणाकडे लक्ष न दिल्यामुळे ताटातील अन्नपदार्थांचा आपण आस्वाद घेऊ शकत नाहीत. आपण टीव्ही पाहत किंवा इतर कामे करताना खात असाल तर अशा सवयीमुळे, किती खाल्ले जाते यावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करत असतानाही अपेक्षेपेक्षा जास्त कॅलरी घेतल्या जाऊ शकतात. दुपारचे जेवण किती लक्षपूर्वक घेतले जाते, याचा दिवसभरात नंतर होणाऱ्या खाण्यावर किंवा स्नॅकिंगवरही परिणाम होऊ शकतो. संशोधनांनी सिद्ध केलं आहे की, जेवणाची आठवण जितकी ठळक असते, तितका पोट भरल्याचा अनुभव अधिक काळ टिकतो. कामाच्या ठिकाणी दुपारचे जेवण करताना सोशल मीडियावर स्क्रोल करणे यासारख्या सवयींमुळे आपण नकळत काय आणि किती खातो यावर परिणाम होतो.

ताणतणावाचा आपण काय आणि किती खातो यावर परिणाम होतो. काही लोक ताणतणावात कमी तर काही लोक जास्त खातात. हे पूर्णपणे व्यक्तीवर अवलंबून असते. ताणतणावामुळे आपल्या अन्ननिवडींवरही परिणाम होऊ शकतो. जे लोक अधिक काळ ताणतणावात असतात त्यांना अधिक उर्जा देणारे, अतिशय चविष्ट अन्न खाण्याची तीव्र इच्छा निर्माण होते कारण, अशा अन्नाचा वापर स्वतःला शांत करण्यासाठी केला जातो.

सजग खाण्यामध्ये आपल्याला भूक लागली आहे याची जाणीव, पोट भरल्याची भावना तृप्ती, अन्नपदार्थांची चव लक्षात येणे, एखादा अन्नपदार्थ खाण्याची आपल्याला तीव्र इच्छा होत आहे का? हे लक्षात येणं, आपण भावनेच्या भरात अधिक किंवा कमी खात आहोत का याची जाणीव होणं, आपण जसे आहोत तसा स्वतःचा स्वीकार करणं याकडे लक्ष देण्याचा सराव केला जातो. संशोधनानुसार सजग खाण्यामुळे अंतर्गत चरबी आणि ताणतणावाशी संबंधित कॉर्टिसोल हा हार्मोन कमी होण्यास मदत होऊ शकते. यामुळे नंतर होणारे अतिखाणे किंवा वारंवार स्नॅकिंगही कमी होऊ शकते. आपण अन्न खाताना अन्नाचा पोत, सुगंध आणि चव याकडे लक्ष दिल्यास खाण्याचा वेग कमी होतो आणि खाणे अधिक सजग होऊ शकते.

**अन्नपदार्थांच्या बाबतची द्विध्रुवी विचारसरणी**

आहाराकडे फक्त चांगले किंवा वाईट अशा टोकाच्या दृष्टीने पाहणे म्हणजेच द्विध्रुवी विचारसरणी अशी मानसिकता असल्यामुळे अनेकदा आपले खाण्यावरचे नियंत्रण सुटण्यास कारणीभूत ठरते. यामध्ये व्यक्तीला असे वाटते की, तिने एखादा नियम मोडला आहे किंवा आहारातून भरकटली आहे. त्यामुळे ती व्यक्ती अधिक प्रमाणात खाणं सुरू करते. उदाहरणार्थ, एखाद्या व्यक्तिने दिवसभरात एक बिस्किट खाल्लं तर त्याला असं वाटू शकतं की आता आजचा आहार बिघडला आहे. आणि, मग उरलेल्या दिवसभरात तो त्याच्या मतानुसार वाईट असलेले अन्न खात राहतो. अन्न स्वतःहून चांगले किंवा वाईट नसते. आरोग्य आणि कल्याणावर सर्वात मोठा परिणाम एकूण आहार पद्धतीचा होतो. अन्नाशी संबंधित आपण बक्षीस-प्रेरित आणि व्यसनसदृश वर्तनांकडेही लक्ष ठेवणे महत्वाचे आहे. आपल्या शरीरात एक शक्तिशाली बक्षीस प्रणाली नैसर्गिकरित्या असते. मेंदूतील वेगवेगळे भाग अन्नाची इच्छा निर्माण करतात जसे डोपामिनमुळे अन्नाची ओढ वाढते तर ओपिऑइड्स आणि कॅनॅबिनॉइड्समुळे त्या क्षणी अन्नाचा आनंद मिळतो. अन्नाशी संबंधित व्यसनसदृश वर्तन दर्शवणारी लक्षणे ओळखणंही तितकंच महत्त्वाचं आहे. यामध्ये तीव्र प्रमाणात होणारे बिंज ईटिंग (अतिखाणे) आणि विशिष्ट अन्न खाण्याची तीव्र ओढ, अतिशय चविष्ट अन्नाला जास्त प्रतिसाद देणे अशी लक्षणे दिसतात का? याबाबत सजग असावे. आपण वर्तमानात सजग असतो तेव्हा आपण दैनंदिन आयुष्यातील लहानसहान गोष्टीत दयाळूपणाने वागतो. आनंदाचे छोटे क्षण जोपासून जीवनाच्या गूढतेबद्दल आपले कुतूहल आणि आश्चर्य भावना पुन्हा जागृत करू शकतो.

## रानभाज्यांच्या जगात

संगीता ठलाल/७८२१८१६४८५



# गुणकारी हिवर

मानवी जीवनासाठी व त्यांचे आरोग्य सुदृढ राहण्यासाठी, दीर्घायुष्य जगण्यासाठी अशा कितीतरी वनस्पती, फळंफुलांची, रानभाज्यांची, रानशेंगांची, कंदमुळांची या निसर्गाने पृथ्वीतलावर निर्मिती केली आहे. कोणी त्याचा उपयोग करतात तर काही जण त्यांच्याकडे ढुंकून बघतही नाहीत. जुनी माणसं अशाच वनस्पतींचा उपयोग करीत म्हणूनच ते निरोगी दीर्घायुष्य जगत. एक अतिशय बहुगुणी रानवनस्पती जिला झाडीबोलीत 'हिवरा' असं म्हणतात तर प्रमाण मराठीत 'हिवर' म्हणतात. हिच्या मुळांचा वास घरभर पसरतो. हिवर ही लहान मुलांच्या पोटाच्या विकारावर रामबाण उपाय आहे. खाण्यातून किंवा पाण्यातून झालेल्या जंतुसंसर्गामुळे होणारे त्रास नियंत्रित करते.

> **लहान मुलांना होणारे 'किरीम' म्हणजे जंताचा त्रास संपविण्यासाठी हिवर वापरतात. हिवरच्या कोवळ्या झाडाच्या मुळ्या, पूर्ण वाढ झालेल्या झाडापेक्षा फायदेशीर आणि जास्त लाभदायक ठरतात. हिवराच्या झाडाची मुळं खणून आणतात. त्या मुळावरची साल काढून आतला भाग वेगळा करतात. त्याला झाडीबोलीत 'वाक' म्हणतात. या वाकाला कुटून, त्याचा रस लहान चमचाने अर्धा चमचा एक किंवा दोन वेळा पाजल्यास जंताचा त्रास जातो.**

लहान मुलांना होणारे 'किरीम' म्हणजे जंताचा त्रास संपविण्यासाठी हिवर वापरतात. हिवरच्या कोवळ्या झाडाच्या मुळ्या, पूर्ण वाढ झालेल्या झाडापेक्षा फायदेशीर आणि जास्त लाभदायक ठरतात. हिवराच्या झाडाची मुळं खणून आणतात. त्या मुळावरची साल काढून आतला भाग वेगळा करतात. त्याला झाडीबोलीत 'वाक' म्हणतात. या वाकाला कुटून, त्याचा रस लहान चमचाने अर्धा चमचा एक किंवा दोन वेळा पाजल्यास जंताचा त्रास जातो.

मुळावरून काढलेली साल लहान मुलाच्या कंबरेला बांधतात. सोबतच वाक कुटून काढलेला रस बाळाच्या हातापायाच्या सांध्यांवर लावतात. अतिशय कडू असलेली ही वनस्पती एवढी गुणकारी आहे की तिच्या वासामुळेच पोटातील जंत संपत असावेत. हिवराचे झाड जंगलात आणि काही मोजक्याच ठिकाणी मिळते.

मात्र आजच्या पिढीला हिवरचे झाड कसे असते तेच ओळखता येत नाही. त्या झाडाची पानं आवळ्याच्या पानांसारखी बारीक असतात. निसर्गाच्या सान्निध्यात कोणत्याही कीटकनाशकांची फवारणी न करता, खतपाण्याशिवाय वाढणाऱ्या या दुर्मिळ वनस्पतीचा आता विसर पडत आहे.

# वीरांगना ताराराणी श्रीवास्तव

शुभांगी गान/ ८६५७४२४०७१

भारत छोडो आंदोलनाने भारतात जोर पकडला आणि महात्मा गांधींच्या नेतृत्वात प्रत्येक गाव या आंदोलनात सहभागी झाले. मोर्चे, सभा, असहकार, मिरवणुकी काढून प्रत्येक प्रांत आपापल्या परिने आंदोलनाला बळ देत होता. स्वातंत्र्याचा सूर्य बघण्यासाठी सर्व आतुर होते. त्यासाठी प्रत्येक जण सिद्ध झाला होता, प्राणाची आहुती द्यायला तत्पर होता. ताराराणी ही अशी एक विरांगना की, जिने पतीला घायाळ अवस्थेत सोडून केवळ आपला तिरंगा पोलिस ठाण्यावर फडकवण्यासाठी स्वतःचे प्राणही धोक्यात टाकले. कोण होती ही वीरांगना?

इतिहासाच्या पानांवरून काही नाव पुसली गेली पण, त्यांनी त्या काळात दाखवलेलं शौर्य, धाडस असामान्यच होतं. वीरांगना ताराराणी श्रीवास्तव! बिहारच्या राजधानी पाटण्याजवळ असलेल्या सारण या गावी एका साधारण कुटुंबात तिचा जन्म झाला. लहानपणापासून स्वातंत्र्यलढ्याचे वारे तिने अनुभवले. बापूंचे भाषण, त्यांचा सत्याग्रह, दांडीयात्रा, आंदोलन या सर्वांनीच ती प्रेरित होती. आपल्यालाही या स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेता यावा यासाठी तिचं मन कासावीस झालं होतं. पण, तो काळ असा होता की स्त्रियावर अनेक बंधन होती. मात्र, ती देशासाठी प्राणही अर्पण करायला तत्पर होती. वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी तिचा विवाह फुलेंदू बाबू या अग्रणी स्वातंत्र्यसैनिकाशी झाला. फूलेंदू बाबू गांधीजींच्या विचारांनी भारावलेले होते. १९४२ च्या लढ्यात अग्रणी होते आणि समाजाविरुद्ध जाऊन त्यांनी आपल्या पत्नीला मानाचं स्थान दिलं. तिला स्वतःच्या बरोबरीने स्वातंत्र्यसंग्रामात उडी घ्यायला सहमती दिली. इतके दिवस मनात असणारी तिची ही इच्छा पूर्ण झाली. तिचे उद्दिष्ट एकच होते. ते म्हणजे आसपासच्या



गावात जाऊन स्त्रियांना ब्रिटिश राजवटीविरुद्ध आवाज उठवण्यासाठी प्रेरित करणे. तिच्या या प्रयत्नांना यश आलं. या विचारांनी प्रेरित होऊन, अनेक महिलांनी या आंदोलनात सहभाग घेतला आणि ती त्यांची प्रेरणास्थान बनली. सभा, मोर्चे, आंदोलनांनी प्रत्येक गाव पेटलं होतं. फुलेंदूबाबूंनी सेवना पोलीस चौकीवर तिरंगा फडकवण्यासाठी एकत्र येण्याचं आवाहन सगळ्यांना केलं. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून जवळपास ४,००० स्त्री पुरुष या मोर्चात सामील झाले होते. राष्ट्रप्रेमाने भारलेला हा मोर्चा पुढे निघाला होता. ती दोघं मोर्चाच्या समोर हातात तिरंगा घेऊन चालत होती. इंग्रजांविरुद्ध घोषणा देत होती. प्रचंड मोठा मोर्चा सेवना पोलीस स्टेशन जवळ आला. ब्रिटीशांनी मोर्चावर लाठीहल्ला केला. तरीही मोर्चा पुढे जात होता. आता त्यांनी गोळीबार सुरु केला.

या गोळीबारात फुलेंदू बाबू जखमी झाले. ती भयंकर घाबरली पण, त्या परिस्थितीतही फुलेंदू बाबूंनी तिला आपलं कर्तव्य पूर्ण करण्याचा आदेश दिला. दुःखी मनस्थितीत तिने त्यांच्या हाताला आपल्या पदराची पट्टी बांधली आणि वेगानेच ती पोलीस चौकीकडे निघाली. सर्व अडथळे पार करीत तिने सेवना पोलीस चौकीवर तिरंगा फडकवला आणि परत फिरली. तिने आपलं कर्तव्य बजावलं होतं पण अवघा दोन वर्षांचा संसार सोडून फुलेंदूबाबू शहीद झाले होते. दुःख करायलाही वेळ नव्हता. पण, फुलेंदू बाबूंचं एकच वाक्य मनात होतं,'कोणताही कठीण प्रसंग आला तरी आसवं गाळत बसायचं नाही. या जीविताची शाश्वती नाही.' ब्रिटिश तिला शोधत होते आणि ती भूमिगत होती. स्वातंत्र्य लढ्यातील अनेक आंदोलनांमध्ये तिने सहभाग घेतला.

छापरा येथे फुलेंदू बाबू यांच्या श्रद्धांजली सभेत तिने एक संकल्प केला. 'हे क्रांतिकारकाचं जीवन आहे. कोणती गोळी कधी येईल आणि मृत्यू येईल हे सांगता येत नाही. या मायभूमीसाठी मी माझ्या रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत आणि माझ्या अंतिम श्वासापर्यंत लढेन.' त्याप्रमाणे खरोखरच ती लढली आणि स्वातंत्र्याचा सुर्योदय बघून ती समाधानी झाली.

## अभिजात अमृत

प्रा. सुनंदा पाटील/८४२२०८९६६६

> साधारणतः १९५०/५५ च्या आसपास, पुढे साठीपर्यंत जन्मलेल्या लोकांना 'जिंकू किंवा मरू' हे गीत चांगलं आठवत असेल. १९६२ मध्ये चीन सोबतच्या युद्धाच्या आसपास हे गीत अधिकच लोकप्रिय झालं होतं. माझा अगदी दुसरा-तिसरा वर्ग असेल, त्या काळात हे गीत वह्यांच्या मागे लिहिलेलं असायचं. 'उपकार' या हिंदी चित्रपटातील 'मेरे देश की धरती' हे गाणं १९६६ च्या आसपास वह्यांच्या मागे लिहिलेलं असायचं. त्यामुळे ही गाणी रोज वाचण्यात यायची आणि ती मुखपाठ झाली . मंडळी, हे मराठी गीत आपण बघू या.



# देशभक्ती गीत

नमस्कार मंडळी! या सदराच्या माध्यमातून आपण बऱ्याच काव्यप्रकारांची ओळख करून घेतली आणि मराठीच्या समृद्धीची, श्रीमंतीची पुरेपूर कल्पना येते. 'अनंत हस्ते कमलावराने देता किती घेशील दो कराने' एवढी श्रीमंती आपल्या मराठीची आहे. मराठी काव्याचा आणखी एक विशेष प्रकार म्हणजे देशभक्त गीत! हे सर्वांना ठाऊक आहेच. शिवाय, शालेय जीवनात या देशभक्ती गीतांची ओळख सर्वांनाच झाली आहे.

जरा आठवा ते दिवस ! आपण लहान असताना कितीतरी देशभक्ती गीतं म्हणत असू. आजही स्वातंत्र्य दिन आणि गणतंत्र दिनाच्या दिवशी, शिवाय इतर राष्ट्रीय सणांच्या दिवशीही गीतं मोठ्या आवाजात लावली जातात. देशभक्ती गीत म्हणजे 'देशाप्रती प्रेम, निष्ठा, अभिमान आणि समर्पण व्यक्त करणारी, नागरिकांच्या मनात राष्ट्रीय एकतेची भावना जागृत करणारी काव्यरचना होय. हे गीत मातृभूमीचा गौरव, बलिदान, इतिहास आणि संस्कृतीचे वर्णन करते, त्यामुळे लोकांमध्ये प्रेरणा आणि राष्ट्रीय अभिमानाची भावना निर्माण होते.

या देशभक्तीपर काव्याची काही वैशिष्ट्ये आहेत. प्रेरणा आणि राष्ट्र प्रेम- ही गीतं स्वातंत्र्याचा लढा, सैनिक आणि देशाच्या महानतेवर आधारित असतात. ज्यातून नागरिकांमध्ये त्याग आणि समर्पणाची भावना रुजते. एकता व संस्कृती - यात विविध धर्म, जाती, नद्या, पर्वत आणि संस्कृतींचा उल्लेख करून देशाच्या एकात्मतेचे दर्शन घडवले जाते. ऐतिहासिक संदर्भ - ऐतिहासिक वीरांच्या कथा आणि स्वातंत्र्य चळवळीतील स्मृती या काव्यातून जागवल्या जातात. हा सगळा वारसा नव्या पिढीकडे हस्तांतरीत करण्यासाठी या गीतरचना महत्त्वाच्या ठरतात. आपल्याला ठाऊक असलेली देशभक्तीपर गाणी म्हणजे बलसागर भारत होवो, हे राष्ट्र देवतांचे, जय जय महाराष्ट्र माझा, जिंकू किंवा मरू, मंगल देशा पवित्र देशा, उठा राष्ट्रवीर हो, शूर आम्ही सरदार, सागरा प्राण तळमळला, जयोस्तुते श्री महन्मंगले, अनामवीरा, झेंडा आमुचा प्रिय, वेडात मराठे वीर दौडले सात, वंद्य वंदे मातरम ही गाणी आजही आपल्या स्मृतीकोषात जपून ठेवलेली आहेत .

वीररसपूर्ण देशभक्तीपर गाण्यांमध्ये देशाबद्दलचे प्रेम आणि आदर वाढवण्याचा मूळ गुण आहे. भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचा संघर्ष प्रदीर्घ आणि कठोर होता. स्वातंत्र्य मिळाल्यामुळे, आपण ज्या देशात राहतो, त्या देशाबद्दल कृतज्ञता बाळगण्यास प्रेरित करणाऱ्या देशभक्तीपर गाण्यांची यादी खूप मोठी आहे.

साधारणतः १९५०/५५ च्या आसपास, पुढे साठीपर्यंत जन्मलेल्या लोकांना 'जिंकू किंवा मरू' हे गीत चांगलं आठवत असेल. १९६२ मध्ये चीन सोबतच्या युद्धाच्या आसपास हे गीत अधिकच लोकप्रिय झालं होतं. माझा अगदी दुसरा-तिसरा वर्ग असेल, त्या काळात हे गीत वह्यांच्या मागे लिहिलेलं असायचं. 'उपकार' या हिंदी चित्रपटातील 'मेरे देश की धरती' हे गाणं १९६६ च्या आसपास वह्यांच्या मागे लिहिलेलं असायचं. त्यामुळे ही गाणी रोज वाचण्यात यायची आणि ती मुखपाठ झाली . मंडळी, हे मराठी गीत आपण बघू या.

**माणुसकीच्या शत्रुसंगे युद्ध आमचे सुरू**
**जिंकू किंवा मरू...**
**लढतील सैनिक लढू नागरिक**
**लढतील महिला लढतील बालक**
**शर्थ लढ्याची करू , जिंकू किंवा मरू**
**देश आमुचा शिवरायाचा**
**झाशीवाल्या रणराणीचा**
**शिर तळहाती धरू, जिंकू किंवा मरू**
**शस्त्राघाता शस्त्रच उत्तर**
**भूई न देऊ एक तसूभर**
**मरू पुन्हा अवतरू, जिंकू किंवा मरू**
**हानी होवो किती भयंकर**
**पिढ्यापिढ्या हे चालो संगर**
**अंती विजयी ठरू, जिंकू किंवा मरू**

**अगदी हावभाव करून हे गीत राष्ट्रीय सणांसाठी गायलं जायचं, हे अनेकांना आठवत असेल. दुसरं एक गीत बघू या !**

**वेदमंत्राहून आम्हा वंद्य वंदे मातरम्**
**माऊलीच्या मुक्ततेचा यज्ञ झाला भारती**
**त्यात लाखो वीर देती जीविताच्या आहुती**
**आहुतींनी सिद्ध केला मंत्र वंदे मातरम्**
**याच मंत्राने मृतांचे राष्ट्र सारे जागले**
**शस्त्रधारी निष्ठुरांशी शांतिवादी झुंजले**
**शस्त्रहिना एक लाभो मंत्रवंदे मातरम्**
**निर्मिला हा मंत्र ज्यांनी आचरीला झुंजुनी**
**ते हुतात्मे देव झाले स्वर्गलोकी जाऊनी**
**गा तयांच्या आरतीचे गीत वंदे मातरम्**

वंदे मातरम् या गीताला १५० वर्षे पूर्ण झाली आहेत. त्या निमित्ताने या **गीताची आठवण न झाली तरच नवल!**

**उत्तुंग आमुची उत्तर सीमा इंच इंच लढाऊ**
**अभिमान धरू बलिदान करू ध्वज उंच उंच चढवू**
**परक्यांचा येता हल्ला प्रत्येक घर बने किल्ला**
**हे कोटी कोटी होती भुजदंड**
**होतील इथे ध्वजदंड**
**छातीची करूनी ढाल, लाल त्या संगिनीस भिडवू**

किंवा

**झंडा आमुचा प्रिय देशाचा फडकत वरी महान**
**करितो आम्ही प्रणाम याला करितो आम्ही प्रणाम**

जितकी गाणी/कविता आपण आठवू तेवढं कमीच आहे. आनंदाची बाब म्हणजे 'महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाव्दारे' दरवर्षी या समरगीत/देशभक्तीपर गाण्यांच्या स्पर्धा होतात. २००६ मध्ये गीत लेखनाचीही स्पर्धा झाली होती. त्यात,

**सह्याद्रीचे गडे गर्जले हाक हिमालय घाली**
**चला उठा रणशिंग वाजले एक गर्जना झाली**

या काव्यलेखनासाठी मला राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार प्राप्त झाला होता. जरा विषयांतर झालं. राष्ट्रीय सणांना ध्वजवंदन न करता तो दिवस सुट्टीचा मानणाऱ्या लोकांना, राष्ट्रगीत ऐकल्यावर अंगावर उठणारे रोमांच कळणारच नाहीत. शिवाय, जिथे कुठे कार्यक्रम होतात, तिथे हिंदी राष्ट्र भक्ती गीतं गायली-वाजवली जातात. हिंदीला विरोध नाही पण, किमान महाराष्ट्रात ही मराठी-हिंदी संमिश्र गाणी गायली गेली तर पुढल्या पिढीला मराठी गीतांची किमान ओळख राहील. सध्या तरी एवढेच!

## संगीतिका

संगीता तांबोळी/ ९८२२७३९४९३


# मेरा वो सामान लौटा दो...

गाणं म्हटलं कविता म्हटली की सगळ्यात आधी आपल्या मनात येते त्याची चाल, वापरले गेलेले शब्द, यमक, ताल, त्यात वापरला गेलेला राग आणि इतर सगळी साधनं...तसं पाहिलं तर प्रत्येकच कवितेला चाल लागल्यानंतर तीचं गाणं होतं...पण, हिंदी आणि मराठी गाण्यांमध्ये काही गाणी अशी आहेत की यमक जुळणारे शब्द नसून सुद्धा किंवा मुक्तछंदात्मक रचना असून सुद्धा त्याची गाणी झाली आणि ती अतिशय लोकप्रिय झाली.

१९८७ मध्ये प्रदर्शित झालेला चित्रपट इजाजत..या दशकाचा काळ हा चित्रपटांमध्ये प्रेम कथांचा काळ म्हणून प्रसिद्ध होता. मिलन, विरह, वेदना ,काही काही अचानक घडणाऱ्या घटना. अशा भरपूर रंजकतेने हे चित्रपट लोकप्रिय होत होते. इजाजत हा चित्रपट देखील याच धाटणीतला. यातली सगळीच गाणी तशी लोकप्रिय झालेत पण गीतकार गुलजार यांचं आणि राहुल देव बर्मन यांनी संगीतबद्ध केलेलं,'मेरा वो सामान लौटा दो आशा भोसले यांच्या मखमली आवाजात असलेले हे गाणं खरंच मनाचा वेध घेतं.

**मेरा कुछ सामान ,तुम्हारे पास पडा है**
**सावन के कुछ भीगे भीगे दिन रखे है, और मेरे खत मे लिपटी रात पडी है, वो रात बुझा दो,**
**मेरा वो सामान लौटा दो...**

या गीतामधली शेवटची ओळ वारंवार प्रत्येक कडव्यानंतर येत राहते. प्रत्येक वेळा ती वेगवेगळे संदर्भ घेऊन येते. चित्रपटातील माया या पात्राला मिळालेले हे गाणं आणि भूमिका साकारली आहे अनुराधा पटेल या गुणी अभिनेत्रीने. खरं म्हणजे, नसरुद्दीन शाह आणि रेखा यांच्यासोबत अभिनयाची टक्कर देताना, तिच्यावर चित्रित



झालेले हे गाणं इतकं लोकप्रिय व्हावं, हा योगायोग म्हणण्यापेक्षा या गाण्याचे केलेले चित्रीकरण आणि याला दिले गेलेले संगीत आणि त्यावरचा तिचा अभिनय हे असावं. चित्रपटातल्या माया या पात्राला तिच्या स्वभावाला, तिच्या वृत्तीला अगदी साजेसे हे गीत.

माया आणि महिंद्र यांच्या मधील एक अनाकलनीय नातं, या गाण्यातून प्रेक्षकांच्या समोर येतं. प्रेमाच्या खुणा सांगणाऱ्या काही वस्तू, काही गोष्टी जेव्हा प्रेमीकेला परत मिळतात ,तेव्हा वस्तूंच्या पलीकडे देखील, काही प्रेमाने ओथंबलेले क्षण असतात,ते कसे परतवले जातील? हा प्रश्न हे गाणे आपल्यासमोर निर्माण करतो.

**पतझड है कुछ, है ना?**
**पतझड मे कुछ पत्तो के गिरने की आहट..**
**कानो मे एक बार पहन के लौट आई थी...**
**पतझड की वो शाखा अभी तक काँप रही है...**
**वो शाख गिरादो..**
**मेरा वो सामान लौटा दो...**

या कडव्यामध्ये संतूर चा अतिशय चपखलपणे वापर केलेला जाणवतो. आणि पडद्यावर दिसत राहते झाडाची निष्पर्ण फांदी, झाडापासून पान वेगळं झाल्यावर जसं सैरभैर होतं तशी कदाचित तिच्या मनाची अवस्थ यातून जाणवत असावी. दोघांनी एकत्र घालवलेले, श्रावणातल्या बरसातले काही क्षण देखील तिच्या मनावर कोरले गेले आहेत. ते कसे ते मनातून वेगळे करू शकणार?

**'एक अकेली छत्री मे जब आधे आधे भिग रहे थे..**
**आधे सुखे, आधे गीले...**
**सुखा तो मैं ले आई थी...**
**गीला मन शायद बिस्तर के पास पडा हो...**
**वो भिजवा दो...**
**मेरा वो सामान लौटा दो...'**

कितीतरी हळुवार क्षण त्यांनी असे एकत्र घालवलेले असतील. कदाचित प्रेमाच्या व्याख्येच्या पलीकडले. कारण महेंद्र आणि माया या दोघांचाही पडद्यावरचा वावर हा प्रेक्षकांच्या मनात कितीतरी हळवे प्रश्न निर्माण करतो. दोघांपैकी कोणाचीच चूक नाही. चूक आहे ती फक्त परिस्थितीची. हे जाणे प्रेक्षकांच्या मनात घर करते..

**'एक सौ सोलह, चांद की राते...**
**एक तुम्हारे कांधे का तिल...**
**गीली मेहंदी की खुशबू..**
**झुठमुठ के शिकवे कुछ,**
**झुठ्मुठ के वादे भी,**
**सब याद करा दो...**
**सब भिजवा दो, मेरा वो सामान लौटा दो..'**

एकत्रित घालवलेले आहे या साऱ्या क्षणांची आठवण तिच्या मनाला अधिक व्याकुळ करते. खरंच, या क्षणांचा परतावा शक्य नाही, हे जाणीवदेखील दोघांच्या मनामध्ये असते. प्रेमाने आपली एक वेगळीच दुनिया निर्माण केलेली असते. शरीराच्या पलीकडे, आत्म्याशी जुळलेलं हे प्रेम प्रेक्षकांना अस्वस्थ करून सोडते.

**एक इजाजत दे दो बस..**
**जब इसी को दफनाऊंगी..**
**मै भी वही सो जाऊंगी...**
**मै भी वही सो जाऊंगी...**

आणि इथे हे गाणं संपतं. ते रसिकांच्या मनात कायम आहे.

# भंगारातून जग घडविणारे शिल्पकार

कर्तृत्वाचे आकाश

निकिता गावंडे/९९७०६६३८१३






मंडळी! आजचा लेख हा जोडी स्पेशल, दोघा भावांची कहाणी! परिस्थितीच्या टक्केटोणप्यांनी छन्नी-हातोड्याविनाच त्यांना घडवले. वडिलांच्या अकाली निधनानंतर इंजीनियरिंग वर्कशॉपची जबाबदारी त्यांच्या कोवळ्या खांद्यांवर आली. ना गाठीशी अनुभव ना व्यवहारातले छक्के पंजे माहीत. मग काय! आज काय खायचं व घरी काय न्यायचं या विवंचनेतून डोळ्यांना भंगारात विविध आकार दिसू लागले. मध्यवर्ती नागपुरातील म्हाडा सिटीच्या प्रशस्त इमारतीत सुंदर, हवेशीर फ्लॅटमध्ये एक हसतं-खेळतं एकत्रित कुटुंब राहतं. प्रशांत वडाळकर आणि त्यांचे लहान भाऊ तुषार वडाळकर दोघेही भंगारातून विविध आकार शोधणारे कसलेले कलाकार आहेत.

'लहान मुलांना जसे रंगांच्या ठिपक्यात वेगवेगळे आकार दिसतात तसे आम्हाला आमच्या वर्कशॉपच्या स्क्रॅपमध्ये दिसायचे. धंद्याचे गणित काही जमत नव्हते. भरपूर रिकामा वेळ आणि फ्रस्ट्रेट झालेला मेंदू घेऊन आम्ही वर्कशॉपमध्ये निव्वळ टाईमपास करायचो,' प्रशांत सांगतात. असेच एकदा रिकाम्या पोटाने व विचारांनी तुडुंब भरलेल्या डोक्याने त्यांनी वर्कशॉपमधील स्क्रॅप विकायला काढले. त्यात काही वेगळे आकार त्यांना दिसू लागले. मग विकणे तर सोडाच ते आकार न्याहाळण्याचा छंदच त्यांना लागला. एका मागून एक वेगवेगळ्या कलाकृती तयार होऊ लागल्या. या दोन्ही भावांच्या कलेचे हे विशेष आहे की, ते कुठलाही कृत्रिम रंग वापरत नाहीत किंवा मिळालेल्या वस्तूच्या आकारात काहीही बदल करत नाहीत.' निसर्गानेच लोखंडाला इतका सुंदर रंग दिला आहे आणि जेव्हा त्याला गंज चढतो, तेव्हाच्या छटा तर अप्रतिम असतात,' तुषार म्हणतात.

कलेच्या बाबतीतही मोठ्या भावाची दादागिरी चालते का? या माझ्या प्रश्नावर हलकेसे हसून ते म्हणाले,'आम्हा दोघांच्याही कामाचं स्वरूप पूर्णपणे वेगळं आहे. आम्ही दोघेही एकमेकांच्या कामात ढवळाढवळ करत नाही.' प्रशांतचे काम काहीसे कन्सेप्चुअल आहे. त्यांच्या कलाकृती या काहीशा अपूर्ण भासतात. तर तुषार यांचे काम हे पक्षी, प्राणी यांच्या भवताल फिरणारे आहे. आपल्या आजूबाजूला निसर्गातील घटकांच्या भावना अलगद टिपणं, हे त्यांचे स्वभाव विशेष! त्यांच्या कलेतही हे पूर्णपणे प्रतिबिंबित होतात. त्यांच्या या कलाकृतींचे पहिले प्रदर्शन भोपाळमध्ये आयोजिण्यात आले. भोपाळला शिलादित्य वर्मा यांची एक आर्ट गॅलरी आहे. प्रशांतजी सांगतात,'माझा मित्र मोहन शिंगणे जो स्वतःही एक कसलेला कलाकार आहे त्याचे आमचा यशात एक महत्त्वाचे योगदान आहे. त्याने आमच्याकरिता तिथे शिफारस केली. एका चित्रकाराच्या पेंटिंग्स आणि आमचे स्क्लपचर्स यांचा ग्रुप शो आयोजित होता. आम्हाला तर या कलाकृती कशा अरेंज करायच्या? याची देखील कल्पना नव्हती. आम्ही आपलं घरच्या दिवाणखान्यात वस्तू मांडून ठेवाव्यात, तशा कलाकृती मांडून ठेवल्या. मग वर्माजींच्या आई तिथे आल्या. ते सर्व बघून त्यांनी अक्षरशः पदर खोचला आणि कामाला लागल्या. त्या अगोदर त्यांनी आम्हाला भोपाळ शहर फिरायला पाठवून दिले. परत येतो तो काय माझाच माझ्या डोळ्यावर विश्वास बसेना इतक्या सुंदर आमच्या कलाकृती ठेवलेल्या होत्या. हळूहळू तिथे लोकांची गर्दी जमली. आम्ही हाताची घडी घालून एका कोपऱ्यात उभे होतो. मग अक्षरशः आमच्यावर कौतुकाचा वर्षाव झाला.'

कला क्षेत्रातील कुठलीही पदवी या दोन्ही भावांकडे नाही पण साक्षात सरस्वतीचे वरदान त्यांना प्राप्त आहे. ते शिकताशिकताच शिकत गेले. सुरुवातीच्या दिवसातील काही वाईट अनुभवांबद्दलही ते बोलतात की, नवोदित असताना एकदा एका कार्यक्रमाचे आमंत्रण घेऊन ते एका मोठ्या आर्टिस्टकडे गेले तर त्यांनी चक्क तुम्ही स्वतःला समजता तरी काय? तुमच्याकडे कुठलीही डिग्री नाही. मग तुमचं काम कसं असेल? असे म्हणत त्यांचा अपमान केला. पण, प्रत्यक्षात त्यांच्या कलाकृती बघितल्यावर मात्र प्रांजळपणे आपली चूक कबूलही केली.

तुषार यांना लोखंडाच्या एका तुकड्यात एका जखमी पक्ष्याची कलाकृती गवसलेली होती. त्यात निसर्गाची कमाल अशी की लोखंडाला जंग लागून जो नैसर्गिक रंग तयार झालेला होता त्याने त्या कलाकृतीला एक अप्रतिम सौंदर्य बहाल केले. एकदा एका प्रदर्शनात एका कवयित्री आल्या.त्यांना त्या कलाकृतीकडे बघून रामायणातील रावणाच्या बाणाने जखमी झालेला जटायू पक्षी आठवला. त्याच्यावर अप्रतिम कविता रचून, तिथे ती सादरही केली. त्याच प्रदर्शनात एक गृहस्थ आले त्यांच्या आजूबाजूला बॉडीगार्डस् होते. त्यांनी साऱ्या कलाकृती निरखून पाहिल्या आणि आर्टिस्टविषयी चौकशी केली. तुषारला बोलवण्यात आले. त्यांनी तुषारचा हात धरला आणि म्हणाले 'आपके हाथ मे जादू है' पुढचे तास दोन तास ते त्या प्रदर्शनात फिरत राहिले पण, त्यांनी तुषारचा हात काही सोडला नाही. नंतर कळले की ते चक्क भोपाळचे कलेक्टर होते. एका कलाकाराला आणखी काय हवं असतं! तुषार भावूक होऊन म्हणतात. त्यांनी बोल्ट आणि रॉडपासून एक वासरू तयार केलं होतं. वासरू जसं उड्या मारतं नेमकं ते स्वरूप त्या कलाकृतीत उतरलं होतं.

एकदा आर्टिस्ट सेंटर मुंबई येथे त्यांचा शो होता. नेहमीप्रमाणे मित्रमंडळींकडून वर्गणी गोळा करून ते तिथे गेले. तिथे सिंगापूरचे एक जोडपे आले. त्यांना प्रशांत यांची एक कलाकृती इतकी आवडली की, ती त्यांनी चक्क पन्नास हजाराला विकत घेतली. अशाप्रकारे उपाशी असताना केलेल्या एका कलाकृतीने या भावंडांच्या जगण्याची सोय मात्र केली.

कलाकृती घडविण्याबरोबरच आपल्या कलेचा वारसा नवीन पिढीपर्यंत पोहोचविण्याचे काम हे बंधू करतात. फाईन आर्ट, आर्किटेक्चर तसेच अनेक शाळकरी विद्यार्थ्यांना भंगारातून व्हिज्युअल आर्ट घडवण्याचे प्रशिक्षण दिले. जवळपास हजार बाराशे विद्यार्थी यांनी प्रशिक्षित केले आहेत. अहमदाबाद येथे सेप्ट नावाच्या विद्यापीठात वर्षातून दोनदा ते प्रशिक्षण देण्याकरिता जात. माईंड ट्री स्कूल (अंबाला), सांगाई स्कूल, गेटवे कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, सोनीपत, मणिपाल युनिव्हर्सिटी अशा अनेक ठिकाणी तुषार यांनीही त्यांना या कामात सोबत केलेली आहे. ते मुलांना भंगाराच्या ढिगापाशी घेऊन जातात व त्यातून वेगवेगळे आकार शोधायला सांगतात. ही क्रिया तितकीशी सोपी नसते. काही मुलांना चार-पाच दिवस काहीच गवसत नाही. पण, हळूहळू त्यांची नजर तयार होते. त्यांच्या विद्यार्थ्यांनीही अनेक सुंदर कलाकृती तयार केल्यात. यांच्या कामाचे वैशिष्ट्य हे की, ते कधीही कुठलेही स्केच काढत नाहीत. अगदी कमीत कमी वस्तू वापरून ते काम करतात. ते कुठल्याही वस्तूला कधीच आकार देत नाही. त्याच्या त्याच्या नैसर्गिक आकारातच ती कलाकृती घडते. त्या भंगारातील वस्तू जणू त्यांच्याशी बोलतात. त्यांनी खुंटीला बांधलेल्या एका बैलाची कलाकृती घडवली आहे. त्याला कुठल्याही दोरीने बांधले नाही पण तो एकाच जागीच स्तब्ध उभा आहे. अगदी चाकोरीत फिरणाऱ्या माणसासारखा! त्याला एक पाय, एक शिंग नाही. जणू आयुष्याची अपूर्णताच बैलाच्या रूपात एक प्रतिक म्हणून आपल्यासमोर उभी राहते. त्यांची एक विशेष कलाकृती म्हणजे एक वाट पाहणारी स्त्री! ती भावमुद्रा त्यांनी एका मोठ्या अडकित्त्यातून साकारली आहे. गाडीच्या शॉकपमधून एक डान्सिंग कपल त्यांनी घडवले आहे. एक लोखंडी पकड, एक अँगल आणि वेल्डिंग करताना टेस्टिंगसाठी वापरलेल्या एका लोखंडी तुकड्यापासून त्यांनी एक मातृत्वाच्या उंबरठ्यावर उभी असलेली स्त्री साकारली आहे. कारच्या इंजिनचा काही भाग वापरून त्यांनी एक अतिशय खेळकर व मस्तीखोर हत्तीचे पिल्लूदेखील बनवले आहे. कुठलीही मोडतोड, काटछाट किंवा कृत्रिम रंगरंगोटी त्यांच्या कामात दिसत नाही. या कलाकारांच्या मनातील सच्चेपणा जणू त्यांच्या कलाकृतींमध्ये उतरला आहे.

आयुष्यात ठरवून काहीच होत नाही. आहे हे असे आहे, आता यातून जे काही शक्य होते ते करा, असं आयुष्य आपल्याला शिकवतं. या दोन्ही भावांचं कार्य हे जणू आयुष्याचे प्रतिबिंबच नाही का? अशा प्रकारच्या कलाकृतींच्या बरोबरीनेच केवळ नागपुरातीलच नाही तर विदर्भातील अनेक शहरांमध्ये उभ्या असलेल्या मोठमोठ्या धातूच्या प्रतिकृती या भावंडांनी घडविल्या आहेत. या कार्यात त्यांना उदंड यश आणि कीर्ती मिळो अशी ईशचरणी प्रार्थना!

# मन वढाय वढाय

विशेष

रश्मी वाघमारे / ८६००२७७८८८



गुरु माऊलीचा धीर गंभीर आवाज घुमू लागला. मानव म्हणजे मन असलेला, मनन आणि विचार करणारा प्राणी! मनुष्य आपल्या मनाचा उपयोग करू शकला तर साक्षात परमेश्वर स्वरूप होईल. संत-महंत या मनाला ओळखून त्याद्वारेच देवपदाला पोहोचलेत. मन म्हणजेच संसार बंध आणि मोक्ष मनामुळेच!

**मन कल्पित संसार जाण,**
**मनी कल्पिले जन्म मरण**
**संसार चक्री आवर्तन,**
**मनास्तव जाण पुन्हा पुन्हा**

मनुष्याचे व्यापार पाच कर्मेंद्रिय व पाच ज्ञानेन्द्रिय यांच्या योगाने होतात. त्यांचा एक प्रेरक स्वामी आहे. ही ज्ञानेंद्रिय व त्यांच्या देवता मनाच्या अधीन आहेत. एखादा पराक्रमी सिकंदर सारे जग जिंकेल पण मनाला जिंकणं अत्यंत कठीण आहे. मन, बुद्धी, चित्त व अहंकार ही कार्यपरत्वे मनालाच दिलेली चार नावे आहेत. वृत्तीच्या या चार मनोदेवता प्रसन्न झाल्या की, मोक्ष सिद्ध आहे. म्हणून तुकोबाराय सांगतात,

**मन करा रे प्रसन्न,**
**सर्व सिद्धीचं कारण।**
**मोक्ष अथवा बंधन**
**सुख समाधान इच्छा ते॥**
**म्हणून मनाला प्रसन्न**
**करून घेणं अगत्याचं आहे...**

सुमित्राचे डोळे ओथंबले. गुरु माऊलींनी किती छान आणि सोपं करून सांगितले, किती बिकट अवस्था घेऊन मी या पवित्र आश्रमात प्रवेश केला. आता माझी नजर स्वच्छ अन् माझं मन निरभ्र झालं आहे. हे ऐहिक पाश व त्याचा अनिवार गुंता सुटू पाहतो आहे. मी आता जे काही होईल त्याला योग्य रीतीने समोर जाणार आहे. गेली चार वर्षे ती कष्टप्रद वास्तविकतेने होरपळली होती. कोरोनाचा तो भयंकर काळ!

माझ्या प्रिय पतीला या भयंकर रोगाची लागण झाली आणि त्यांना अकाल मृत्यू आला. परगावहून कामानिमित्त आलेल्या माझ्या लाडक्या लेकाला श्रीनाथलाही पछाडले या महामारीने! पाच दिवसांच्या झुंजीनंतर तो अखेरीस त्याचा ही बळी गेला. त्याचा मृत्यू मला पार उध्वस्त करून गेला. माझ्या सासूबाईही हा जबरदस्त धक्का सहन न होऊन शांत झाल्या. मागे राहिले मी, माझी तरुण अकाली एकाकी झालेली सून आणि सात वर्षांचा एक नातू! माझं हृदय आक्रंदन करू लागलं. कशी जगू मी, कुणासाठी? एक एक करून माझी लाडकी माणसं मला सोडून गेली.

माझ्या मुलाने कर्नाटकी मुलीशी प्रेम विवाह केला होता. ती आपल्या आईवडिलांची एकुलती एक असल्यामुळे ते तिला ताबडतोब घरी घेऊन गेले. मी ही त्यांच्या मागे धावले. त्या दोघांना मदत करण्यासाठी उपरी होऊन बसले, त्या अनोळखी प्रदेशात! मी अगदी एकटी पडले तरीही स्वतःला कसे बसे त्या सर्वांमध्ये सामावण्याचा प्रयत्न करू लागले.सगळे निर्णय आता इतर मंडळी घेऊ लागली, विशेष करून विहीण बाई!

सर्वांचे एकमत झाले आणि आमचे राहते घर विकून टाकण्याचा निर्णय झाला. सौदा पक्का झाला पण, मन विषण्ण झालं. ही वास्तू उभारण्यासाठी केलेले कष्ट आठवले. माझी शिक्षिकेची आणि ह्यांची खाजगी नोकरी! वेगवेगळ्या घाटाची सुंदर भांडी जमविली होती. तो मोठा पितळी देव्हारा ज्यात आमच्या अनेक पिढ्यांनी पूजा केलेले देव होते. त्या आठवणींचा पसारा कसा आवरायचा? हे ओढाळ मन कसं ताळ्यावर आणायचं, हे काही केल्या कळेना.

आता हे सारं काही आवरायचं किंवा कुणाला तरी देऊन टाकायचं आहे. माझा जीव अडकलाय या साऱ्यामध्ये! तिची फार इच्छा होती की, किमान दोन खोल्या स्वतःसाठी ठेवाव्या नगरच्या घरात! कधीतरी यावं, इथल्या जुन्या आठवणीत रमावं, मैत्रिणींना भेटावं, मनसोक्त गप्पा कराव्यात, पण...! हा पण किती कठीण होता, हे जाणवायला लागलं होतं हल्ली! 'आता या वयात एकटीने बंगलोर ते नगर एवढा मोठा प्रवास होणार आहे का?' अशा विहिण बाईंनी केलेल्या प्रश्नावर ती गप्प बसली. त्यांचंही म्हणणं बरोबरच होतं. पण हे मन? याला कसे समजावयाचे? इथल्या वास्तूमध्ये माझे मन गुंतले आहे, मनाचा पसारा कसा आवरू?

सासू सासरे, दीर नणंद असं भरलेलं कुटुंब! मोठी सून म्हणून सर्व कर्तव्य पार पाडू लागली. स्वतःची दोन मुले, आला गेला, पै पाहुणा, सणवार, एक ना दोन! अखंड आहुती सुरू होती गृह यज्ञामध्ये! मुलांची शिक्षणं, लग्नसोहळे पार पडताना केसात चंदेरी बटा दिसू लागल्या. कुटुंब हेच जग झाले तिचे! ती वर्तमानात परतली.

सून सुवर्णलता फिजीओथेरपीस्ट! ती सकाळी कामावर निघायची. लहानगा नातू शाळेत जाणारा आणि ती घर सांभाळून स्वतःला त्या नव्या वातावरणात सामावून घ्यायचा प्रयत्न करीत असे. भरीस भर म्हणजे तिचा एक मामेभाऊ होता जो काहीच करत नसे. त्याची बायको आणि दोन मुले बरेचदा तिच्या घरी मुक्कामास असत.

सतत दूर राहिल्यामुळे सुनेला आणि नातवालाही तिचा लळा नव्हता. खरं तर घर आवरायला म्हणून ती नगरला आली होती. आता शेवटचे काही दिवस या घरावर, तिथल्या स्मृतींवर मायेचा हात फिरवून हे बंध मोकळे करायचे असा विचार होता.

कुणीतरी गुरू माऊलींच्या दर्शनास जाण्याचा सल्ला दिला आणि ती ह्या आश्रमात आली. सुरवातीला खूप कठीण गेले. मात्र रोजची प्रवचनं, उद्बोधनं आणि नियमित दिनचर्या ऊर्जा देऊन गेली. जे समोर येईल त्यास तोंड देण्यास ती तयार झाली. आहे त्या परिस्थितीचा स्वीकार करून ती आता स्वतःची चौकट जपते आहे. इतरांसाठी जगताना स्वतःला काय हवं ते निश्चित करणार आहे. मनावरचं मोठं ओझं कमी झालंय आणि प्रसन्न वाटतंय!

# रिंगा रिंगा रोझेस

भयकथा

श्रेया सरनाईक / ८६००२७७८८८




रुथने काहीही विचार न करता झटकन कोटाच्या खिशातून रेशमी रुमाल काढला आणि तिच्या जखमी हाताभोवती घट्ट बांधून दिला. तरुणीच्या ओठांवर क्षणात प्रसन्न हास्य उमटलं.

ती हलक्या आवाजात म्हणाली, तुम्ही शिकवलेले सगळे टेबल मॅनर्स मी नक्की लक्षात ठेवेन. अचानक रक्त निघालं की थोडं घाबरल्यासारखं वाटतं, खरं सांगायचं तर! पण थोड्या वेळात बरं वाटेल. असं रक्त-विक्त पाहायची सवय नाही मला. अपघातात रक्त-मांसाचा चिखल होतो म्हणे. पोलिस कसं काय पंचनामा वगैरे करतात, देव जाणे!'

किंयारा, मलाही रक्ताची खूप भीती वाटते'' रुथ हळू आवाजात म्हणाली. 'अपघाताची, पाण्याची, आगीचीः चटक्याची!''

'आणि भुताची? आत्म्याची?'' कियाराने डोळे विस्फारत विचारलं.

'छ्या! त्याची तर मला अजिबात भीती वाटत नाही.'

''मिसेस मायकेल, मला तर 'भूत-आत्मा' हा शब्द जरी उच्चारला तरी अंगावर काटा येतो. अक्षरशः घाम फुटतो.' ती बोलत असतानाच थंडीतही तिचा चेहरा घामाघूम झाला होता.

रुथ तिच्याकडे एकटक पाहत राहिली. तिच्या हालचाली अतिशय डौलदार, मोहक होत्या. मायकेल सोबत नाही, याचं तिला नकळत समाधान वाटलं. खरंच, कुणीही हिच्या प्रेमात पडेल अशीच आहे ही आकर्षक, आणि धोकादायक वाटावी इतकी मोहक.

मायकेलची आठवण अचानक मनात चमकून गेली. त्याने दिलेला रेशमी रुमाल आपण हिला दिलाय, हे लक्षात आलं. पण रक्ताने माखलेला रुमाल परत मागणं विचित्र दिसेल.असू दे. तिच्याचकडे राहू दे.'केस बांधल्यावरही छानच दिसतेस तू,' रुथ म्हणाली.

'अगं, कुठे निघालीस?''

कियारा हसत म्हणाली,'इथे दारात जाऊन उभी राहते. थोड्याच वेळात स्टेशन येईलच. थोडी गार हवा लागली की बरं वाटेल.'

ती बोलत बोलत पुढे चालू लागली. हातातली वेताची बास्केट मात्र तिने घट्ट पकडून ठेवली होती. 'छान वारा लागतोय. मिसेस रुथ, या ना तुम्हीही इथे.' रुथला आग्रह मोडवेना. रुथ तिच्यापासून थोडे अंतर राखून उभी राहिली. तिच्या हातातील त्या टोपलीत नेमकं काय असेल, याची उत्सुकता तिच्या मनात चाळवली जाऊ लागली. तेवढ्यात एक समुद्रपक्षी त्यांच्या अगदी जवळून फडफडफडत गेला. 'ए बाई कियारा, अशी वाकून नको ना बघू.' 'घाबरू नका, मिसेस रुथ. पुढचं स्टेशन किती दूर आहे ते बघतेय.' 'अगं, स्टेशन जवळ आलं की पाट्या लागतातच. खरंच नको वाकून बघू. तुझी टोपली बघ, कशी हेलकावत आहे. मला भीती वाटतेय.''

'पण मला अजिबात वाटत नाही,'' ती थंड, निर्विकार आवाजात म्हणाली. रुथच्या मनात विचार चमकून गेला'. हिचा आवाज असा अचानक वेगळाच का वाटतोय? वाऱ्यामुळे असेल कदाचित. 'तुला खरंच भीती नाही वाटत, कियारा?''नाही. कारण, मी शंभर वर्षांपूर्वी एकदा उडी मारली आहे.' रुथ तिच्याकडे पाहतच राहिली. ती काय बोलतेय, हे उमगायला तिला काही क्षण लागले.

वेताच्या टोपलीत काहीतरी हललं. वाऱ्याच्या झोताने त्यावरचा मखमली पांढरा कपडा उडून गेला. आत एक छोटे बाळ होतं. त्याच्या हातात मातीचं कसलंसं खेळणं होतं. ते बाळ न चुकता, निर्विकार नजरेने रुथकडे पाहत होतं. क्षणभर सगळं स्तब्ध झालं. काहीतरी भयंकर घडणार, याची जाणीव होताच रुथच्या तोंडून किंकाळी फुटली. त्याच क्षणी त्या तरुणीने रुथवर झडप घातली. तिच्या मजबूत, अमानवी हातांचा विळखा रुथच्या गळ्याभोवती घट्ट आवळला गेला. ते हात मानवी नव्हते. प्रचंड, निर्दयी शक्तीने भरलेले.

दोन्ही हात एकत्र करून रुथने प्रतिकार करण्याचा शेवटचा प्रयत्न केला. तिने तिच्या चेहऱ्यावर नखं रोवली. त्या झटापटीत त्या तरुणीच्या मिंक कोटची वरची तीन बटणं उघडली गेली. ती गाणं गुणगुणू लागली

''रिंगा रिंगा रोझेस...पॉकेट फुल ऑफ पोझेस...''

गाण्याच्या तालावर तिने रुथच्या हातातील ते खेळणं ओढून घेतलं. त्याच्या टोकाने तिने रुथच्या छातीवर सुरीसारखं कोरणं सुरू केलं. गरम लोखंडी सुरी छातीत रुतवली जात असल्याचा भास रुथला झाला. तिचा श्वास अडखळला. शरीर शिथिल पडू लागलं. रूथने आचकी दिली. श्वास थांबला. मायकेल...मायकेल बोल ना माझ्याशी...मायकेल गाढ झोपेत असतानाच त्याच्या कानांवर तो अस्पष्ट, कंप पावणारा आवाज आदळला. रुथ आली? एवढ्या लवकर?

मी स्वप्नात आहे का? की ती अर्ध्या रस्त्यातून परत फिरली?ओह, रुथ! शेवटी तू माझं ऐकलंस. पण माझं डोकं इतकं भयंकर का दुखतंय? रुथ, तू आलीयस. थांब. मला दरवाजा उघडायला हवा.'रुथ डार्लिंग पुन्हा मला सोडून कधीच जाऊ नकोस.' मायकेल धडपडत उठला. खोलीत गडद अंधार पसरला होता. मेणबत्त्या वाऱ्याने केव्हाच विझल्या होत्या. बाहेर जाण्याचा रस्तासुद्धा त्याला दिसत नव्हता. त्याने घाईघाईने माचिस ओढली आणि मेणबत्ती पेटवली. समोरचं दृश्य पाहून मायकेलची दातखिळ बसली. आवाज बाहेरून नव्हे, तर प्लॅन्चेट बोर्डमधून येत होता.'रुथ?' 'मायकेल मी चुकले रे. मला माफ कर.' अक्षरं थरथरत उमटत होती.'मी आता जिवंत नाही. तुझं म्हणणं खरं ठरलं. सारं खरं आहे, मायकेल. मी तुला फक्त एवढंच सांगायला आले आहे की माझं तुझ्यावर फार, फार प्रेम आहे. मी चुकले. मला क्षमा कर.'

मायकेलने तो बोर्ड छातीशी घट्ट कवटाळला आणि मोठ्याने रडू लागला. इतकं असहाय्य त्याला आयुष्यात कधीच वाटलं नव्हतं. रुथच्या आवाजालाच मिठी मारावी, असं त्याला वाटलं.

तो बोर्ड छातीशी धरून व्हरांड्यात आला. अतिश्रम आणि अचानक बसलेल्या मानसिक धक्क्यामुळे मायकेल व्हरांड्यातच कोसळला. सकाळी दहा वाजता मेड आली. गेट ओलांडून व्हरांड्यात पाऊल टाकताच तिने किंकाळी फोडली. एका बाजूला मायकेल प्लॅन्चेट बोर्ड छातीशी कवटाळून खाली पडलेला होता. तिने आरडाओरडा करत आजूबाजूच्या लोकांना बोलावलं. फॅमिली डॉक्टर आले. श्वास चालू होता, पण डोक्याला गंभीर दुखापत झाली होती.

त्या उपनगरात ही बातमी वाऱ्यासारखी पसरली. दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात हेडलाईन झळकलीङ्ग ङ्गब्लडमूर स्टेशनवर महिलेचा संशयास्पद मृत्यू!ङ्ग खाली तपशील दिले होते. प्रेत ताब्यात घेण्यासाठी पोलिसांशी संपर्क साधावा. मायकेलची प्रकृती जवळपास आठवडाभर सुधारलीच नाही. त्याच्या मित्रांनीच रुथच्या प्रेतावर अंत्यसंस्कार केले.

मायकेल अजूनही पूर्णपणे सावरला नव्हता. जे घडलं, त्याचा प्रचंड मानसिक धक्का त्याला बसला होता. रुथ जिवंत नाही, यावर विश्वास ठेवणं त्याला असह्य वाटत होतं. काही दिवस गेले. मायकेल अत्यंत अशक्त झाला होता. एके दिवशी बेल वाजली. दारात पोस्टमन उभा होता. दुःख व्यक्त करणाऱ्या अनेक तारा आणि पत्रं येत होती.

एका पत्रातील अक्षरं अत्यंत बारीक होती. भिंग समोर धरून त्याने वाचायला सुरुवात केली, डिअर मायकेल डोरोथी, माझी भाची नैन्सीकडून रुथच्या निधनाची बातमी कळली. कळल्यापासून मन स्थिर नाही. खूप वाईट वाटलं. माझ्याशिवाय तुझं सांत्वन कोण करणार? मी तुला भेटायला येतो आहे.

रुथ मला मुलीसारखीच होती. माझ्यासारख्या ऐंशी वर्षांच्या म्हाताऱ्याला सोडून काळाने तिच्यावरच का झडप घातली, ते समजत नाही. परमेश्वराची इच्छा! मी तुझ्या दुःखात सहभागी आहे. परमेश्वर रुथच्या आत्म्याला शांती देवो.

तुमचा काका
जॉन क्रांबवेल

पत्र हातातून गळून पडलं. तेवढ्यात प्लॅन्चेट रूमकडच्या व्हरांड्यातून एक कागद हवेत भिरभिरत आला. त्यावर लिहिलं होतं, रिंगा रिंगा रोझेस...एक थंड लहर मायकेलच्या अंगातून गेली.

*(कथा समाप्त)*

# आम्ही मागासलेलेच...

काही असं, काही तसं

ज्योती पुजारी / ९७६५०३१४३५



'हा कसला फोटो गं?'

मैत्रिणीच्या घरात वरच्या मजल्यावर जाणाऱ्या पायऱ्यांच्या बाजूला लावलेल्या फोटोकडे पहात मी विचारलं. त्या फोटोत फक्त काही रेषा दिसत होत्या. 'हा आमच्या बाळाचा फोटो', म्हणत मैत्रीण हसली 'हा असा ?बाळ म्हणजे तुझा नातू तर छान गुटगुटीत लोभस आहे आणि या फोटोत तर...'

मैत्रिणीने मला मध्येच थांबवलं.'अग तो बाळाच्या जन्माच्या आधीचा फोटो आहे. बाळ पोटात असताना केलेल्या सोनाग्राफीचा फोटो आहे.' सोनोग्राफीचा फोटो? हौशी आईवडिल बाळाच्या जन्मापासूनचे फोटो काढतात हे माहिती होतं पण बाळाच्या जन्माच्या आधी केलेल्या सोनोग्राफीचे फोटो असे फ्रेम करून घरातल्या भिंतीवर लावलेले मी पहिल्यांदाच पहात होते. 'बघ, लबाड कसा हसतो आहे.'

आईच्या पोटातलं बाळ आतून आईला पोटातून ढुशा देत असतं पण पोटात बाळ रडतं, हसतं? नवाच शोध मला लागला. सोनोग्राफीत बाळाची आकृती दिसत होती पण, ते हसतंय हे मला दिसलं नाही. मला मैत्रिणीची कमाल वाटली. मैत्रिणीने तिच्या मोबाईलमध्ये कसलंतरी रेकॉर्डींग सुरू केलं. काहीतरी लबडब आवाज यायला लागला. 'हा कसला आवाज? कशाच रेकॉर्डिंग आहे गं?' मी विचारलं.

'फिटल मॉनिटरचे ठोके आहेत अगं! बाळाच्या आईला तपासताना ऐकले अन् मी रेकॉर्ड केले,' इति मैत्रिण! 'ते कशाला रेकॉर्ड केले?' 'अगं मुद्दाम रेकॉर्ड केले. बाळ मोठं झालं की, त्याला ऐकवता येईल नं! हाऊ फनी...' मैत्रिण म्हणाली. 'खरंच फनी,' मलाही ते फनी आता 'फनीच' वाटायला लागलं.

'थांब, तुला बाळाच्या बारशाचा व्हिडीओच दाखवते,' ती उत्साहाने म्हणाली. आम्ही दोघी कोचावर बसलो.'व्हिडीओपक्षा फोटो बरे! फोटोंचा अल्बम असला की वेळ मिळेल तेव्हा कधी कुठेही पाहता येतो.' मी एक नंबरची अडाणी आहे हे मैत्रिणीच्या पुढच्या वाक्याने मला कळलं.

'ती आता ओल्ड फॅशन झाली. पण आम्ही बाळाचे काही फोटो काढले आहेत. ते बघ, मग मी बारशाचा व्हिडीओ लावते.' मैत्रिणीने एक जाडजूड अल्बम माझ्या हातात ठेवला. माझ्या शेजारी बसून तिची रनिंग कॉमेन्ट्री सुरू झाली. कोणता फोटो केव्हा काढला वगैरे! बाळ खरेच खुपच लोभस होते. 'हा कसला फोटो गं!''ओळख बघू,' मैत्रिण गालात हसत होती. मी फोटो निरखून पाहिला.'काही कळत नाही. आता तूच सांगून टाक कसला फोटो आहे,' मी !'तो ना आमच्या पपीच्या नाळेचा फोटो आहे.'

'कशाचा फोटो आहे? मला वाटलं मी काही चुकीचं ऐकलं की काय! पपी म्हणजे तुझ्या त्या कुत्रीचा, तिला केव्हा पिल्लं झाली? तू त्यांच्या नाळेचे फोटो...' मैत्रिण मध्येच कडकडली. 'ए मॅड! पपी म्हणजे कुत्री नाही. पपी म्हणजे आमचा नातू पुष्पेन्द्र! त्याला आम्ही लाडाने पपी म्हणतो. त्याच्या नाळेचा हा फोटो नाळ, जमिनीत पुरण्याआधी मी काढला. अगं पहिल्या लेकराचं सगळंच कौतुकाचं असतं.'

'हो का! बरं झालं बाई, तू बाळाच्या पहिल्या शी चा फोटो काढला नाहीस, मी उपरोधानं म्हणाले.'काढणार होते गं! पण, बाळाला पहिली शी झाली तेव्हा मी घरी आले होते नं,' ती अगदी गंभीरपणे हळहळत होती. मला हसावं की रडावं कळेना.

'हा फोटो खरंतर लॉकेटमध्ये ठेवायला हवा अन् ते लॉकेट बाळ मोठा झाल्यावर त्याच्या गळ्यात घालायचं,' मी उपरोधानं म्हणाले. 'किती छान! मस्तच कल्पना आहे तुझी,' तिला माझा उपरोध कळलाच नाही. मी मनातल्या मनात कपाळावर हात मारला. 'हो, तु मला फोटो पाठवले होतेस. छानच झालं असणार बारसं!' 'तू तुझ्या लेकाकडे अमेरिकेला जाउन बसलीस. माझ्या सुनेचं बेबी शॉवर, बाळंतपण, बारसं सगळं मिस केलंस तू, मैत्रीण जरा रूसक्या आवाजात म्हणाली .

'हो ना गं! पण, त्याचा हट्टच होता. त्यानं तिकीटच पाठवली ना!खूप दिवसात आमच्या नातवांनाही पाहिलं नव्हतं.' 'असू दे गं! मी तुला फोटा दाखवतेय ना! हा बघ माझ्या सुनेच्या बेबी शॉवरचा फोटो,' मैत्रीण म्हणाली. 'बेबी शॉवर म्हणजे डोहाळजेवण नं,' मी!

'हो गं बाई! तुला बेबी शॉवर माहित नाही. एवढी अमेरिकेत राहून आलीस आणि तुला एवढही माहिती नाही,' मैत्रिणीने मला मुर्खात काढलं. बेबी शॉवर म्हणजे डोहाळजेवण हे मला माहित आहे. पण, इतका छान अर्थपूर्ण शब्द असताना आपण उगाच दुसऱ्याची उसनवारी का करायची,' मी माझा स्पष्ट मत मांडलं. तिने ते कानांवरही घेतलं नाही. तोपर्यंत माझ्यासमोर व्हिडीओ लागला होता.

व्हिडीओत तिची गर्भभारानं जडावलेली सुन फुलांनी सजवलेल्या पाळण्यावर बसली होती. तिच्या बाजूला 'मी बाळाचा बाबा' असा फलक घेऊन मैत्रिणीचा मुलगा उभा होता. मैत्रिणीच्या हातात एक फलक होता. त्यावर 'मी बाळाची आजी' असं लिहिलं होतं. तिच्या पतीराजांच्या हातात 'मी बाळाचे आजोबा' असा फलक होता .

'हे फलक कशासाठी बाळाचा बाप, आजी, आजोबा कोण आहे, हे तिथे जमलेल्या तमाम जनतेला माहित आहे. मग मुद्दाम सांगण्याची गरज काय?' मी आपली शंका प्रामाकिणपणे विचारली.

'तू अगदी मागसलेली आहेस. तुला दोन नातू होऊनही काहीच माहित नाही.' मैत्रीण जरा नाराज झाली पण मी खरंच मागासलेली आहे. गरोदर बायकोच्या उभारलेल्या पोटावर हात फिरवत, लवकरच मी बाबा होणार अशा रील्स पाहताना मला नवल वाटतं. चारचैघात गरोदर बायकोच्या पोटावर हात फिरवणं, तिच्या पोटाला कान लावून बाळाची हालचाल ऐकणं याला पुढारलेपण म्हणायचं का! दोन नातू होऊनही मला हे कळलंच नाही. मला माझे 'भरलेले दिवस' आठवले अन् सुनेचेही! जाणवलं की, आम्ही खरंच मागासलेले आहोत.

तरुण भारत

# छोटे उस्ताद



## तुम्हाला माहिती आहे का?

जगातील कोणतेही ज्ञान मराठी माणसांपासून दूर राहू नये यासाठी विश्वकोश तयार करण्यात आला आहे. आतापर्यंत विश्वकोशाचे २३ खंड प्रकाशित झाले आहेत. वर्तमानात तंत्रज्ञानाची जोड मिळाल्यामुळे मराठी विश्वकोश व्यापक व अद्ययावत होत आहे. विश्वकोशातील नोंदीत अतिशय व्यापक व कमीतकमी शब्दात माहिती मांडली जाते. मराठी विश्वकोशाचा पहिला खंड १९७६ साली तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखाली प्रसिद्ध झाला होता. याशिवाय विश्वकोशातील भौतिकविज्ञान व तंत्रज्ञान या कोशाचेही काम सुरू आहे. ९वी ते १२वीचे विद्यार्थी डोळ्यासमोर ठेवून कुमार विश्वकोशाचा पहिला खंड पूर्ण झाला आहे.

## गुलदस्ता

# बहारदार पारिजात

**निशिकांत मायी / ९८८११५२४३९**

रात्रीच्या वेळेस फुलणारे, बहरणारे अन्? सकाळच्या सुमारास अक्षरश: फुलांचा सडा पडल्यागत जमिनीवर विखुरणारे मोहक असे पारिजात अर्थात प्राजक्ताचे फूल! हिंदीत ते हरसिंगार नावानेही प्रचलित आहे. काही ठिकाणी या फुलाला शेफालिका असेही म्हणतात. अत्यंत मनमोहक असा सुगंध आसमंतात पसरवणारे, भारतात उगवणारे हे एक औषधी झाड आहे. नाजूक नारंगी देठ आणि पांढ्या पाकळ्यांचे नैसर्गिकरीत्या उगवणारे प्राजक्ताचे वृक्ष उपवनात तसेच घरच्या बागेतही हौसेने लावले जाते. पाच ते सात मीटर उंच असलेल्या फांद्या चौकोनी आणि पानं खरखरीत असतात. यांचे वैशिष्ट्य असे की या पानावर टोकाकडून देठाकडे बोट फिरविले असता त्यावर काटे असल्याचा आपल्याला भास होतो. हाडांच्या दुखण्यावर या पारिजातकाच्या पानांचा वापर केला जात असल्याचा उल्लेख आढळतो. विविध दुखण्यांवर हे प्रभावशाली आहे. या पारिजातकाच्या फुलझाडाबाबत एक आख्यायिका



प्रचलित आहे. पारिजात हे रत्न असून समुद्र मंथनातून त्याची निर्मिती झाली आहे. इंद्र देवाने ते स्वर्गलोकात जाऊन लावले.? नंतर, भगवान श्रीकृष्णाने पारिजातकाचे हे झाड स्वर्गातून पृथ्वीवर आणले. झाड कुठे लावावे यावरून सत्यभामा आणि रुक्मिणी यांच्यात वाद झाला. मग श्रीकृष्णाने क्लृप्ती लढवून ते सत्यभामेच्या अंगणी अशा ठिकाणी लावले की, फुले उमलल्यावर रुक्मिणीच्या अंगणात फुलांचा वर्षाव होईल. त्यामुळेच याला स्वर्गीय फुलाचा मान प्राप्त झाला आहे. म्हणूनच स्वर्ग लोकांत अप्सरा, उर्वशी आपले नर्तन झाल्यावर थकवा या झाडाला स्पर्श करून घालवीत. पारिजातकाच्या फुलांच्या पाकळीची मधली बाजू भगव्या रंगाची असते, हे येथे उल्लेखनीय! प्राजक्ताच्या फुलांना साधारण चार ते आठ पाकळ्या असतात, ज्या टोकाकडे किंचित दुभंगलेल्या असतात. फुलांच्या मधुर सुवासाने प्रत्येक जण हरखून जातो. याचा बहर जुलै ते डिसेंबरपर्यंत असतो. इतर वेळी तुरळक फुले झाडांवर बघायला मिळतात. विद्येची देवता श्री गणेशाचे हे आवडते फूल असून श्रीकृष्णालाही तितकेच आवडते. लक्ष्मी पूजनातही या फुलांना विशेष स्थान आहे. त्याची फुले आयुर्वेदातही महत्त्वपूर्ण ठरली आहेत. याच्या फुलांपासून खाण्याचा पिवळा-केशरी रंग तयार केला जातो तसेच, विविध प्रकारची अत्तरे आणि सौंदर्य प्रसाधने तयार केली जातात. पारिजातकाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे सूर्यास्तानंतर या फुलांचा बहर वाढत जाऊन रात्रीच्या सुमारास तो अधिक दाट होतो. अगदी पहाटे फुलांची गळती सुरू होऊन सूर्योदयाच्या पूर्वी जवळपास सगळी फुले गळून पडलेली दिसतात. देशभरात सर्वच ठिकाणी प्राजक्ताच्या फुलांचा देवपूजेत आवर्जून समावेश होतो. पारिजातकाची पाने कोमट करून बारीक करून ती पेस्ट सांधेदुखीवर लावल्याने खूप फायदा होतो.

## Math puzzle

**Guess the number.**

I am three digit number.

First digit is double of second digit.

Second digit is square root of third digit.

Third digit is addition of first and second digit.



Previous Word Puzzle Answer : * Teeth * Merit * East * Emaile * Heat * Tear

**—: मागील अंकातील शब्दचक्र पंचाक्षरीचे उत्तर : —**

1. जनानखाना 2. जवाबदारी 3. जलसमाधी 4. जलतरण 5. जकातनाका 6. जमिनदोस्त 7. जलतरंग 8. जनमेजय

## प्रसिद्ध म्हणींच्या शोधात गुप्तहेर !

आमचे एक साहित्यिक मित्र आपल्या पुढील लेखनसाहित्यात वापरण्यास दोन महत्वपूर्ण प्रसिद्ध म्हणी (वाक्प्रचार) सोबत घेऊन चालले होते पण त्यांना ठेच लागली आणि या दोन्ही म्हणींतील अक्षरे विखरून गेलीत. त्यांना योग्य क्रमात जोडणे फार कठीण काम होते, यासाठी त्यांनी एका गुप्तहेराला ही अक्षरे योग्य क्रमात जोडण्याचे कार्य सोपविले.

तुम्ही सुद्धा ही दोन प्रसिद्ध म्हणी शोधू शकता.




## संघ हीच जीवनगाथा

**सुरेखा काणे/९९६०० ५३५२१**

परमपूजनीय डॉ. हेडगेवारांनी जगायचे कसे आणि कशासाठी या विषयाचा प्राणमंत्र दिला. त्यांनी आधी कृती मग, विचार मांडला म्हणून त्यांना क्रांतदर्शी म्हणतात.

आज 'द काश्मीर फाइल्स', 'पावनखिंड','धुरंधर' इत्यादी चित्रपट प्रदर्शित होऊ शकले कारण आजचे पंतप्रधान संघ विचारांचे आहेत. यातील एक चित्रपट काश्मीरमधील हिंदूंचे क्रूर हत्याकांड दर्शवितो. तेव्हा १९९० साली संघ स्वयंसेवकांनी आहार, विहार आणि उपचार आदि कामात खूप मदत केली. असे का घडले? हे डॉक्टरांच्या विचारांतून कळते. ते नेहमी सांगायचे, आपण आपली ओळख, आपली संस्कृती, आपला इतिहास, आपला पुरुषार्थ, आपले सामर्थ्य विसरलो आहोत. किंबहुना, सामर्थ्य आठवले तरी ते गुंडाळून ठेवले आहे. दुबळे बनणे आपण पसंत केले आहे. आपला हिंदू समाज रोगी बनला आहे. डॉक्टरांच्या जीवनकाळात पण हिंदू रोगी होता व आजही आहे. हे दुबळेपण घालवण्याचा प्रयत्न करू या. घटनेच्या ज्या कलमामुळे फुटीरतावादी विचार बळावले होते ते ३७० कलमही रद्द झाले आहे. एक देश-एक निशान-एक प्रधान ही घोषणा प्रत्यक्षात आली आहे. आपण एक आहोत. राष्ट्र आणि समाज हे वेगळे नाहीत तर एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, हा भाव म्हणजे डॉ. हेडगेवार यांचा प्राणमंत्र होता. आक्रमक पवित्रे घेणाऱ्या परधर्मीयांच्या शक्तीपुढे सदैव भीतीग्रस्त राहणाऱ्या असंघटित हिंदूंमध्ये स्वसंरक्षणाचे सामर्थ्य निर्माण करण्याची आवश्यकता डॉक्टरांना वाटू लागली होतीच. त्यासाठीच संघात वैचारिक व शारीरिक शक्ती या दोन्ही शक्तींची उपासना होते.

आपल्या भारत मातेच्या स्वातंत्र्याच्या अमृत




महोत्सवानिमित्त आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून पाच प्रण सांगितले.

१. विकसित भारतासाठी कटिबद्ध व्हा.

२. गुलामी मनोवृत्तीच्या जोखडातून मुक्त व्हा.

३. आपल्या विरासतीवर गर्व करा. ती चिरपुरातन आणि नित्य नूतन आहे.

४. एक भारत श्रेष्ठ भारत करण्याची प्रतिज्ञा करा. त्यासाठी एकता अंगी बाणवा.

५. नागरिकांचे कर्तव्य, हक्क आणि कर्तव्य एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, हे ध्यानी धरा.

सर्व भारतीयांनी या पाच प्राणशक्तीचा उपयोग करावा, अशी त्यांनी आग्रहाची विनंती केली. हे संकल्प ऐकताना मनोमन असे वाटले की, हेच संकल्प घेऊन डॉक्टरजी स्वतः मार्गस्थ होत होते व मार्गदर्शन करत होते. विक्राळ प्रश्न व त्याची सोडवणूक यावरच डॉक्टरजी अखंड मंथन करत असत. आज पंतप्रधान मोदी डॉक्टरजींच्या रूपात बोलतात. या दोघांची हालचाल पाहिली की, समर्थ रामदासांचा अभंग आठवतो.

**भाग्यवंत नर यत्नासी तत्पर।**
**अखंड विचार चाळणेचा।**
**चाळणेचा यत्न यत्नाची चाळणा।**
**अखंड शहाणा तोचि एक।।**

## देशोदेशीच्या लोककथा

**प्रीती वडनेरकर/ ९८२३९९४७९२**




# सिंदबादची दुसरी सफर

माझ्या मित्र मैत्रिणींनो, तुम्हाला सिंदबादची पहिली सफर आठवत असेलच. इराकमधला बगदादचा सिंदबाद सेलर म्हणजे नावाडी, त्याची समुद्रातली सफर, देवमाशाच्या पाठीवरचं जंगल, सगळंच अद्भुत! पहिल्या सफरीत, दयाळू राजानं सिंदबादला भरपूर सोन्याच्या नाण्यांच्या थैल्या दिल्या होत्या. सिंदबादनं बगदादला, भली मोठी आलिशान हवेली बांधली. आपल्या बायको मुलांसह तो राजेशाही थाटात तिथे राहू लागला.

पण थोड्याच दिवसात परत त्याला समुद्रातून, वेगवेगळ्या बंदरांतून फिरून व्यापार करण्याचा मोह झाला. त्याच्या अब्बूचे मित्र कबीर, बगदाद मधली श्रीमंत आसामी होती. सिंदबाद त्यांच्याकडे गेला.'चाचाजान, कसे आहात? व्यापार कसा चालला आहे? आपण बऱ्याच वर्षांनी भेटत आहोत. माझ्या अब्बूजानला जाऊनसुद्धा खूप वर्षे झाली,' तो म्हणाला.'हो रे... खरंच आपल्याला भेटून खूप वर्षे झाली. तू आता परत समुद्रातून, बंदरांवर व्यापारासाठी निघणार आहेस का? मी तुला व्यापारासाठी, माझा माल दिला असता, पण मी माझा सर्व माल वेगळ्याच कोणाला दिला आहे. तो बगदादचा नाही आहे. बरं, ते जाऊ दे! मी जरा घाईत आहे. लौकरच पुन्हा भेटू.'कबीर चाचा घाईघाईनं निघून गेले.

सिंदबादला त्यांच्या बोलण्याचं, घाईघाईनं जाण्याचं खूप आश्चर्य वाटलं. काहीतरी गूढ असल्याचा संशय आला. मात्र इतर व्यापाऱ्यांकडून, त्यांचा माल घेऊन सिंदबाद परत समुद्रफिरतीवर निघाला. यावेळेचं जहाज मोठं होतं. ऐसपैस होतं. सिंदबाद मुळातच बोलघेवडा असल्याने, जहाजावरच्या प्रत्येकाशी त्याची मैत्री झाली. बरेच दिवस प्रवास केल्यावर त्यांना एक बेट दिसलं. खलाशानं, त्या बेटाच्या किनाऱ्यावर जहाजाचा नांगर टाकला. सारे त्या बेटावर उतरले.

'अहाहा, काय सुंदर, निसर्गरम्य, नयनरम्य बेट आहे हे! सारं सृष्टीसौंदर्य, डोळ्यांत साठवून घ्यावंसं वाटतंय. थोडावेळ या झाडाखाली आडवं व्हावं. अंग खूप मोडून गेलंय,' विचारांच्या तंद्रीत सिंदबाद एका भल्या मोठ्या वृक्षाच्या सावलीत पाय पसरून गाढ झोपला. जाग आली तेव्हा, त्याच्या लक्षात आलं, त्याच्या आसपास कोणीच दिसत नाही. धावतच तो किनाऱ्यावर पोहचला. त्याचं जहाज, त्याचा मित्र परिवार निघून गेला होता.

'असे कसे गेले सगळे मला सोडून? मी झोपलो होतो म्हणून काय झालं? मला उठवलं का नाही कोणी? हे कसले मित्र? मला संकटात टाकून खुशाल निघून गेले? सिंदबाद निराश झाला. काय करावं, त्याला कळेना. नारळाच्या झाडावर चढून तो एका उंच फांदीवर बसला. समोर अथांग पसरलेल्या समुद्रात एखादं जहाज दिसतंय का, ते त्याला बघायचं होतं. बराच वेळ तो तसाच झाडाच्या फांदीवर चढून बसला. इतका वेळ वाट पाहूनही एकही जहाज त्याच्या दृष्टीला पडलं नाही. शेवटी त्यानं खाली उतरायचं ठरवलं. उतरता उतरता, त्याला संगमरवरी दगडासारखं काहीतरी दिसलं.

'अरेच्चा, इथे संगमरवरी भला मोठा दगड कसा?' खाली उतरल्यावर सिंदबाद धावतच त्या दगडाजवळ गेला. त्यानं त्या दगडावरून हात फिरवला. त्याला तो खूपच गुळगुळीत लागला. अचानक तो उभा होता तिथे अंधारून आलं.

'यावेळी अंधार? आत्ता तर चांगली टळटळीत दुपार आहे. रात्र तर नाहीये... ही तर प्रचंड मोठ्या पक्षाची सावली आहे. ही सावली, हळूहळू खाली येत आहे. म्हणजे, म्हणजे...हा मोठा दगड म्हणजे या पक्ष्याचं अंड आहे तर! अरे... हा पक्षी परत उडायचा प्रयत्न करतोय. आपण आपल्याला याच्या पंजाला बांधून घेऊ. आता हाच आपल्याला इथून, दुसरीकडे घेऊन जाईल.'

सिंदबादनं झाडाच्या पारंब्यांनी, स्वतःला पक्ष्याच्या पंजाला बांधून घेतलं, पक्षी उंच आकाशात उडाला, सिंदबादही त्या पक्ष्याबरोबर, उंच उडाला.

> सिंदबादनं आपल्या खिशातून आणलेले हिरे, माणकं आपल्या ओंजळीत धरली.'बापरे, इतकी मौल्यवान रत्नं, मी पहिल्यांदाच पहात आहे,' चाचाजान म्हणाले. 'तुम्ही माझा जीव वाचवलात, म्हणून तुम्हाला हवी तेवढी रत्नं वेचून घ्या,' सिंदबाद म्हणाला.'सिंदबाद, तू खूप चांगला मुलगा आहेस. मी तुझा जीव वाचवला, यात तुझ्यावर फार उपकार नाही केले. माणुसकीच्या नात्यातून, ते माझं कर्तव्य होतं. तुझ्याकडेच ठेव, तुझा अनमोल ठेवा. मी त्यातलं फक्त एक काढून घेतो,' चाचाजानने त्यातलं एक रत्न काढून घेतलं.

'अरे पक्ष्या थांब आता! खाली उतर आणि मलाही उतरू दे. माझी तब्येत खूप बिघडल्यासारखी वाटते आहे. आता तू जास्त वेळ उडशील तर मी बेशुद्ध पडेन. पक्षी खाली उतरायला लागली वाटतं. मी आता स्वतःला, तिच्या पंजापासून सोडवून घेतो... हे अस्सं! जमिनीवर उडी मारतो. हे काय? मी जमिनीच्या ऐवजी कुठल्या तरी भुयारात पडलो वाटतं. मी अजून खोल खोल चाललोय,' सिंदबाद स्वतःशीच बडबडत होता. त्याने उडी मारली, ती नेमकी सापाच्या वारूळात, मोठ्या भुयारात! तिथे महाभयंकर, भला मोठा साप होता. वारूळात पूर्ण अंधार होता. मात्र, त्या मोठ्या सापाचे डोळे मात्र लाल गुंजांसारखे चमकत होते.'ए खुदा...माझ्यावर रहम कर. का मला तू एका संकटातून बाहेर काढून, दुसऱ्या संकटात ढकलतो आहेस? मी असं कुठलं पाप केलं आहे की, त्याची मला शिक्षा मिळते आहे? माझ्या हातून, चुकून एखादं पाप झालं असेल तर मला माफ कर, माफ कर!' सिंदबादनं डोळे मिटून म्हटलं.

आश्चर्य म्हणजे, तो साप गपचूप तिथून निघून गेला. त्या पक्षिणीच्या सावलीला तो घाबरला. सिंदबाद जिथे पडला होता, ते मोठं भुयार होतं. अचानक त्याला मांसाचा वास येऊ लागला. वासाच्या दिशेनं तो चाचपडत निघाला. तिथे मांसाचा मोठा तुकडा होता. मघाच्या पक्षिणीची सावली त्याला दिसली. त्यानं मांसाच्या समोरचा दगड बाजूला ढकलला. ज्यामुळे पक्षिणीला मांसाचा तुकडा स्पष्टपणे दिसेल.

तितक्यात त्याची नजर, तिथल्या जमिनीवर पडलेल्या हिरमाणकांवार गेली. अनेक बहुमूल्य हिरे, माणकं, पाचू, रत्नं तिथे विखुरली होती. सिंदबादने खिशात मावतील, एवढे हिरे-माणकं त्याने उचलून घेतली. पक्षीण तिथे आली आणि मांसाचा तुकडा तिनं आपल्या पंजात पकडला. ती उडणार इतक्यात सिंदबादनं मांसाच्या तुकड्याला पकडलं. तिने उडण्याचा पवित्रा घेतला.

'ज्या घरट्यात, तिनं आपलं भलं मोठं अंडं उबवण्यासाठी ठेवलं आहे, त्याच घरट्यात तिची इतर पिल्लंसुद्धा असतील. त्यामुळे मांसाला आपण पकडून ठेवलं तर आपण नक्कीच बंदरावर पोहचू.'

सिंदबादने मांसाच्या तुकड्याला घट्ट पकडलं. पक्षीण आकाशात उंच उडाली. पर्वत, दऱ्या, समुद्र असं पार करत अखेर ती त्या बंदराच्या वर आली. मांसाचा तुकडा गुळगुळीत असल्यामुळे सिंदबादचे दोन्ही हात निसटले. तो वरून खाली पडणार इतक्यात, कोणीतरी त्याला आपल्या हातात झेललं. 'मेलो मेलो, ओय ओय' सिंदबाद जिवाच्या आकांताने ओरडत होता. कोणीतरी झेलल्यामुळे, तो थोडक्यात वाचला. सिंदबादनं त्या व्यक्तीकडे पाहिलं. ते बगदादचे कबीर चाचा होते. त्याला आश्चर्याचा धक्काच बसला.'चाचाजान, तुम्ही इथे कसे आलात आणि काय शोधत आहात?' त्यानं विचारलं. 'अरे बाबा, मी इथे बरेचदा येतो,' चाचाजान म्हणाले.

आपल्या शेरवानीच्या खिशातून मोठा हिरा काढून त्यांनी सिंदबादला दाखवला.

'यासाठी येतो. हा मौल्यवान हिरा विकून मी पुढची दहा वर्षे श्रीमंत माणूस म्हणून मिरवेन!' कबीर चाचा म्हणाले.'तुला माहित आहे, ही पक्षीण आपल्या पिलांसाठी मांसाचा तुकडा घेऊन येते नं, त्या मांसाला एक दोन हिरेमाणकं चिकटले असतात. ते मी काढून घेतो. बगदादला गेल्यावर विकतो. त्यातून मला रग्गड पैसा मिळतो. म्हणून श्रीमंत व्यापारी अशी माझी ख्याती आहे,' कबीर चाचा पुढे म्हणाले. सिंदबादनं आपल्या खिशातून आणलेले हिरे, माणकं आपल्या ओंजळीत धरली.'बापरे, इतकी मौल्यवान रत्नं, मी पहिल्यांदाच पहात आहे,' चाचाजान म्हणाले. 'तुम्ही माझा जीव वाचवलात, म्हणून तुम्हाला हवी तेवढी रत्नं वेचून घ्या,' सिंदबाद म्हणाला.'सिंदबाद, तू खूप चांगला मुलगा आहेस. मी तुझा जीव वाचवला, यात तुझ्यावर फार उपकार नाही केले. माणुसकीच्या नात्यातून, ते माझं कर्तव्य होतं. तुझ्याकडेच ठेव, तुझा अनमोल ठेवा. मी त्यातलं फक्त एक काढून घेतो,' चाचाजानने त्यातलं एक रत्न काढून घेतलं. 'चल आता, माझ्या जहाजातून बगदादला, आपल्या गावाला परत जाऊ या. जहाजावर गेल्यावर, तू इथे कसा पोहचलास हे सर्व मला सांग,' चाचाजान बरोबर सिंदबाद त्यांच्या जहाजावर पोहोचला. आपले दोन्ही हात कोपरापासून वर करून सिंदबादनं देवाचे आभार मानले.




देवघरात आंब्याची पाने, कुंकू आणि नारळ ठेवून तांदूळ जमवून खोलगट भागात घट ठेवला जातो. त्यावर स्वस्तिक आणि ॐ अशी मंगल चिन्हे अंकित असतात. घट हे नवसर्जनाचे, उत्पत्तीचे, जलाचे आणि योनीचे प्रतिक आहे. यातील काही प्रतिकांचा आपण इथे विचार करू या.

आश्वलायनगृह्यसूत्रात(४.५.२) घटाच्या आकाराच्या पण पुरुष-स्त्री खुणांनी युक्त असलेल्या मातीच्या भांड्यात मृताच्या अस्थी पुरण्याचा उल्लेख येतो. याचा उपोद्बलक पुरावा ताम्रपाषाण युगीन स्थळ असणाऱ्या इनामगावच्या उत्खननात मिळतो.

**पृथ्वीराज धवड/९१३०८३९७८०**

एका लहान मुलाचे अस्थिकुंभात दफन केलेले इनामगाव इथे आढळून आले आहे. लहान मुलांना दोन कुंभात घालून पुरले जाई. दोन्ही कुंभ एकाला एक तोंड लावून ठेवत. त्यापैकी एक लहान आणि दुसरा मोठा असे. लहान कुंभात डोके आणि मोठ्यात शरीर ठेवत. डोके उत्तरेकडे आणि दक्षिणेकडे पाय करून दफन करत. मुलाचे शव कुशीवर, पाय पोटाशी दुमडून, गर्भावस्थेत असल्याप्रमाणे ठेवीत. तो जीव पुन्हा मातेच्या उदरात गेला, अशी त्यामागे भावना असावी. त्याचा पुनर्जन्म व्हावा अशी श्रद्धा असावी, असे मत डॉ. म.के.ढवळीकरांचे आहे. यासंबधीची एक वाराणसीत ऐकलेली लोककथा डॉ.सदाशिव डांगे यांनी आपल्या घट आणि हिरण्यगर्भ या लेखात दिली आहे. ही लोककथा सीतेच्या जन्मासंबधीची आहे. 'रावणाने ऋषींना मारले आणि त्यांच्या रक्ताने एक घडा भरून ठेवला. रावणाची दहशत इतकी की, त्याच्या आवाजाने स्त्रियांचे गर्भ गळून पडत. एकदा मंदोदरी आणि रावणाची बहीण गप्पा मारीत होत्या. मंदोदरी म्हणाली की, रावण अलिकडे हसत नाही, बोलत नाही.' त्यावर रावणाची बहीण म्हणाली,'बरं मी प्रयत्न करते.' त्यावर तिने रावण आल्यावर काही तरी गमतीची गोष्ट सांगितली आणि रावण जोराने हसला. तो इतका जोराने हसला की, त्या रक्ताने भरलेल्या घड्यातून एक कन्या जन्मून बाहेर आली. तीच सीता!' येथे घट गर्भस्थानाचे स्पष्ट प्रतीक आहे.

ऋग्वेदात कुंभ, पूर्ण कलश, भद्रा कलश असे उल्लेख आहेत. याशिवाय, द्रोण, कलश पात्र, सोमधान, चमस आणि कोश असे पर्यायवाची शब्द ऋग्वेदात आढळतात, असे काही विद्वानांचे मत आहे. अथर्ववेदाच्या एका मंत्रात स्त्रियांना यज्ञाच्या रक्षणार्थ पूर्ण कुंभ आणण्याचा आदेश दिला आहे. स्कंदपुराणात विवाह प्रसंगी उपयोगी चिन्हाची यादी दिली आहे त्यात पूर्ण कलशाचा उल्लेख येतो.



> **घट हे समुद्र म्हणजेच जलाचेही प्रतिक मानले जाते. ग्रहण लागायच्या आधी घरात चार जलपूर्ण घट ठेवावे. त्याचे कारण म्हणजे ते चार समुद्रांचे प्रतिक आहे. नवरात्रात पहिल्या दिवशी घटस्थापना होते. घटासमोर अष्टौप्रहर दिवा जळत असावा, असे नियम असतात. घट हा देवीच्या मातृत्वाचे आणि सर्जनशिलतेचे प्रतिक आहे.**

तसेच, पूर्ण कलश हे लक्ष्मीचे प्रतिकसुद्धा आहे. भरहुत येथील शुंगकालीन स्तुपात पूर्ण कलशाचे अंकन आहे. या कलशाचे पुष्प आणि पानांनी अंकन केलेले आहे. महत्वाचे म्हणजे भरहुत इथून मिळालेल्या तीन शिला फलक असे आहेत ज्यात पूर्ण कलशातून पुष्पावर लक्ष्मी स्थित आहे. बौध्द धर्मातील कुबेरा सारखाच असणारा जम्भल हा आपल्या हातात फळ आणि मुंगुस घेऊन असतो. जम्भल बसलेला असताना त्याच्या पायाशी लवंडलेला कुंभ असतो, त्यामधून धनराशी बाहेर पडताना दिसतात. त्यामुळे कुंभ/कलश हे धनाचे प्रतिक असलेले दिसते .

नागार्जुनकोंडा येथे चुन्याच्या दगडापासून निर्मित कलश प्राप्त झाला आहे. पल्लवयुगीन कलेत पूर्ण कलशाचे अंकन मंदिराच्या शीर्षस्थानी झाले आहे. चालुक्य काळातील मंदिरात पूर्ण कलश हे मंदिराच्या द्वारावर अंकित असलेले दिसतात. बौद्ध आणि जैन धर्मातसुद्धा अष्ट मंगलांचे महत्व आहे. जैनांचे तिलोयपणत्ती यात अष्ट मंगलांची यादी दिली आहे. त्यात कलशाचा समावेश आहे.

घट हे समुद्र म्हणजेच जलाचेही प्रतिक मानले जाते. ग्रहण लागायच्या आधी घरात चार जलपूर्ण घट ठेवावे. त्याचे कारण म्हणजे ते चार समुद्रांचे प्रतिक आहे. नवरात्रात पहिल्या दिवशी घटस्थापना होते. घटासमोर अष्टौप्रहर दिवा जळत असावा, असे नियम असतात. घट हा देवीच्या मातृत्वाचे आणि सर्जनशिलतेचे प्रतिक आहे. घटाचे प्रतिकात्मक महत्व असे व्यापक आहे. देवघरातील घटाचे असणारे उद्देश अशाप्रकारे समजून घेतले पाहिजे.